CMYK




सोलापूर
# तरुण भारत
SOLAPUR TARUN BHARAT
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, २१ डिसेंबर २०२५ । युगाब्द ५१२७ । वर्ष ४२ वे अंक -२५ । पाने १२+८ । किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O.|
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



संघकार्य रचनात्मक आहे, राष्ट्रभक्तीने ओतप्रोत आहे, चारित्र्यसंपन्न, स्वाभिमानी हिंदू समाज निर्माणाचे आहे आणि ते वाढल्यानेच वेदांची प्रतिष्ठा, वेदांत ग्रंथांमध्ये चर्चिल्या गेलेल्या जीवनाची महानता तथा भारतीय संस्कृतीच्या पावित्र्याचे रक्षण केले जाऊ शकते.

**बच्छराज व्यास**
भारतीय जनसंघाचे पूर्व राष्ट्रीय अध्यक्ष

## शालिनीताई पाटील यांचे निधन



**मुंबई** : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांच्या पत्नी तथा काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या माजी मंत्री शालिनीताई पाटील यांचे शनिवारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ९४ वर्षांच्या होत्या. त्यांनी मुंबईतील माहिम येथील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या राजकारणातील एक धाडसी व्यक्तिमत्त्व हरपले आहे. शालिनीताई पाटील गत काही महिन्यांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर माहिम येथील त्यांच्या राहत्या घरीच उपचार सुरू होते. शनिवारी दुपारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.

# मंगळवेढ्यात ६९.७७ % मतदान

## नगरपरिषद व नगर पंचायत निवडणूक ● आज मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

**सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा नगरपरिषदेसाठी ६९.७७ टक्के, पंढरपूर नगरपरिषदेसाठी ६०.८१ टक्के, मोहोळ नगरपरिषदेसाठी ६६.९९ टक्के मतदान झाले. दरम्यान अनगर (ता.मोहोळ) नगरपरिषदेची निवडणूक बिनविरोध झाली.**

### २८८ परिषदा-पंचायतींचा आज निकाल
### दहा वाजतापासून सुरू होणार मतमोजणी

**मुंबई** : न्यायालयात अपील दाखल झाल्याने पुढे ढकलण्यात आलेल्या राज्यातील २४ परिषदा आणि पंचायतींमध्ये शनिवारी शांततेत मतदान पार पडले. २ डिसेंबरला २६४ जागांसाठी मतदान झाले. उद्या सकाळी दहा वाजतापासूनच मतमोजणीला सुरूवात होणार असून २८८ नगरपरिषदा आणि नगरपंचायतींचे निकाल जाहीर होणार आहेत. राज्यात सरासरी ६६ ते ६७ टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. ■

नागपूर जिल्ह्यातील कामठी, रामटेक व नरखेड या तीन नगरपालिकांमधील नगरसेवकांच्या सात जागांसाठी ६०.९१ टक्के मतदान झाले. तर, कोंढाळी नगरपंचायततील दोन प्रभागांत दोन जागांसाठी ६९ टक्के मतदान झाले.

अकोला : बाळापूर, वाशीम व रिसोड आणि शेगाव तसेच खामगाव, देउळगावराजा व जळगाव जामोद येथे न.प.निवडणुकीसाठी मतदान झाले. २५ नगरसेवक आणि अध्यक्षपदासाठी बाळापूर येथे मतदान झाले.

**वाशीम जिल्ह्यात ६५, रिसोड ७० टक्के**

वाशीम नगरपरिषदेसाठी ८१ मतदान केंद्रांवर काही ठिकाणी किरकोळ वाद वगळता मतदान शांततेत पार पडले. सरासरी ६५ टक्के मतदान झाले. ८ अध्यक्ष व ३२ नगरसेवक पदासाठी निवडणूक पार पडली असून, मंगरुळनाथ, कारंजा, मालेगाव नगर परिषद व नगर पंचायत निवडणुकांसाठी सरासरी ६५ टक्के मतदान झाले. रिसोड नगरपरिषदेसाठी ७० टक्के मतदान झाले. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव नगरपरिषदेच्या दोन जागांसाठी मतदान झाले. ६९.६६ टक्के मतदान झाल्याची माहिती आहे. शिवाय, जळगाव जामोद न.प.निवडणुकीत ६५.५३ टक्के मतदान झाल्याची माहिती आहे.

**चार जागांसाठी ४७.३४ टक्के मतदान**

**गोंदिया** : जिल्ह्यातील गोंदिया व तिरोडा नगरपरिषदेच्या एकूण चार जागांसाठी मतदान झाले.

**चार न.प. प्रभागासाठी ४२.४२ टक्के मतदान**

**यवतमाळ** : आक्षेपांमुळे लांबणीवर पडलेल्या यवतमाळ नगरपरिषदेत नगराध्यक्षांसह ५८ नगरसेवकांसाठी तसेच पांढरकवडा, दिग्रस व वणी येथील नगरसेवकांच्या ६ जागांसाठी मतदान पार पडले. यवतमाळ शहरात अनेक ठिकाणी गोंधळ उडाला होता. ध्रुव प्राथमिक शाळेत मशिनमध्ये तांत्रिक अडचण आल्याने काही काळ मतदान प्रक्रिया खोळंबली होती. तर राज इंग्लिश शाळेत निवडणूक प्रतिनिधी ज्योती राऊत यांच्या नावानेच बोगस मतदान झाल्याचे उघडकीस आले. वार्ड क्र. १५ मध्ये दोन गटात तुंबळ हाणामारी झाली. यात एकाच्या डोळ्याला इजा झाली असून, दोन जण गंभीर जखमी झाले.

**वर्धेत २८ जागांसाठी मतदान**

**वर्धा** : वर्धा, पुलगाव, हिंगणघाट येथील काही प्रभाग तर देवळी येथील संपूर्ण निवडणूक रद्द करण्यात आली होती. आज या नगरपालिकांतील एक नगराध्यक्ष आणि २७ नगरसेवकांसाठी मतदान पार पडले. देवळीत मतदार याद्यांमध्ये घोळ कायम असल्याने मतदान प्रक्रिया उशिरापर्यंत सुरू होती. सायंकाळपर्यंत वर्धा येथे ५६.५ टक्के, हिंगणघाट ५९.८७, पुलगाव येथे ५७.६६ तर देवळी येथे ६२ असे सरासरी ५९ टक्के मतदान झाले

**अमरावती जिल्ह्यात ७० टक्के मतदान**

अंजनगाव सुर्जी नगरपरिषद अध्यक्ष व २८ सदस्यांसाठी मतदान झाले. सायंकाळपर्यंत ७० टक्के मतदान झाल्याचा अंदाज आहे. याशिवाय दर्यापूर नगरपरिषदेतील जागा क्रमांक २ अ, अचलपूर नगरपरिषदेच्या जागा क्र. १० अ, जागा क्र. १९ ब, वरुड नगरपरिषदेच्या जागा क्र. १२ अ, धारणी नगरपंचायतच्या प्रभाग क्र. १४, प्रभाग क्र. १६ अशा आठ ठिकाणी मतदान झाले.

**चंद्रपुरात ५२ टक्के**


घुग्घुस वगळता जिल्ह्यातील उर्वरित ९ नगरपालिका व एका नगरपंचायतसाठी २ डिसेंबरला मतदान पार पडले होते. घुग्घुस नगरपालिकेसाठी शनिवारी ५२ टक्के मतदान झाले. घुग्घुससोबतच बल्लारपूर, मूल, वरोडा व गडचांदूर नगरपालिकांमधील प्रत्येकी एका प्रभागाची निवडणूकही शनिवारी पार पडली. (सविस्तर वृत्त पान ८ वर)


मतदानासाठी रात्री उशिरापर्यंत लागलेली रांग

# मुंबईत काँग्रेसचा 'उबाठा'ला दणका

### महापालिका स्वबळावर लढविण्याची घोषणा ● महाविकास आघाडीत फाटाफूट





◆ **मुंबई, २० डिसेंबर**

लोकसभा आणि विधानसभा निवडणूक महाविकास आघाडीत राहून लढणाऱ्या काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढविण्याचा निर्णय घेतला आहे.

मुंबई महानगर पालिकेत मागील काळात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असून, आम्ही त्याविरोधात 'उबाठा'च्या विरुध्द निवडणूक लढणार असल्याची घोषणा काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी केली आहे. काँग्रेसने घेतलेली ही भूमिका उध्दव ठाकरेंना हा मोठा धक्का मानला जात आहे.

मनपा निवडणूक रणधुमाळी

महाविकास आघाडीतील प्रमुख घटक पक्ष काँग्रेसने मुंबई महापालिका निवडणूक स्वबळावर लढणार असल्याची काँग्रेसची अधिकृत घोषणा महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत केली. यावेळी काँग्रेसच्या मुंबई अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड उपस्थित होत्या. महाविकास आघाडीतील घटक पक्ष असलेल्या 'उबाठा' विरोधात लढू, अशी घोषणा आघाडीतीलच प्रमुख घटक पक्षाकडून झाल्याने महाविकास आघाडीत फूट पडल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

मुंबई महापालिका निवडणुकीपूर्वी महाविकास आघाडीने राज्य आणि केंद्रीय निवडणूक आयोगाविरोधात मोर्चा उघडला. दुबार मतदार आणि व्होटचोरीचा मुद्दा घेऊन काँग्रेस, शिवसेना (उबाठा), राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) हे महाविकास आघाडीतील प्रमुख तीन पक्ष तसेच त्यांच्यासोबत राज ठाकरे यांच्या मनसेनेही या विरोधात आवाज उठवला. तेव्हापासून महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीत मनसे हा नवा साथीदार सहभागी होणार, अशी चर्चा होती. मात्र, शनिवारी काँग्रेसने मुंबई महापालिकेत स्वबळाचा नारा दिला आणि देशभक्त, धर्मनिरपेक्ष लोकांनी आमच्या सोबत यावे, असे आवाहनदेखील यावेळी करण्यात आले. ◀*(तभा वृत्तसेवा)*

### मनसेवर अप्रत्यक्ष टीका



मुंबईच्या विकासावर बोलणारी मंडळी आम्ही आहोत. मुंबईत सर्वांना सोबत घेऊन जाण्याचा आमचा विचार आहे. भारतीय संविधानावर आमचा विश्वास आहे, मुंबईवर सर्वांनी एकत्र येऊन बोलण्याची गरज आहे. मात्र, काही पक्षांकडून सातत्याने कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला जातो. मारहाण केली जाते आणि जी भाषा वापरली जाते, ती आमच्या संस्कृतीला जुळणारी भाषा नाही. त्यामुळे आम्ही स्वतंत्र निवडणूक लढण्याचा निर्णय घेतला असल्याचे खा. वर्षा गायकवाड यांनी यावेळी सांगितले. गायकवाड यांचे हे वक्तव्य म्हणजे नाव न घेता मनसेवर केलेली टीका होय. ■

## गुरसाळेजवळ अपघातात बाप, लेकाचा मृत्यू

- मोटारसायकलला टिपरची धडक
- अवैध वाळू वाहतुकीचा ठरला दुर्दैवी बळी

**पंढरपूर, दि.२० डिसेंबर-**

पंढरपूर-अहमदनगर रोडवरील गुरसाळे या गावाजवळ बिगर नंबरच्या अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिपरने समोरुन जोरदार धडक दिल्याने बाप आणि लेक यांचा जागीच मृत्यू झाला आहे. हा दुर्दैवी अपघात शनिवार (दि.२०डिसेंबर) रोजी दुपारी २ वाजता झाला.

या अपघाताची सविस्तर माहिती अशी की, माढा तालुक्यातील उजनी गावातील रघुनाथ उत्तम लोकरे (वय-४२, रा.उजनी, ता.माढा) आणि त्यांचा मुलगा नरसिंग रघुनाथ लोकरे (वय-१३) हे आपल्या एम.एच.४५, ए.एच. ०२५४ या क्रमांकाच्या मोटारसायकलवरुन गावाकडे जात होते. साखर कारखान्याकडून भरघाव वेगाने येणाऱ्या टिपरने त्यांना धडक देऊन चिरडले.

या अपघातात बाप-लेकराचा जागीच मृत्यू झाला. अपघात झाल्यावर शाळेत शिकणाऱ्या नरसिंग लोकरे याची पुस्तके रस्त्यावर पडली होती. अपघाताचे हे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे होते. दरम्यान, अपघातानंतर टिपर चालक गाडी सोडून पळून गेला आहे. पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक तैय्यब मुजावर अधिक तपास करीत आहेत.

## मानवी अवयव तस्करी प्रकरणी एसआयटी

**चंद्रपूर, २० डिसेंबर**

अवैध सावकारी कर्जातून नागभीड तालुक्यातील रोशन कुळे या शेतकऱ्याला आठ लाखांत किडनी विकावी लागली. हे प्रकरण उघडकीस येताच, त्याचे अन्य कांगोरेही पुढे येऊ लागले. किडनी विक्री प्रकरणी आंतरराष्ट्रीय संबंधाचे धागेदोरे गवसले असले, तरी सारी सूत्रे जोवर जुळत नाही, तोवर कुठल्याच निष्कर्षावर पोहोचता येत नाही. कुणाच्या खात्यातून कुणाच्या खात्यात किती पैसे आले, यावरून प्रकरणाची सत्यता तपासणे सुरू आहे. विशेष तपास पथक (एसआयटी) गठित करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक मुमक्क्क सुदर्शन यांनी दिली.

या एसआयटीत अतिरिक्त पोलिस अधीक्षक ईश्वर कातकडे यांच्या नेतृत्वात ब्रह्मपुरीचे उपविभागीय पोलिस अधिकारी सत्यजीत आमले, पोलिस निरीक्षक अमोल कचोरे व दोन पोलिस अधिकारी, सायबर पोलिस निरीक्षक सुनील गाडे, ब्रह्मपुरीचे पोलिस निरीक्षक प्रमोद बानबले आदींचा समावेश आहे. कोलकाता येथील डॉ. कृष्णाच्या माध्यमातून कंबोडिया येथे जाऊन किडनी विकल्याचे रोशन कुळे सांगत आहे. शिवाय तेथे त्याने एका कॉल सेंटरमध्ये कामही केल्याचे तो सांगतो. मात्र, या साऱ्या गोष्टींचा तपास आणि त्याची सुसूत्रता स्पष्ट होत नाही, तोवर भाष्य करता येत नाही, असे मुमक्का यांनी सांगितले. याबाबत तपास सुरू असून, वैद्यकीय कागदपत्रे आणि संपर्क साखळीची पडताळणी केली जात आहे.







CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### प्राध्यापक जी. डी. यादव यांचा सन्मान

**नागपूर :** 'लक्ष्मीनारायण इनोव्हेशन टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटी' च्या गव्हर्निंग बोर्डचे अध्यक्ष, पद्मश्री प्राध्यापक जी. डी. यादव यांना या आठवड्यात तीन प्रतिष्ठित सन्मान प्राप्त झाले आहेत. प्राध्यापक यादव हे माजी कुलगुरू आहेत. भारत सरकारच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने त्यांची हायड्रोकार्बन विषयक वैज्ञानिक सल्लागार समितीचे अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली आहे. तसेच गुजरात सरकारने त्यांची गुजरात तंत्रज्ञान विद्यापीठाच्या गव्हर्निंग बोर्डचे सदस्य म्हणून नामनिर्देशन केले आहे. याशिवाय, जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगळुरू या प्रतिष्ठित संस्थेने त्यांना मानद प्राध्यापकपद प्रदान केले आहे. हे सन्मान विज्ञान, तंत्रज्ञान, उच्च शिक्षण आणि राष्ट्रीय धोरणनिर्मितीतील प्राध्यापक यादव यांच्या उल्लेखनीय योगदानाचे प्रतीक आहेत.



### बनावट औषधे बनवणाऱ्या रॅकेटच्या सूत्रधाला अटक

**नवी दिल्ली :** दिल्ली पोलिसांनी बनावट औषध निर्मिती करणाऱ्या रॅकेटच्या कथित सूत्रधार प्रमोद कुमार गुप्ता याला अटक केली. आरोपीला हजरत निजामुद्दीन परिसरातून अटक करण्यात आली. काही दिवसांपूर्वी पोलिसांनी बनावट औषधे बनवणाऱ्या कारखान्याचा छडा लावला होता. यापूर्वी दोन जणांना अटक करण्यात आली होती, असे पोलिस उपायुक्त आदित्य गौतम यांनी पत्रपरिषदेत सांगितले. सतत केलेल्या पाठपुराव्यादरम्यान, पोलिसांनी पुरवठा साखळीचा शोध घेत दुसऱ्या उत्पादन युनिटपर्यंत पोहोचले. तिथे बेटनोव्हेट हे औषध बेकायदेशीरपणे तयार करून उत्तर भारतात पुरवले जात होते. गुप्ता हा कारखाना चालवत होता आणि या रॅकेटमागील मुख्य सूत्रधार होता, असे पोलिसांनी सांगितले. परिसरातून मोठ्या प्रमाणात कच्चा माल जप्त करण्यात आला. तो ५० हजारांपेक्षा जास्त बनावट बेटनोव्हेटच्या युनिट्सच्या निर्मितीसाठी पुरेसा होता. बनावट औषधांव्यतिरिक्त, पोलिसांनी मोठ्या संख्येने बनावट सौंदर्यप्रसाधने देखील जप्त केली. छाप्यांदरम्यान बनावट फेअर अँड लव्हली क्रीमच्या सुमारे ७०० ट्यूब आणि बनावट वीट हेअर रिमूव्हल क्रीमच्या अंदाजे ८०० ट्यूब जप्त करण्यात आल्या.

### भारतीय परिचारिकेला लागला २.४ कोटींचा जॅकपॉट

**नवी दिल्ली :** केरळमधील एका परिचारिकेला यूएईमध्ये लॉटरी लागून तिने मोठी रक्कम जिंकली आहे. अजमानमध्ये वास्तव्यास असलेली परिचारिका टिंटू जेसमोन हिने बिग तिकीट ड्रॉ सीरिज २८१ मध्ये एक लाख यूएई दिरहम म्हणजेच सुमारे २.४ कोटी रुपयांचा जॅकपॉट पटकावला आहे. टिंटू जेसमोन मागील पंधरा वर्षांपासून यूएईमध्ये कार्यरत आहे. ३० नोव्हेंबर रोजी तिने दहा जणांच्या गटासह एकत्रितपणे विजेते तिकीट खरेदी केले होते. बिग तिकीटमध्ये सामूहिक तिकीट खरेदी करण्याची पद्धत मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय असून, यामुळे सहभागींना तिकिटाची किंमत तसेच जिंकलेली रक्कम एकमेकांत वाटून घेता येते. आपण लॉटरी जिंकल्याचे समजताच जेसमोनच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मागील पाच वर्षांपासून ती सातत्याने बिग तिकीटमध्ये सहभागी होत होती.




### सराफा

| | |
|---|---|
| **सोने** (स्टँण्डर्ड/१० ग्रॅम) | रु. १,३२,२०० |
| **चांदी** (प्रतिकिलो) | रु. २,०३,४०० |

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| सोलापूर | ३१.७ | १२.३ |
| अमरावती | २९.८ | १०.५ |
| भंडारा | ३०.० | -.- |
| बुलडाणा | ३०.० | ११.५ |
| चंद्रपूर | २९.६ | ११.६ |
| गडचिरोली | २८.६ | १०.० |
| गोंदिया | २६.५ | ८.२ |
| नागपूर | २८.६ | ८.६ |
| वर्धा | २८.६ | ९.६ |
| वाशीम | ३१.४ | ११.० |
| यवतमाळ | ३१.० | ९.० |

# कापूस पीक पाहणीच्या नावावर शेतकऱ्यांना हेलपाटे

## जमाबंदी आयुक्तांच्या सूचना ३० पट वेळखाऊ

## कवडीमोल भावाने विकावा लागू शकतो कापूस

◆ **यवतमाळ, २० डिसेंबर**

कापूस 'ई-पीक' पाहणीची नोंद न झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांची 'ऑफलाईन' पाहणी करण्यासाठी भूमी अभिलेखच्या जमाबंदी आयुक्तांनी मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. या सूचनांमुळे खासकरून विदर्भातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेलपाटे खावे लागत असून वेळकाढूपणा करणाऱ्याच आहेत, अशी तीव्र प्रतिक्रिया उमटली आहे.

'ऑफलाईन' कापूस पीक पाहणीसंदर्भात महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वनविभागाने १४ डिसेंबर रोजी शासन निर्णय जारी केला आहे. या निर्णयाला अनुसरून त्याच दिवशी भूमी अभिलेख खात्याने 'ऑफलाईन' प्रक्रिया कशी पार पाडायची, याबाबत दिशानिर्देश दिले.

ई-पीक नोंदणीच्या तुलनेत ही प्रक्रिया कमीत कमी ३० पट अधिक वेळखाऊ ठरणार आहे. ई-पीक नोंदणी एका दिवसात होणाऱ्या प्रक्रियेसाठी या दिशानिर्देशांनी ३० दिवसांचे अधिकृत वेळापत्रकच दिले आहे. आपल्या प्रचलित सरकारी कार्यपद्धतीनुसार १७ डिसेंबर ते १५ जानेवारी या अधिकृत ३० दिवसांच्या कामाला ५० ते ६० दिवस सहज लागू शकतात.

कापूस पिकाच्या ऑफलाईन नोंदणीसाठी मंडळ अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेत ४ सदस्यांची समिती १७ डिसेंबरपासून कामाला लागावी, असे भूमी अभिलेख खात्याला अपेक्षित आहे. त्यासाठी २४ डिसेंबरपर्यंत अर्ज सादर करायचे आहेत. त्यानंतर २५ डिसेंबर ते ७ जानेवारी या समितीने संयुक्तपणे जाऊन प्रत्यक्ष स्थळपाहणी करायची आहे. या 'स्थळपाहणी'पूर्वी या समितीने संबंधित आणि आजूबाजूच्या किमान ४-५ शेतकऱ्यांना 'लेखी' पूर्वकल्पना द्यायची आहे. ही स्थळपाहणी करताना शेतकऱ्याने २०-२५ च्या खरीप हंगामात प्रत्यक्ष लागवड केलेले पीक, त्याची स्थानीय चौकशी, वस्तुस्थितीदर्शक पंचनामा, आजूबाजूच्या शेतकऱ्यांचे जबाब, लागवडीसाठी खरेदी केलेले बियाणे, खतांच्या खरेदी पावत्या, गेल्या वर्षीच्या खरीप हंगामाची नोंद आणि ही सारी चौकशी झाल्यानंतर पिकांचे नाव आणि क्षेत्र यांचा पंचनामा अशी वेळकाढू आणि किचकट कार्यपद्धती दिली आहे.

त्यानंतरही हा स्थळपाहणी अहवाल उपविभागीय अधिकाऱ्यांच्या नेतृत्वातील समितीला १२ जानेवारीपर्यंत सादर करणे, त्यात खातेदार, खाते क्रमांक, गट, क्षेत्र, पिकांची नावे, त्यांचे प्रत्येकी क्षेत्र, इत्यादी सोपस्कार पार पाडायचे आहेतच. याला १५ जानेवारी ही मुदत दिली असली, तरी हे काम फेब्रुवारी अखेरपर्यंत सहज रेंगाळू शकते, असे पूर्वानुभव सांगतो आहे. (तभा वृत्तसेवा)



### हे तर शेतकऱ्यांना झटकेच

हे सारे सरकारी दिशानिर्देश म्हणजे आज प्रामुख्याने शेतकऱ्याजवळ विकण्यासाठी तयार असलेल्या कापसाला आणखी महिनाभर तरी पडूनच ठेवावे लागणार आहे. ही प्रक्रिया पार पाडण्यासाठी शेतकऱ्याला काय काय झेलावे लागणार, कुठे कुठे खिसा मोकळा करावा लागणार, हे तर आहेच. एकूणच शेतकऱ्यांना आपल्या शेतातील कापूस कदाचित कवडीमोल भावात विकावा लागण्याची शक्यता अधिक आहे. संबंधित यंत्रणेने ही प्रक्रिया अधिक सुटसुटीत न केल्यास कापूस उत्पादकांना योग्य भाव न मिळण्यासाठी केलेले हे 'कारस्थान' आहे, असेच म्हणावे लागेल, अशी संतप्त प्रतिक्रिया कापूस उत्पादक शेतकरी राजन भागवत व राहुल माळवे यांनी दिली आहे.



बांगलादेशमधील अशांततेची परिस्थिती पाहता सीमेवरून घुसखोरी होऊ नये म्हणून अगरतळा राज्यातील बांगलादेश सीमेवर सीमा सुरक्षा दलाने गस्त वाढविली आहे

# बच्चू कडू यांच्या भेटीत रोशन कुळे गहिवरले!

## जानेवारीला मिंथुर ते नागभीड 'लाँगमार्च' काढणार

◆ **चंद्रपूर, २० डिसेंबर**

प्रहार संघटनेचे संस्थापक तथा माजी आमदार बच्चू कडू यांनी शनिवार, २० डिसेंबर रोजी शेतकरी रोशन कुळे यांची भेट घेतली. नागभीड तालुक्यातील मिंथुर येथील रहिवासी कुळे यांना सावकारी कर्जाची परतफेड करण्यासाठी स्वतःची किडनी विकावी लागली होती. हे प्रकरण प्रकाश झोतात येताच, साऱ्याचे लक्ष आता मिंथुर गावाकडे लागले आहे. कुळे यांच्या भेटीला बच्चूकडे मिंथुर येथे आले होते. या भेटीप्रसंगी रोशन कुळे यांना अश्रू अनावर झाले.

रोशन यांनी बच्चू कडू यांना आपली आपबिती सांगितली. त्यावर कडू यांनी संताप व्यक्त केला. शेतकऱ्याला कर्जाची परतफेड करण्यासाठी किडनी विकावी लागत असेल, तर पुरोगामी महाराष्ट्र कोणत्या दिशेला चालला आहे, असे ते म्हणाले. हा गंभीर प्रकार असून, ही लढाई एकट्या रोशनची नसून आपल्या सर्वांची आहे. त्यासाठी येत्या ३ जानेवारीला मिंथुरपासून नागभीडपर्यंत मोठा 'लाँगमार्च' अशी घोषणाही यावेळी बच्चू कडू यांनी केली.

कडू म्हणाले, कर्जाची परतफेड करण्यासाठी कुळे यांना किडनी विकावी लागली, हा प्रकार अतिशय गंभीर आहे. याची दखल राज्य शासनाने त्वरित घ्यावी. रोशन यांना धमक्यांचे फोन येत होते, त्यांचे अपहरण करण्यात आले आहे. त्यामुळे त्याला किडनी विकावी लागली. त्यासाठी अपहरणाचा गुन्हा दाखल झाला पाहिजे. त्याचबरोबर फसवणुकीचा गुन्हाही दाखल झाला पाहिजे. तसेच जबर मारहाणीचा गुन्हा दाखल केला नसल्याने तो पण गुन्हा दाखल झाला पाहिजे.

रोशन यांनी कंबोडिया या देशात किडनी विकायला गेला याची 'एसआयटी' चौकशी झाली पाहिजे. राज्यामध्ये सावकरी प्रकरणाचे गुन्हे सर्रास सुरू आहे. त्याबरोबर मायक्रो फायनान्स या कंपन्यांवरसुद्धा बंधने आणली पाहिजे. ही लढाई नागभीडपुरती नाही किंवा एकट्या रोशन पुरती नाही, तर संपूर्ण महाराष्ट्राची आणि देशव्यापी आहे. रोशन कुळे या शेतकऱ्याला त्याचे पैसे परत मिळाले पाहिजे. कारण त्याने आजच्या बाजार भावापेक्षा कमी भावाने शेती विकली आहे. ३ जानेवारीला रोशनच्या घरापासून ते नागभीडपर्यंत पायदळ मोर्चा काढला जाणार असून, मागण्या पूर्ण झाल्या नाही तर मोठे आंदोलन करणार असल्याचेही बच्चू कडू यांनी सांगितले. (तभा वृत्तसेवा)



बच्चू कडू यांच्याशी चर्चा करताना रोशन कुळे

# अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व कालातीत : गडकरी

## अशोक टंडन यांच्या 'अटल संस्मरण' पुस्तकाचे प्रकाशन

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

अटलबिहारी वाजपेयी यांचे नेतृत्व कालही प्रासंगिक होते, आजही आहे, आणि उद्याही राहील, त्याचे नेतृत्व कालातीत आहे, असे प्रतिपादन केंद्रीय भूपृष्ठ परिवहन आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी केले.

ज्येष्ठ पत्रकार आणि पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे माध्यम सल्लागार म्हणून काम केलेल्या अशोक टंडन यांच्या प्रभात प्रकाशनने प्रकाशित केलेल्या 'अटल संस्मरण' या पुस्तकाचे प्रकाशन करतांना गडकरी बोलत होते. इंडिया इंटरनॅशनल सेंटरमध्ये झालेल्या या कार्यक्रमात इंडिया टीव्हीचे अध्यक्ष रजत शर्मा आणि लेखक अशोक टंडन उपस्थित होते.

अटलजी एक संवेदनशील नेता होते, लोकशाहीवर त्यांची नितांत श्रध्दा होती. लोकशाहीत परिपूर्ण राजकीय नेता कसा असावा, हे अनेक उदाहरणातून अटलजींनी दाखवून दिले, असे गौरवोद्‌गार गडकरी यांनी काढले. राजकीय पार्श्वभूमीवर अटलजींनी केलेले कार्य तसेच कर्तृत्व आणि नेतृत्वासोबत त्यांचे व्यक्तिगत जीवनही आदर्श होते, असे गडकरी म्हणाले.

अटलजींच्या नेतृत्वाने काम करण्याची प्रेरणा आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दिला, याकडे लक्ष वेधत वेधत गडकरी म्हणाले की, मतभेद चालतील पण मनभेद नको, असे अटलजींनी म्हटले होते.

आजही राजकारणात मी अटलजींनी अनेक बाबतीत दिलेल्या सल्ल्यांचे तंतोतंत पालन करण्याचा प्रयत्न करतो. अटलजी अष्टपैलू व्यक्तिमत्वाचे धनी होते, त्यांचे संपूर्ण वर्णन एका पुस्तकातून करणे शक्य नाही, तरी पण अशोक टंडन यांनी तसा प्रयत्न यशस्वीपणे केला, ही आनंदाची बाब आहे, असे इंडिया टीव्हीचे अध्यक्ष रजत शर्मा आपल्या भाषणात म्हणाले. अटलजींसोबतच्या दोनतीन आठवणींचा उल्लेखही त्यांनी यावेळी केला. लेखक अशोक टंडन यांनी पुस्तकामागची भूमिका मांडली. प्रभात प्रकाशनचे प्रभात कुमार यांनी आभारप्रदर्शन केले. (तभा वृत्तसेवा)



### मल्याळम अभिनेते श्रीनिवासन् यांचे निधन

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

मल्याळम चित्रपटाचे ज्येष्ठ अभिनेते, लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते श्रीनिवासन् यांचे शनिवारी वयाच्या ६९ व्या वर्षी निधन झाले. ते दीर्घ काळापासून आजारी होते आणि उदयमपेरूर येथील त्यांच्या घरी उपचार घेत होते. शनिवारी प्रकृती अधिक बिघडल्याने त्यांना त्रिप्पुनिथुरा येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. शनिवारी सकाळी डॉक्टरांनी त्यांच्या मृत्यूची पुष्टी केली. श्रीनिवासन् यांचा जन्म ६ एप्रिल १९५६ रोजी केरळमधील थालास्सेरी जवळील पट्टयम येथे झाला होता. त्यांनी चेन्नईच्या फिल्म ॲण्ड टेलिव्हिजन इन्स्टिट्यूटमधून चित्रपटाचे शिक्षण घेतले. (वृत्तसंस्था)

# इटानगर मनपावर भाजपाचा झेंडा

◆ **इटानगर, २० डिसेंबर**

सत्ताधारी भाजपाने शनिवारी निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर २० पैकी १४ जागा जिंकून इटानगर महानगरपालिके (आयएमसी)वर भगवा फडकवला.

राज्य निवडणूक आयोगाचे सचिव तारू टालो यांनी सांगितले की, पीपल्स पार्टी ऑफ अरुणाचल (पीपीए) ने आठपैकी पाच जागी विजय मिळवून पासीघाट नगर परिषदेच्या (पीएमसी) निवडणुका जिंकल्या आहेत. विरोधी काँग्रेसला इटानगर आणि पासीघाट या दोन्ही स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एकही जागा जिंकता आली नाही. भाजपने एकूण २० पैकी १४ जागी विजय मिळवता. त्यापैकी चार जागी भाजपाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले. तीन जागांवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने, दोन ठिकाणी लोक जनशक्ती पक्षा (रामविलास)ने, तर अपक्ष उमेदवाराने एक जागा जिंकली. २० सदस्यीय इटानगर महानगरपालिकेत १० ठिकाणी महिला उमेदवारांनी बाजी मारली. आयएमसी आणि पीएमसी निवडणुकांमध्ये ईव्हीएमचा वापर करण्यात आला होता. पासीघाट नगर परिषद निवडणुकीत, पीपीएने आठपैकी पाच वॉर्डात विजय मिळवला. (वृत्तसंस्था)

# १० हजार वर्गांमध्ये लागणार 'एअर प्युरिफायर'

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

विद्यार्थ्यांना स्वच्छ हवा देण्यासाठी १० हजार वर्गखोल्यांमध्ये एअर प्युरिफायर बसवले जातील, अशी घोषणा दिल्लीचे शिक्षणमंत्री आशिष सूद यांनी शुक्रवारी केली. सरकार दीर्घकालीन प्रशासकीय उपाययोजनांद्वारे प्रदूषण समस्येवर मात करण्यासाठी वचनबद्ध आहे. प्रदूषण ही एक दिवसाची समस्या नाही. यासाठी दीर्घकालीन कृती आवश्यक आहे, असे पत्रपरिषदेत सूद म्हणाले.

दिल्लीच्या सरकारी शाळांमध्ये एकूण ३८ हजार वर्गखोल्या आहेत आणि पहिल्या टप्प्यात १० हजार वर्गखोल्यांमध्ये एअर प्युरिफायर बसवले जातील, असे दिल्लीचे मंत्री आशिष सूद म्हणाले. आम्ही आयआयटी पदवी दाखवून सम-विषम किंवा गाडी चालू, गाडी बंद अशा मोहिमा राबवणारे नाही. आम्ही दीर्घकालीन प्रशासकीय पद्धतींद्वारे प्रदूषण समस्येचा सामना करत आहोत, असे आम आदमी पक्षाच्या मागील सरकारवर टीका करताना ते म्हणाले. सरकारला मुलांनी केवळ हुशारीने अभ्यास करावा असे नाही तर स्वच्छ हवा श्वास घ्यावी असे वाटते. पहिल्या टप्प्यात १० हजार वर्गखोल्यांमध्ये एअर प्युरिफायर बसवले जातील, असे त्यांनी सांगितले.

तापमानात घट झाल्यामुळे राजधानीत प्रदूषणाची पातळी वाढत आहे. अनुकूल हवामान असूनही प्रदूषण अत्यंत वाईट श्रेणीत आहे. सकाळची सुरुवात धुक्याने होते. आकाशात धुराचे हलके आवरण देखील दिसते, यामुळे अनेक भागात दृश्यमानता कमी झाली आहे. (वृत्तसंस्था)

# अनिल अंबानींच्या मुलाची सलग दुसऱ्या दिवशी चौकशी

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

कथित बँक घोटाळ्यातील मनी लॉण्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने शनिवारी सलग दुसऱ्या दिवशी उद्योजक अनिल अंबानी यांचा मुलगा जय अनमोल अंबानीची चौकशी केली, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.



बेकायदेशीर सावकारी प्रतिबंधक कायद्याच्या अंतर्गत शुक्रवारी प्रथमच त्याचे बयाण नोंदवून घेण्यात आले आणि हे सत्र शनिवारीही कायम होते, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. या घडामोडीबाबत विचारलेल्या प्रश्नांना रिलायन्स धीरूभाई अंबानी यांनी कोणतीही प्रतिक्रिया व्यक्त केली नाही.

ईडीचा हा तपास येस बँकेशी संबंधित आहे. या बँकेचे रिलायन्स धीरूभाई अंबानी समूहात ३१ मार्च २०१७ पर्यंत जवळपास सहा हजार कोटी रुपयांचे कर्ज होते. ते वर्षभरात वाढून दुप्पट म्हणजे जवळपास १३ हजार कोटी रुपये झाले. यामध्ये रिलायन्स होम फायनान्स लि. (आरएचएफएल) आणि रिलायन्स कमर्शियल फायनान्स लि. या कंपन्यांचा समावेश आहे.

या गुंतवणुकीचा मोठा भाग एनपीआय ठरला आणि या व्यवहारांमुळे बँकेला ३,३०० कोटी रुपयांचे नुकसान झाले, असा दावा ईडीने केला आहे. रिलायन्स समूहातील कंपन्यांच्या विरोधातील बँक घोटाळा प्रकरणात यापूर्वी अनिल अंबानी यांचीही चौकशी करण्यात आली आहे. (वृत्तसंस्था)

# 'बाहुबली' प्रक्षेपित करणार अमेरिकेचा उपग्रह

## स्मार्टफोनला अंतराळातून मिळणार कनेक्टिव्हिटी ● आतापर्यंतचा सर्वांत जड व्यावसायिक उपग्रह

◆ **श्रीहरिकोटा, २० डिसेंबर**

भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रो पुन्हा एकदा पराक्रम दाखवत आतापर्यंतचा सर्वांत जड व्यावसायिक उपग्रह प्रक्षेपण करणार आहे. विशेष म्हणजे हा उपग्रह अमेरिकेचा आहे. २४ डिसेंबरला सकाळी ८.५४ वाजता आंध्र प्रदेशातील श्रीहरि कोटातील सतीश धवन अंतराळ केंद्रातून प्रक्षेपित करणार आहे. इस्रोच्या एलव्हीएम३ अग्निबाणाची ही सहावी मोहीम आहे.

एलव्हीएम३-एम६/ब्लूबर्ड ब्लॉक-२असे या मोहिमेला नाव देण्यात आले आहे. ही पूर्णपणे व्यावसायिक मोहीम आहे. अमेरिकन कंपनी एएसटी स्पेसमोबाईलचा ब्लूबर्ड ब्लॉक-२ संप्रेषण उपग्रह प्रक्षेपित होणार आहे. ही मोहीम इस्रोच्या व्यावसायिक शाखा न्यूस्पेस इंडिया लिमिटेडच्या माध्यमातून होते आहे. अंदाजे ६.५ टन वजनाचा, ब्लूबर्ड ब्लॉक-२ उपग्रह हा पृथ्वीच्या खालच्या कक्षेत तैनात केलेला आतापर्यंतचा सर्वांत मोठा व्यावसायिक संप्रेषण उपग्रह असेल. हा एलव्हीएम ३ अग्निबाणाद्वारे भारतीय भूमीवरून सोडण्यात आलेला आतापर्यंतचा सर्वांत वजनदार पेलोड आहे.



इस्रोने विकसित केलेले आणि पूर्वी जीएसएलव्ही एमके-३ म्हणून ओळखले जाणारे एलव्हीएम ३ हे भारतातील सर्वांत शक्तिशाली अग्निबाण आहे. याला अनेकदा 'बाहुबली' अग्निबाण देखील म्हटले जाते.

या अग्निबाणाची उंची ४३.५ मीटर असून वजन ६४० टन आहे. ते जियोसिंक्रोनस ट्रान्सफर कक्षेत चार टनपर्यंत पेलोड घेऊन जाऊ शकतो. लो अर्थ कक्षेत याची क्षमता १० टन आहे. एलव्हीएम३ ने याआधी अनेक महत्त्वपूर्ण मोहिमा यशस्वी पूर्ण केल्या आहेत. यात चांद्रयान-२, चांद्रयान-३ आणि दोन वनवेब मोहिमांचा समावेश आहे.

**ब्लूबर्ड ब्लॉक-२ उपग्रहाचे वैशिष्ट्य**

अमेरिकन कंपनी एएसटी स्पेसमोबाईलने बनवलेला हा उपग्रह पुढील पिढीतील संप्रेषण उपग्रह आहे. याचे सर्वांत उल्लेखनीय वैशिष्ट्य म्हणजे ते अवकाशातून थेट सामान्य स्मार्टफोनला सेल्युलर ब्रॉडबॅण्ड कनेक्टिव्हिटी प्रदान करेल. याचा अर्थ असा की दुर्गम भागात अतिरिक्त उपकरणे किंवा टॉवरशिवाय ४जी/५जी इंटरनेट उपलब्ध होईल. (वृत्तसंस्था)

# पॅरा बॅडमिंटनसाठी प्रशिक्षक विकास कार्यक्रमाचे आयोजन

**रायपूर :** भारतीय बॅडमिंटन संघटनेने (बीएआय) १६ ते २० डिसेंबर दरम्यान येथे पॅरा बॅडमिंटनसाठी (तळागाळातील स्तरावर) आपला पहिला-वहिला प्रशिक्षक विकास कार्यक्रम आयोजित केला आहे. देशात या खेळाच्या वाढीस हातभार लावणाऱ्या प्रशिक्षण प्रणालीला बळकट करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या पाच दिवसीय कार्यक्रमात देशभरातील प्रशिक्षक पॅरा बॅडमिंटनमध्ये दीर्घकालीन क्षमता निर्माण करण्याच्या उद्देशाने विशेष प्रशिक्षणासाठी एकत्र आले आहेत.

# दोन सैनिकांच्या बदल्यात इसिसची ७० ठिकाणे उद्ध्वस्त

## कित्येक दहशतवादी ठार; अमेरिकेने घेतला बदला





◆ **वॉशिंग्टन, २० डिसेंबर**

दोन सैनिक आणि एका सहकाऱ्याच्या मृत्यूचा बदला घेताना शनिवारी रात्री अमेरिकेने दहशतवादी संघटना इसिसच्या सीरियातील ७० तळांवर भीषण हल्ले चढविले. यामध्ये अनेक दहशतवादी ठार झाले असून आम्ही सैनिकांच्या मृत्यूचा बदला घेतला, अशी प्रतिक्रीया पेंन्टगॉनने दिली आहे.

गेल्या आठवड्यात इसिसच्या दहशतवाद्यांनी डोव्हेर हवाई तळावर तैनात असलेल्या विलियम हॉवर्ड, एड्गर टोव्हार हे दोन सैनिक आणि स्थानिक दुभाषा अयार मन्सूर साकत यांची गोळ्या घालून हत्या केली होती. या घटनेचा बदला घेण्याचा इशारा अमेरिकेने आधीच दिला होता. दहशतवाद्यांसह इसिसचा नायनाट करण्यासाठी 'ऑपरेशन हॉकआय स्ट्राईक' या नावाने मोहीम अमेरिकेने सुरू करीत शुक्रवारपासून हल्ल्यांना प्रारंभ केला. या मोहिमेत एफ-१५, जॉर्डनच्या तळावरील एफ-१६, ए-१० थंडरबोल्ट ही लढाऊ विमाने आणि अपाचे हेलिकॉप्टर सहभागी झाले होते. एकाचवेळी १०० ठिकाणांवर हल्ले चढविण्यात आले. यात इसिसचे तळ पूर्णपणे उद्ध्वस्थ झाले, अशी माहिती अमेरिकन संरक्षण विभागाने दिली आहे.

ही युद्धाची सुरुवात नव्हे तर दहशतवाद्यांचा नायनाट करण्यासाठीची घोषणा होय. अशा दृष्ट शक्तीचा नाश होईपर्यंत डोनाल्ड ट्रम्प यांचे सरकार शांत बसणार नाही, असे अमेरिकेचे संरक्षण मंत्री पीट हेग्सेथ यांनी म्हटले आहे.

अमेरिकन सैनिकांवर झालेल्या हल्ल्याची जबाबदारी इसिसने घेतली नसली तरी सीरियान सैनिकांवर इदलिब प्रांतात झालेला हल्ला केल्याची कबुली दिली आहे. अमेरिकेने डेईर इझ झोर आणि रक्का प्रांत आणइ जबाल अल अमोर भागात इसिसच्या तळांवर हल्ले झाल्याची माहिती सीरियाच्या सरकारी टीव्हीने दिली आहे. हल्ल्यात ठार झालेल्यांचा आकडा निश्चित नसला तरी २३ पेक्षा जास्त दहशतवादी ठार झाल्याची माहिती आहे. (वृत्तसंस्था)

### सीरियात अतिरिक्त सैनिक तैनात

इसिसला नष्ट करण्यासाठी सीरियात आणखी सैनिक तैनात करण्यात आले आहेत. सीरियाचे अध्यक्ष अहमद अल शार्रा यांच्या पाठीशी अमेरिका भक्कमपणे उभी आहे. आम्हाला शार्रा सरकारचा पूर्ण पाठिंबा असल्याचे हेग्सेथ यांनी म्हटले आहे.

# 'भाजपा'त भरतीला 'उधाण'



समुद्राला भरती-ओहोटीसाठी काळवेळ आहे. पण 'भाजपा'तील 'भरती'ला मात्र रात्रंदिवस उधाण आलेले आहे. अनेक राजकीय पक्षांना 'ओहोटी' लागली असली तरी ते नेते राजकीय धैर्य दाखवून जोमाने निवडणुकीच्या आवेषात असल्याचे दर्शवून आपल्या उरलेल्या कार्यकर्त्यांना सांभाळण्याचे काम करीत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील राजकारण पाहिले असता तूर्तास मित्रपक्ष वगळता इतर सर्वच पक्षातील आजी-माजी खासदार, आमदार आदी दिग्गजांसह पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी भाजपामध्ये येण्यासाठी रांग लावल्याचे चित्र आहे. भाजपामध्ये येणाऱ्यांची रांग पाहिल्यानंतर लक्षात येते की, आपला पक्ष सोडताना संबंधितांच्या हे पुरते लक्षात आलेले दिसते की, भाजपा हा आता जनता जनार्दनाच्या मनातील सर्वाधिक लोकप्रिय राजकीय पक्ष बनला आहे. विश्वगुरु, विकासपुरुष असे ज्यांना अभिमानाने संबोधले जाते ते लाडके पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मोदींचे प्रतिरूप म्हणून ज्यांच्याकडे पाहिले जाते असे महाराष्ट्राच्या राजकारणातील चाणक्य मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देश आणि महाराष्ट्राच्या विकासाचा लावलेला झपाटा पाहून आता विरोधी पक्षातील अनेकांना भाजपाची भुरळ पडत आहे. निवडणुका असतानाही कोणत्याही अटी व शर्थी न घालता दररोज भाजपात प्रवेश करणाऱ्यांची संख्या बक्कळ आहे. जनता आणि मतदारांचा भाजपावर नित्यनेमाने वाढणारा विश्वास आणि भाजपाची जनमानसातील वाढती लोकप्रियता हे भाजपाच्या यशाचे गमक आहे. याचीच उलट बाजू पाहिली तर जे पक्ष सोडून राजकारणी भाजपात येत आहेत त्या राजकीय पक्षांनी देखील आत्मपरीक्षण करण्याची हीच खरी वेळ आहे. आपलेच लोक आपला पक्ष का सोडत आहेत, याचे आत्मचिंतन होणे काळाची गरज आहे. काँग्रेससह काही विरोधी पक्षांची अवस्था अशी आहे की, रस्सी जल गयी मगर बल नही गया. आपलेच लोक पक्ष सोडत असतानाही संबंधित पक्षाच्या नेत्यांचा ॲटिट्यूड काही बदलत नसल्याचे दिसून येते. उबाठा, मनसे, काँग्रेस असो की शरद राष्ट्रवादी या पक्षांतून बाहेर पडून भाजपात प्रवेश घेणाऱ्यांची संख्या इतकी मोठी आहे, आता या पक्षांसाठी धक्का, खिंडार असे शब्द देखील प्रभावी ठरत नाहीत. दररोज सकाळी या पक्षाकडून पाहिले जात असेल की, आज कोण गेले.



**प्रशांत माने**
मो.९८८११९१४४३

सोलापूरच्या पक्षबदलाच्या राजकारणाला काही वर्षापूर्वीच सुरुवात झाली आहे. एकेकाळी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादीचा तर सोलापूर शहर काँग्रेसचा बालेकिल्ला होता. २०१४ नंतर आलेल्या मोदी लाटेनंतर दोन्ही काँग्रेसची जिल्ह्यात पुरती वाताहत झाल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे राष्ट्रवादी काँग्रेसच्या वाताहतीला त्यांच्याच पक्षाचे नेतृत्व जबाबदार आहे. कारण पक्षातंर्गत वाद विकोपाला गेल्यानंतरही राष्ट्रवादीच्या शिर्षनेतृत्वांनी मौन बाळगले. जणू काही पक्ष नेतृत्वाच्या मूकसंमतीनेच पक्षातील वाद पेटते राहिले. कालांतराने राष्ट्रवादीतील अनेक दिग्गज राजकीय घराण्यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकला.

काँग्रेसला लागलेली गळती थांबविण्यासाठी काँग्रेसच्या नेत्यांना फेव्हिक्विक देखील लागू पडत नसल्याने ते हतबल असल्याचे चित्र आहे. सोलापुरात काँग्रेसच्या जिल्हा व शहरातील अनेक पदाधिकारी, माजी आमदार, नगरसेवकांनी भाजपाच्या विकासाच्या जहाजात बसणे पसंत केले आहे.

विशेष म्हणजे काँग्रेस सोडताना काँग्रेसला बुडणारी नाव असे म्हणत ते पक्ष सोडत आहेत. लोकसभेला सोलापूर लोकसभेची एक जागा काँग्रेसने राखली खरी पण त्यामागे भाजपाने उमेदवार देताना केलेली गडबडीच कारणीभूत असल्याचे बोलले जाते. विधानसभा निवडणुकीत तर काँग्रेसला जिल्ह्यात एकही आमदारकी राखता आली नाही. अनेक काँग्रेसवासियांनी भाजपात प्रवेश केलाय तर काहींनी भाजपाच्या मित्रपक्षांमध्ये जाणे पसंत केले.

विधानसभा निवडणुकीत तर भाजपाचे मित्रपक्ष एकनाथ शिंदे शिवसेना आणि अजित पवार राष्ट्रवादी यांना सोलापूर जिल्ह्यात शून्य यश मिळाले आहे. त्यामुळे मित्रपक्षांनी देखील भाजपाच्या सहाय्याने महापालिकेत तरी वाटा मिळावा यासाठी महायुती करण्यासाठी प्रयत्न चालवले आहेत. शहरात एकत्रित राष्ट्रवादीची राजकीय स्थिती केविलवाणी होती. गतवेळी महापालिकेत केवळ चार नगरसेवक होते. जागावाटपात सन्मान मिळणार नाही हे ओळखून अजित राष्ट्रवादीच्या स्थानिक नेत्यांनी सोलापुरात एकला चलो रे अशी भूमिका घेतली आहे. पण प्रदेशाध्यक्षांनी मात्र शेवटपर्यंत महायुतीत घुसण्याचा प्रयत्न करण्याचा कानमंत्र स्थानिक नेत्यांना दिल्याचे वृत्त आहे.

कोणी काहीही म्हणा पण आता भाजपातील भरतीला आलेले उधाण काही थांबणार नाही, कारण पक्षातील विरोध धुडकावत पक्ष प्रवेशासाठी सावज शोधणारे पालकमंत्री जयकुमार गोरे हे मुरलेले शिकारी आहेत, हे मात्र नक्की.



कर्नाटकातील होस्पेट येथील शासकीय शाळेत केंद्रीय मंत्री निर्मला सीतारामन् यांच्या हस्ते शनिवारी प्रयोगशाळेचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी विद्यार्थिनींशी सीतारामन् यांनी संवाद साधला

# ओटीटी कन्टेन्टवर 'सेन्सॉर बोर्ड'चा अधिकार नाही

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**

ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रदर्शित होणारा कंटेंट सेन्सॉर बोर्डाच्या अधिकारात येणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी ही माहिती दिली. चित्रपटगृहात दाखवण्यात येणाऱ्या चित्रपटांची तपासणी आणि प्रमाणपत्र देण्याचे काम सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन करते. मात्र, ओटीटी प्लॅटफॉर्मवरील कंटेंटसाठी स्वतंत्र प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. याचे नियमन माहिती तंत्रज्ञान नियम, २०२१ अंतर्गत केले जाते.

सरकारने ओटीटीवर आक्षेपार्ह मजकुरावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि प्रेक्षकांच्या तक्रारींना सोडवण्यासाठी त्रिस्तरीय यंत्रणा लागू केली आहे. यामध्ये पहिला स्तर म्हणजे प्रकाशकाद्वारे स्वतःहून केलेले नियमन, तिथे प्रत्येक प्लॅटफॉर्मवर तक्रार निवारण अधिकारी असणे बंधनकारक आहे. दुसरा स्तर प्रकाशकांच्या स्व-नियामक संस्थांद्वारे देखरेख करण्याचे काम करते आणि तिसरा स्तर म्हणजे केंद्र सरकारची देखरेख यंत्रणा जी अंतिम निर्णय घेऊ शकते. आयटी नियम २०२१ नुसार, ओटीटी प्लॅटफॉर्मला त्यांच्या कंटेंटचे वयोगटानुसार वर्गीकरण करणे अनिवार्य आहे तसेच कायदेशीर बंदी असलेला कोणताही मजकूर प्रकाशित करता येणार नाही. तक्रारींच्या निवारण प्रक्रियेबाबत, जर एखाद्या प्रेक्षकाला ओटीटीवरील मजकुराबाबत तक्रार असेल तर ती प्रथम संबंधित प्लॅटफॉर्मच्या तक्रार निवारण अधिकाऱ्याकडे पाठवली जाते. (वृत्तसंस्था)

# शरीफ हादीच्या मृत्यूनंतर मोहम्मद युनूस अडचणीत

## हंगामी सरकारला २४ तासांचा निर्वाणीचा इशारा

◆ **ढाका, २० डिसेंबर**

इन्कलाब मंचचा कार्यकर्ता शरीफ उस्मान हादीच्या मृत्यूनंतर बांगलादेशातील हंगामी सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांच्यासमोरील अडचणी वाढत आहेत. शरीफवर शनिवारी ढाक्यात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोहम्मद युनूस यांच्यासह हजारो नागरिक उपस्थित होते.

शरीफ हादीवर ढाक्यातील विजयनगर भागात १२ डिसेंबरला दोन अज्ञात हल्लेखोरांनी गोळ्या झाडल्या. मानेत गोळी घुसल्याने गंभीर जखमी झालेल्या हादीवर सिंगापूरमध्ये उपचार सुरू होते. मात्र, गुरूवारी त्याचा मृत्यू झाला. शनिवारी बांगलादेश विद्यापीठ परिसरात त्याचे दफन करण्यात आले. याप्रसंगी हजारो नागरिक उपस्थित होते. हंगामी सरकारचे मुख्य सल्लागार मोहम्मद युनूसही उपस्थित होते.




हादीच्या अंत्यसंस्काराला जमलेले नागरिक

मारेकरी कोण होते ते २४ तासांच्या आता जाहीर करा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, अशी धमकी हादीचा साथीदार अब्दुल अल जुबेरने दिली आहे. हादीच्या मृत्यूनंतर जोपर्यंत बांगलादेशचे अस्तित्व आहे तोपर्यंत हादी सर्वांच्या स्मरणात राहील, असे वक्तव्य त्यांनी केले. दरम्यान, इन्कलाब मंचने हंगामी सरकारला थेट इशारा देताना हादीचे युनूस सरकारवर मोठे दडपण आले आहे. फेब्रुवारी महिन्यात देशात सार्वजनिक निवडणुका होणार असल्याने वातावरण शांत आणि स्थिर ठेवण्याचे आव्हान उभे ठाकले आहे.

दरम्यान, सार्वजनिक निवडणुका टाळण्यासाठी हादीला मारल्याची शंका शेख हसीना सरकारमध्ये मंत्री राहिलेले मोहिबुल हसन यांनी व्यक्त केली आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### आर्यन खानला मिळाला पहिला पुरस्कार



**मुंबई** : शाहरुख खानचा मुलगा आर्यन खान याला त्याच्या कारकीर्दीतील पहिला पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार त्याला त्याने दिग्दर्शित केलेल्या पहिल्या वेब सीरिज 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड'साठी मिळाला. वडिलांप्रमाणे पुरस्कार आवडतात, असे पुरस्कार स्वीकारताना आर्यन म्हणाला. हा सन्मान मात्र त्याने त्याच्या वडिलांना नाही, तर त्याच्या आईला समर्पित केला. त्याला बेस्ट डेब्यू डायरेक्टर ऑफ द इयरचा पुरस्कार देण्यात आला. या प्रसंगी त्याच्यासोबत त्याची आजी सविता छिब्बरही उपस्थित होती. आर्यनने १८ सप्टेंबर रोजी प्रदर्शित झालेल्या 'द बॅड्स ऑफ बॉलिवूड' या वेब सीरिजमधून दिग्दर्शक म्हणून इंडस्ट्रीत पदार्पण केले. ही सीरिज हिंदी चित्रपटसृष्टीवर आधारित एक उपहासात्मक कथा आहे.

### 'धुरंधर'च्या गाण्यावर थिरकला निक जोनस



**मुंबई** : प्रियांका चोप्राचा पती आणि पॉप सिंगर निक जोनसही आता 'धुरंधर' चित्रपटाच्या फॅन लिस्टमध्ये सामील झाला आहे. निकने शुक्रवारी त्याच्या इंस्टाग्रामवर एक छोटा व्हिडीओ शेअर केला आहे. यात तो चित्रपटाच्या 'शरारत' गाण्यावर नृत्य करताना दिसतो आहे. व्हिडीओमध्ये त्याच्यासोबत त्याचे भाऊही थिरकताना दिसत आहेत. व्हिडीओ शेअर करत निकने नया प्री-शो हाइप सॉन्ग अनलॉक्ड, असे कॅप्शनमध्ये लिहिले आहे. निकची पोस्ट समाज माध्यम युजर्सना खूप आवडत आहे. रणवीरने निकच्या पोस्टवर मजेदार प्रतिक्रिया दिली आहे. चित्रपटाचे दिग्दर्शक आदित्य धर यांनीही कमेंट केली आहे.

### 'हॅपी पटेल खतरनाक जासूस'चा ट्रेलर प्रदर्शित




**मुंबई** : बॉलिवूडमध्ये आमिर खान प्रोडक्शन्सचा 'हॅपी पटेल खतरनाक जासूस' चित्रपट येत आहे. या चित्रपटाचा नुकताच एक ट्रेलर प्रदर्शित झाला आहे. हा एक स्पाय कॉमेडी चित्रपट आहे. यातील गुप्तहेराची भूमिका वेगळ्या अंदाजात असून ती अनोख्या पद्धतीने सादर करण्यात आली आहे. ट्रेलरमध्ये 'हॅपी पटेल' खतरनाक जासूस आहे. पण त्याची स्टाईल, व्यवहार, विनोदी शैली सर्वकाही खूपच अफलातून आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन वीर दास यांनी केले आहे. चित्रपटात मोना सिंह महत्त्वाच्या भूमिकेत असून आता चित्रपट प्रदर्शित होण्याची उत्सुकता सर्वांना आहे.

# मुस्लिम देशांमध्ये भारतीय अवयवांची तस्करी

◆ **नवी दिल्ली, २० डिसेंबर**


काही बेकायदेशीर अवयवदान करणाऱ्या टोळ्यांनी भारतीय नागरिकांचे अवयव मुस्लिम देशांमध्ये विकले आहेत, असे केरळमध्ये सुरू असलेल्या एका प्रकरणाच्या चौकशीत राष्ट्रीय तपास संस्थेला आढळले. या वर्षी ओडिशाहून दोन लोकांना इराणव्यतिरिक्त ताजिकिस्तानला पाठवण्यात आले. तिथे श्रीमंत व्यक्तींवर त्यांचे मूत्रपिंड प्रत्यारोपित केले गेले, असे एनआयएने न्यायालयात सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात उघड झाले. या प्रकरणाची सुरुवात १८ मे २०२४ रोजी झाली. कोची विमानतळावर इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी साजिथ नावाच्या व्यक्तीला संघटित अवयव तस्करीत भाग असल्याच्या संशयावर ताब्यात घेतले.

विजयवाड्यातील रहिवासी साजिथ आणि बेल्लमकोंडा राम प्रसाद यांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणातील मुख्य आरोपी मधु जयकुमार आहे. तो एक वर्षाहून अधिक काळ फरार होता. त्याला ७ नोव्हेंबर २०२५ रोजी नवी दिल्ली विमानतळावर अटक करण्यात आली. एनआयएच्या प्रतिज्ञापत्रानुसार, चौकशी दरम्यान जयकुमारने इराणमध्ये मूत्रपिंड प्रत्यारोपण केलेल्या २७ प्राप्तकर्त्यांची नावे उघड केली. तसेच ११ देणगीदारांची माहितीही त्याने दिली. एनआयएने जयकुमारच्या कोठडीची मुदत वाढवून त्याचा बेकायदेशीर अवयव व्यापारातून मिळालेल्या पैशाचा तपास करण्याची मागणी केली आहे. (वृत्तसंस्था)

# सापांपासून प्रेरणा घेऊन बनवला कॅमेरा

◆ **बीजिंग, २० डिसेंबर**

विज्ञानाच्या जगात निसर्गाकडून प्रेरणा घेऊन अनेक शोध लावले जातात. चीनमधील शास्त्रज्ञांनी असाच एक शोध लावला आहे. त्यांनी सापांच्या उष्णता शोधण्याच्या क्षमतेचा म्हणजेच हिट सेन्सिंगचा आधार घेऊन एक अत्याधुनिक आर्टिफिशिअल इमेजिंग सिस्टम विकसित केली आहे. हा जगातील पहिलाच असा सेन्सर आहे जो पूर्ण अंधारातही '४के रिझोल्यूशन' (३,८४० बाय २,१६० पिक्सेल्स) मध्ये इन्फ्रारेड फोटो घेऊ शकतो.



'पिट वायपर्स' सारख्या काही सापांच्या प्रजातींकडे नाकाच्या जवळ 'पिट ऑर्गन' नावाचे एक विशेष अंग असते. हे अंग त्यांना अंधारात भक्ष्याकडून उत्सर्जित होणारी उष्णता (इन्फ्रारेड लहरी) पाहण्यास मदत करते. याच संकल्पनेचा वापर करून 'बीजिंग इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी'च्या शास्त्रज्ञांनी नवीन तंत्रज्ञान विकसित केले आहे. ज्या वस्तूचे तापमान उणे २७३ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असते, त्यातून इन्फ्रारेड लहरी बाहेर पडतात. शास्त्रज्ञांनी या लहरी टिपण्यासाठी एका ८ इंची डिस्कवर विविध थरांची मांडणी केली. पहिल्या थरावर क्वांटम डॉट्स् लेयर आहे. यात मर्क्युरी आणि टेल्युरियमपासून बनलेले सूक्ष्म कण आहेत. ते इन्फ्रारेड लहरी शोषून घेतल्यावर विद्युत प्रभार तयार करतात. दुसऱ्या थरावर अपकन्व्हर्टर लेयर आहे. हे विद्युत प्रभार एका विशिष्ट लेयरमधून जातात. तिथे त्यांचे रूपांतर हिरव्या दृश्य प्रकाशामध्ये केले जाते. तिसऱ्या थरावर सेन्सर आहे. अखेरीस हा प्रकाश एका सेन्सरद्वारे हाय-रिझोल्यूशन प्रतिमेत रूपांतरित होतो.

**फोटोग्राफी क्षेत्रात क्रांतीची शक्यता**

चिनी शास्त्रज्ञांनी विकसित केलेल्या या तंत्रज्ञानात सर्व लेयर्स एकावर एक असल्याने संकेतांची हानी होत नाही आणि कूलिंगची गरज भासत नाही. हे संशोधन २० ऑगस्ट रोजी प्रसिद्ध 'नेचर' या नियतकालिकेमध्ये प्रकाशित करण्यात आले आहे. हे तंत्रज्ञान भविष्यात संरक्षण क्षेत्र, वैद्यकीय तपासणी आणि रात्रीच्या वेळी केल्या जाणाऱ्या फोटोग्राफीमध्ये मोठी क्रांती घडवून आणू शकते. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## रोखठोक

# देवाचे दुसरे नाव...

**दिनेश गुणे**

अलिकडे समाज माध्यमांवर एक विनोद वेगाने फैलावला आहे. 'स्वच्छ भारत मोहीम महाराष्ट्रात शंभर टक्के यशस्वी होणार आणि राज्यात स्वैरपणे वावरणाऱ्या बिबट्यांचा त्या यशामध्ये सिंहाचा वाटा असणार' असा हा विनोद खरे म्हणजे अस्वस्थ करणारा, विरोधाभासावर बोट ठेवणारा म्हणावा लागेल. पण या निमित्ताने, स्वच्छ भारत मोहीम नावाचे एक राष्ट्रीय जनआंदोलन पुन्हा एकदा लोकांच्या चर्चेत आले, याची खात्री पटते.

विरंगुळ्यासाठी असे काही समाजमाध्यमी साहित्य पचवून झाले की आपण आपल्या उद्योगाकडे वळतो. काहीच काम नसेल, तर जुने काहीतरी वाचत, ऐकत किंवा न्याहाळत बसतो. परवा माझेही तसेच झाले. काशी विश्वेश्वरधाम प्रकल्पाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने पंतप्रधानांचे एक जुने भाषण ऐकत मी घराच्या खिडकीत बसलो होतो आणि त्यांच्या भाषणातही स्वच्छ भारत मोहिमेचा तो उल्लेख ऐकला. पंतप्रधानांनी एखादी मोहीम सुरू केली की त्याचा सातत्याने पाठपुरावा करून समाजास सातत्याने त्याची आठवण करून देण्याची त्यांची सवय एव्हाना देशाला माहीत झाली आहे. त्या भाषणात स्वच्छ भारत मोहिमेचा उल्लेख पुन्हा ऐकला, तेव्हा मी खिडकीतून बाहेरचा परिसर निरुद्देशपणे न्याहाळत होतो...

मुंबईच्या पश्चिम उपनगरातील आमच्या घरापासून थोड्याच अंतरावर एक नाला आहे. कधीकाळी ती नदी, खाडी असावी एवढे ऐसपैस पात्र आहे त्याचे. खूप वर्षांपूर्वी आम्ही या घरात राहायला आलो, तेव्हा ती वाहती नदीच होती. थंडीच्या दिवसांत पहाटे त्या पात्रातील पाण्यावर वाफांची वर्तुळे नृत्य करायची आणि काठावर ध्यान करून बसलेले बगळे अचानक पाण्यात चोची बुडवून एखादा मासा गट्टम करायची. सकाळी उठून खिडकीबाहेर पाहिल्यावर दिसणाऱ्या या दृश्याला भुलून आम्ही हे घर घेतलं, तेव्हा भविष्याची जरादेखील शंका मनात डोकावली नव्हती. आता त्या नाल्यातून रसायनमिश्रित काळे पाणी वाहते. आता काठावर बगळे नाहीत, कावळे कलकलाट करत असतात. भरतीची वेळ सोडली, तर त्या नाल्यातलं ते प्रदूषित रसायन एकाच जागी संथ साचल्यागत स्वस्थ असतं. कधीतरी एखादा डंपर येतो आणि त्या काळ्या पाण्यात ट्रकभर कचरा ओतला जातो. कुणीतरी रस्त्यावरून जाता जाता पुलावर थांबून कचरा किंवा टाकाऊ वस्तूंनी भरलेली प्लॅस्टिकची पिशवी फेकतं. त्या संथ साचलेपणात थोडीशी खळबळ माजते. काही क्षण नाला ढवळला जातो आणि पुन्हा साचलेलं काळं पाणी संथ होऊ लागतं. कचरा आणि टाकाऊ वस्तूंचे ढिगारे माजले की, ते काळं पाणी संकोचून काठाकडचा कोपऱ्यात जमा होऊ लागतं, तोवर पावसाळ्याची चाहूल सुरू होते. मग महापालिका नालेसफाई वगैरे कार्यक्रम हाती घेते आणि मोठमोठी पोकलेनसारखी यंत्रे काठावर धडधडू लागता. काळं पाणी ढवळून निघतं. आधी टाकलेला कचरा उचलण्याचा कार्यक्रम घाईघाईने पार पाडून गाड्या निघून जातात आणि काळं पाणी उरलेला कचरा कवटाळत पुन्हा जागच्या जागी साचून स्वस्थ बसतं.

पंतप्रधानांच्या भाषणातील स्वच्छ भारत मोहिमेचा उल्लेख कानावर पडला, तेव्हा मी किड्यांच्या वळवळण्यामुळे अस्वस्थ झालेल्या त्या काळ्या डबक्याकडे पाहात होतो. मला अलिकडे ते पाहताना आनंद वगैरे होत नाही. आता तो नाला पुन्हा पहिलेसारखा नदी होऊन नितळ पाण्याने वाहू लागणार नाही, याची मला पुरती खात्री असल्याने, नाल्याचे वास्तव मी मान्य केले आहे. नदीचा नाला होऊन पाण्याची जागा रसायनमिश्रित द्रवपदार्थांनी घेतली हा त्या नाल्याचा नव्हे, तर माणसाचाच दोष आहे, हे माहीत असूनही आपल्याला लाज का वाटली नाही असा विचारही मनात आला. त्याच वेळी स्वच्छ भारत मोहिमेचे काहीसे हसू देखील आले. स्वच्छता हा कोट्यवधी रुपये खर्चाचा सरकारी कार्यक्रम करावा लागतो, हा मानसिक विकासाच्या अनुशेषाचाच परिणाम आहे, हेही जाणवले आणि विचार करत करत मन मागे गेले.

पंतप्रधानांचं भाषण ऐकत असतानाच खिडकीतून पुन्हा माझी नजर त्या नाल्यात साचलेल्या काळ्या पाण्यावर पडली. आता पाण्याचे कोणतेच गुण त्याच्या अंगी राहिलेले नाहीत. त्यामध्ये मासा शोधूनही सापडणार नाही, पण त्याच्या तेलकट तवंगावर किडे वळवळताना दिसतात. उन्हाची किरणं त्या तवंगावर पडली की वळवळणाऱ्या किड्यांच्या हालचालींनी नाला अस्वस्थ चुळबुळताना दिसतो. कदाचित त्यातल्या रसायनालादेखील एकाच जागी साचल्याचा कंटाळा येत असावा...

मुंबईच्या मध्यावरून मिठी नदी वाहते. तिला अजूनही नदी म्हणत असले, तरी तो आता असाच एक नाला आहे. रसायनमिश्रित द्रवपदार्थ, कचरा आणि टाकाऊ म्हणून नकोसे झालेल्या असंख्य वस्तू पोटात घेणारे ते हक्काचे ठिकाण झाले आहे. काही वर्षांपूर्वी, मुंबईत वाझे नावाच्या पोलिस अधिकाऱ्यावर खंडणी वसुली प्रकरणी कारवाई सुरू झाल्यावर तर, या मिठीच्या पोटातून संगणक आणि महत्त्वाची माहिती असलेल्या हार्ड डिस्कस् देखील बाहेर काढल्या गेल्या होत्या. असंख्य गुन्ह्यांचे पुरावेदेखील या नाल्याच्या पोटात गडप झाले असल्याची वदंता आहे. तरीही पश्चिम उपनगरांतील अनेक जण उपनगरी गाड्यांतून ये-जा करताना सोबतच्या प्लॅस्टिकच्या पिशवीतून आणलेले निर्माल्य, नारळ, पूजेचे साहित्य वगैरे वस्तू गाडी पुलावर आली की भक्तिभावाने मिठी नदीत फेकतात आणि नमस्कारही करतात. हेही मानसिकतेचेच एक रूप असते.

ते भाषण ऐकताना, स्वच्छ भारताच्या मुद्यापाठोपाठ मनात साचलेली ही काही दृश्ये जिवंत झाली आणि स्वच्छता हे मानसिक विकासाचे पहिले लक्षण आहे, असा निष्कर्ष मी काढला. आजकाल मुंबईत स्वच्छता राखण्यासाठी, रस्त्याकडेच्या भिंतींवर देवतांच्या वगैरे प्रतिमा रंगविल्या जातात. देवादिकांचे फोटोही लावले जातात. त्यांच्यासमोर कचरा वगैरे फेकण्याएवढा बेमुर्वतपणा माणसाच्या अंगी सरसकटपणे नसतो, असा त्यामागचा विचार असावा. पण



स्वच्छतेचे महत्त्व सांगणाऱ्या एखाद्या होर्डिंगच्या खालीच कचरापट्टी झालेलीही इथे पाहायला मिळते. मानसिक विकासाचा अनुशेष भरून काढायला आपल्याला किती वर्षे लागणार, या विचाराने मनात काहूर माजते. पंतप्रधान मात्र, आपल्या प्रत्येक भाषणात स्वच्छ भारताचा मंत्र देतच असतात...

अकरा वर्षांपूर्वी, २ ऑक्टोबर २०१४ रोजी गांधी जयंतीदिनी स्वच्छ भारत नारा देशभरात घुमला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्वतः झाडू हातात घेऊन राजघाटावर स्वच्छता करत या मोहिमेची सुरुवात केली आणि देशातील चार हजार शहरांमध्ये रस्ते, नद्या आणि परिसराच्या स्वच्छतेचा संकल्प सोडला गेला. राष्ट्रीय पातळीवर ही मोहीम राबविण्यासाठी देशातील ३० लाख सरकारी कर्मचारी या मोहिमेत सहभागी होतील आणि २०१९ मध्ये महात्मा गांधींच्या १५० व्या जयंतीदिनी स्वच्छ भारताची त्यांची इच्छा पूर्ण केली जाईल, असा विश्वास पंतप्रधानांनी त्या दिवशी व्यक्त केला. यापुढे या देशात कोणीही कचरा करणार नाही आणि कोणीही कोणासही कचरा करू देणार नाही, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली आणि देशातील प्रत्येक नागरिकाने या राष्ट्रीय मोहिमेत सहभागी होऊन देश स्वच्छ राखावा, असे आवाहनही केले...

आता या मोहिमेने जनआंदोलनाचे रूप घेतले आहे, स्वच्छ भारत हा नारा देशाच्या नव्हे, जगाच्या कानाकोपऱ्यात पोहोचला आहे आणि या मोहिमेच्या यशाकडे उभे जग उत्सुकतेने पाहात आहे, असे म्हटले जाते. म्हणूनच, दहा-अकरा वर्षांनंतर आसपास पाहताना सहज दिसणाऱ्या काही बाबी नोंद करून ठेवाव्या असे वाटले...

स्वच्छता हे देवाचे दुसरे नाव आहे असा संदेश मिरवत यच्चयावत देवप्रतिमांपासून साईबाबांपर्यंत सारे रस्तोरस्तीच्या भिंतींवर वर्षानुवर्षे असूनही, अस्वच्छतेचा कलंक माथी मिरविण्याची सवय संपली नव्हती, ती या एका नाऱ्याने नष्ट होईल यावर विश्वास ठेवण्यासारखी परिस्थिती अजूनही निर्माण झालेली नाही. पंतप्रधानांनी ज्या विश्वासाने देशातील जनतेच्या खांद्यावर स्वच्छतेच्या जबाबदारीची पालखी सोपविली, ती पेलण्यासाठी अजूनही जनतेचे खांदे पुरेसे सक्षम झालेले नसावेत असे वाटण्याजोगी स्थिती आजही जागोजागी अनुभवास येते. आसपासच्या सहज जाणवणाऱ्या एखाद्या प्रसंगातून ही खंत उगीचच डोके वर काढू लागते.

कालच, एका शेअर रिक्षाने प्रवास करतानाच्या एका प्रसंगामुळे असं वाटायला लागलं. धूर, गाड्यांचे कर्कश हॉर्न, गर्दीचा सरमिसळलेला आवाज आणि प्रचंड वाहतूक कोंडीच्या पसाऱ्यातून कशीबशी वाट काढत आमची रिक्षा एका सिग्नलजवळ थांबली. रिक्षाचालकाने इकडेतिकडे पाहिले आणि गुटखा, मावा किंवा तंबाखूचा तोबरा भरून तोंडाचे तळे होईपर्यंत साठविलेली थुंकीची पिंक रस्त्यावर मोकळी करून ढणाढण वाजणाऱ्या गाण्याच्या सुरात त्याने आपलाही सूर मिसळला. पुढचा सिग्नल येईपर्यंत पुन्हा त्याचे तोंड भरले होते. या सिग्नलला थांबताच तो पुन्हा पचकन थुंकला. एक गिळगिळीत शहारा अंगावर आल्याने न राहवून मी त्या रिक्षावाल्याला सुनावू लागलो. बाजूचे दोन सहप्रवासीही साथीला आले. पण त्याचा काहीच परिणाम झाला नव्हता. एवढे ऐकल्यानंतरही, काही फरक पडल्याची एकही रेषा रिक्षावाल्याच्या चेहऱ्यावर उमटली नव्हती.

''भैया, जिस रस्तेपर गाडी चलाके रोजीरोटी कमाते हो, उसीपर थूकते हुए शरम नहीं लगती क्या?'' शेजारच्या प्रवाशाने तळमळून प्रश्न केला आणि रिक्षावाल्याने मागे वळून पाहिले. तोच थंडपणा त्याच्या चेहऱ्यावर होता.

''देखो साब, मेरी रोजीरोटी इस रिक्षा से चलती है... रस्तेपरसे नहीं और रही बात, शरम लगनेकी... मुझे बताईये, रस्तेपर थूकनेवाला मैं अकेलाही हूँ क्या?... तो मेरे ना थूकनेसे क्या आपको लगता है कि मुंबई साफ रहेगी?... मैं तो थुकूंगा. और एक बात. मैं पूरा दिन रस्तेपर ही गाडी चलाता रहता हू... बीच में कभी पेशाब के लिए रुकना तो पडता है ना?... लेकिन अगर जगहजगह पर पेशाबघर हैही नहीं, तो क्या मैं ऐसेही, किसी रस्ते के बाजू में खडा होकर पेशाब नहीं करूंगा?... इससे भी तो गंदगी होती है. क्या उस गंदगी के लिए आप मुझे जिम्मेदार ठहराओगे या सिस्टमको?''

...उत्तराची वाट न पाहता रिक्षावाला समोर बघू लागला. सिग्नल पडला आणि पुन्हा एकदा रस्त्यावर पचकन थुंकून त्याने गाडी दामटली!

एका जुन्या पावसाळी दिवशी, मुंबईच्या रस्त्यावरून प्रवास करताना आलेला असाच एक अनुभव... 'बेस्ट'ची एक खच्चून भरलेली बस. पुरुष प्रवासी पॅसेजमधेही उभे आहेत. महिलांसाठी राखीव बाकडी मात्र, एका महिला प्रवाशासाठी पूर्ण बाकडे अशा हिशेबाने भरलेले! लक्षपूर्वक ध्यान दिले, तर जवळपास प्रत्येक महिलेच्या चेहऱ्यावर, पुरुष प्रवाशांना खुन्नस दिल्याचा भाव दिसतोय! अचानक पावसाची सणसणीत सर आल्याने खिडक्यांच्या काचा फटाफट खाली ओढल्या जातात आणि पावसामुळे ट्रॅफिकही जाम होते. कितीतरी वेळ गाडी जागेवरच उभी होती! दोन-चार मिनिटांत उकाड्याने गर्दी कासावीस होऊ लागते. घामाच्या धारा सुरू होतात. अशा वेळी अस्वस्थता येते. चिडचिड होते. गर्दीतल्या कुणाचा स्पर्शही नकोसा वाटू लागतो आणि आपण असे हाल सोसत असताना दुसरं कुणी मात्र आराम एन्जॉय करतोय हे पाहणे तर आणखीनच बेचैन करणारे असते! अशाच वातावरणात, महिलांसाठी राखीव असलेल्या एका बाकड्यावर ऐसपैस बसलेल्या एका प्रवासी महिलेने पर्स उघडली. कंगवा काढला. केस मोकळे करून मनसोक्त मान हलवली. एखाद्या मोराने पिसारा फुलवून थिरकवावा, तसे आपले केस मान हलवूनच फुलविले आणि भरलेल्या बसमध्ये, स्वमग्नपणे, आत्मानंदी टाळी लागल्याच्या पारमार्थिक आनंदात, केस विंचरण्याचा सोहळा सुरू झाला... केसातून फिरणारा कंगवा बाहेर आला की त्यात अडकलेली गुंतवळ बोटाने सोडवून केसांना अलगदपणे बसमध्येच सीटखाली सोडणे सुरू झाले. केसांची गुंतवळ एकत्र केली तर बचकाभर तरी होईल, असे ते ऐतिहासिक दृश्य पाहणाऱ्या प्रत्येक प्रवाशास वाटत असावे, हे त्यांच्या मळमळलेल्या चेहऱ्यांवरच दिसत होते. ती महिला मात्र, आसपासची तमा न करता, बसला कचराकुंडी समजून केसांची गुंतवळ अर्पण करतच होती.

.... वाहतूक कोंडीत खोळंबून थांबलेल्या बसमधूनच रस्त्याकडेच्या एका भिंतीवर स्वच्छ भारतच्या जाहीरातीचे भलेमोठे पोस्टर दिसत होते. त्यावर मोदींचं चित्र पाहून एक प्रवासी उखडला.

''ये अकेला आदमी क्या करेगा स्वच्छ भारत?'' तो जोरात बोलला.

गर्दीकडे लक्षही न देता आत्ममग्नपणे केस विंचरणाऱ्या त्या महिलेने कंगव्यातला अखेरचा पुंजका सीटखाली सोडला आणि केस पुन्हा बांधून ती नीटनेटकी झाली! स्वच्छ!!

...पण अजूनही या मोहिमेच्या यशाची आशा संपलेली नाही. स्वच्छता हे देवाचे दुसरे नाव आहे, हा सुविचार एव्हाना मुंबईसारख्या महानगरातील रस्त्यारस्त्यावर दिसूही लागला आहे. रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या प्रत्येकास तो पाठ झाला आहे आणि मोदी नावाच्या माणसाने देशात राष्ट्रीय स्तरावर स्वच्छतेची मोहीम सुरू करून महात्मा गांधींचे स्वच्छ भारताचे स्वप्न साकार करण्याचा ध्यास अजूनही सोडलेला नाही, हेही अनेकांस माहीत आहे. कदाचित म्हणूनच, एखादा टाकाऊ कागद, प्लॅस्टिक, बाटली वगैरे वस्तू वापर संपताच लगेचच फेकून देण्याआधी लोक हळूच इकडेतिकडे पाहातात, असे लक्षात येते. आपल्याला कुणी पाहात नाहीये ना, याची खात्री झाल्यावर मगच या वस्तू इतस्ततः फेकाव्यात एवढी समज निर्माण झाली आहे... याचा अर्थ, पहिलेसारखा बेदरकारपणा आता अशा कृतीत फारसा दिसत नाही.

एवढ्या बदलास दहा वर्षे लागली असा हिशेब केला, तर वाटेल तेथे फेकून कचरा माजवू नये हा संपूर्ण विचार मनात रुजण्यासाठी पुढची पंचवीस वर्षे तरी लागतील, असा अंदाज आहे. तसेही, उत्क्रांती ही संथपणे पुढे सरकणारीच प्रक्रिया आहे.

माणसाला पूर्वी शेपूट होते असे म्हणतात. ते नष्ट व्हायला हजारो वर्षांची वाट पाहावी लागली होतीच की!

dineshgune@gmail.com

## रविवारची पत्रे

### प्रवास अपूर्णतेकडून पूर्णतेकडे...

'ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णमेवावशिष्यते । ॐ शांति शांति शांतिः' हा शांतिमंत्र अनेक वर्षांपासून आपण ऐकतो आहे, वाचतो आहे, समजून घेण्याचा प्रयत्न करतो आहे. जेथून उत्पन्न झालो ते पूर्ण, जिथे स्थित आहोत तेही पूर्ण, त्या पूर्णातून काढले तेही पूर्ण, त्या पूर्णात सामावले तेही पूर्ण, असे उपनिषदे सांगतात. गुरुमुखातून अनेकदा ऐकले, तरीही अपूर्णतेची जाणीव सतत का होत असते? ही विष्णू माया अनेक ज्ञानी लोकांना पुनःपुन्हा त्या मायेत अडकवते. ग्रंथसंपदा ग्रंथी सोडवतात म्हणे! अनेक ग्रंथ, पुस्तके, गाथा जवळ असल्या, तरीही त्यातील काय घ्यावे हे कोण सांगणार? प्रस्थान त्रयींमध्ये आपल्या ऋषिमुनींनी सांगितले आहे, श्रवण, मनन,? निदिध्यासन. म्हणजेच ग्रंथ आपल्याला कोणती शिकवण देत आहे, हे श्रवणाने उमगते. त्यातून काय साध्य करायचे आहे, हे प्रवचनातून समजले की, त्यानंतरच ग्रंथ वाचनाने काहीतरी आकलन होते. पूर्ण ब्रह्मांडाचे ज्ञान जरी झाले तरी तो ब्रह्मांड निर्माण करणाऱ्याचा शोध लागत नाही. तो 'दशांगुळे उरला' असे ज्ञानी म्हणतात. तत्त्वज्ञानाने मनाची शांती होत नाही. बालवाडीतील शिक्षिका बोट धरून भौतिक शिक्षणाचे धडे गिरवून घेतात. जगण्याचे धडे कोणी शिकवावे? येथे एकनाथांची शिकवण आठवते.

**'जरी होते ग्रंथ गुरू तरी का घेणे लागे अवतारु'**

प्रत्येक अपत्याच्या वृत्तीनुसार, पिंडानुसार आई आपल्या बाळाला घास भरवते, वाढवते, काळजी घेते. गुरुमाउली तशाच प्रकारे शिष्यास सांभाळते. मनुष्याचा एकांगी दृष्टिकोन बदलावा. आधिभौतिक प्रगती, आधिदैविक शक्ती, आध्यात्मिक समाधान या तिन्ही अंगाने शिष्याचा विकास साधण्यासाठी प्रयत्न करते. याच त्रिविध तापांतून होरपळलेल्या जिवाला ईश्वरभक्तीची फुंकर गुरुमाउली घालते. प्रपंचात येणाऱ्या सुख-दुःखाला सामोरे जाण्याचे बळ देते. गरुडझेप घालून येणाऱ्या दुःखाने उद्ध्वस्त झालेल्या तनाला मनाला शांती मिळावी म्हणून प्रयत्न करते. गुरू वाक्य कानावर पडले की समाधानाचा, तृप्तीचा भाव जाणवतो. मात्र, काही क्षणातच पुन्हा मायेच्या, मोहाच्या, ममत्वाच्या गर्तेत मनुष्य सापडतो.

**'बहुत सुकृताची जोडी म्हणुनी विठ्ठली आवडी ।'**

गतजन्मीचे कर्म साथीला होते म्हणून भगवतीची उपासना घडली. सद्गुरूंचे चरणी नतमस्तक होणे घडले. देहधारी होऊन ईश्वर आपल्यासाठी ईश्वरतुल्य गुरुदेव पाठवतो. गुरू मळलेल्या, माखलेल्या या साधकाला शिष्यत्व बहाल करतात. त्याला स्वच्छ करून ईश्वराकडे जाण्याच्या मार्गावर अलगदपणे पोहोचवतात. प्रारब्धातील घटनेला अनुसरून आपण स्वतःला सांभाळावे असे शिकवतात, बळ देतात. अनपेक्षित धक्क्याने कोसळलेल्या, कोलमडून पडलेल्या, उन्मळून पडलेल्या या साधकाला पुन्हा नव्याने उभं राहायला मदत करतात. 'पुन्हा नव्याने जन्मले मी' ही भावना मनात येईपर्यंत गुरुमाउली सांभाळते. भौतिक सुखाच्या सोहळ्यात तू जशी समरसून जातेस तशीच आत्मिक सुखाच्या आनंदात रमशील, असे शिवधनुष्य माउली नादान लेकरासाठी उचलते. आधिदैविक, आधिभौतिक, आध्यात्मिक अशा तीनही शांतीच्या या मंत्राच्या अनुभूतीसाठी गुरुकृपा हवी. गुरूंचा वरदहस्त हवाच. कुलमातेचा आशीर्वाद हवा. कर्तव्याचा मार्ग दाखविणाऱ्या गुरू चरणी समर्पित व्हावे, असे आशीर्वादही गुरूने द्यावेत, भगवतीने द्यावेत, एवढेच.

॥ अवधूत चिंतन श्री गुरुदेव दत्त ॥

**डॉ. उज्ज्वला सतीश देशमुख**/९४२२८०७२४७

### श्री नृसिंह सरस्वती महाराज जयंती

श्री नृसिंह सरस्वती महाराज यांची जयंती, यावर्षी पौष शुद्ध द्वितीया म्हणजे २२ डिसेंबरला आहे. श्री दत्तात्रेयांचे दुसरे अवतार श्री नृसिंह सरस्वती महाराज यांचा जन्म १३७८ साली विदर्भातील कारंजा लाड येथे झाला. श्रीपाद श्रीवल्लभ यांच्या नंतरचे दत्तात्रेयांचे पूर्ण अवतार नृसिंह सरस्वती स्वामींना मानले जाते. नृसिंह सरस्वती हे संन्यासी होते. श्री गुरुचरित्र या दत्त संप्रदायातील वेदतुल्य ग्रंथांमध्ये श्री नृसिंह सरस्वती महाराजांचे जीवनकार्य आणि लीलांचे वर्णन आले आहे. हा ग्रंथ दत्तभक्तांचा वेद मानला जातो. नृसिंह सरस्वती महाराजांमुळे महाराष्ट्रात दत्त संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात प्रसार झाला. गुरुचरित्र कथेनुसार नृसिंह सरस्वती यांनी जन्मताच ओंकाराचा उच्चार केला .सात वर्षे ते याशिवाय एकही शब्द बोलले नाही. त्यानंतर त्यांनी माता-पित्यांना उपनयन करण्याविषयी सुचविले. उपनयन होताच त्यांच्या मुखातून वेदवाणी बाहेर पडली. त्यानंतर ते माता-पित्यांचा आशीर्वाद घेऊन बद्रिकेदार येथे गेले. काशी मुक्कामी त्यांना संन्यासी कृष्ण सरस्वती यांनी संन्यास दीक्षा दिली. त्यानंतर एकदाच ते कारंजाला आले. नंतर सतत भ्रमंतीवरच राहिले. अमरापूर या कृष्णा पंचगंगा संगम असलेल्या गावी ते बारा वर्षे राहिले. त्यांच्या या प्रदीर्घ निवासामुळे या गावाला नृसिंहवाडी म्हणजेच नरसोबाची वाडी हे नाव पडले.

त्यानंतर गाणगापुरी (भीमा- अमरजा नद्यांचा संगम असलेलं कर्नाटकातील गाव) ते २४ वर्षे राहिले. नृसिंह सरस्वतींनी श्रीपाद श्रीवल्लभांचे कार्य पुढे चालवले आणि दत्त संप्रदायाचा प्रसार केला. त्यांनी संपूर्ण भारतातच संचार केला. त्यांचा मोठा शिष्यवर्ग तयार झाला. त्यांचे प्रमुख सात शिष्य होते. माधव सरस्वती, कृष्ण सरस्वती, बाळकृष्ण सरस्वती, उपेंद्र सरस्वती, सदानंद सरस्वती, ज्ञानज्योती सरस्वती आणि सिद्ध सरस्वती. यांनीही दत्तपरंपरेचा प्रसार केला. स्वामींनी जिथे जिथे तपश्चर्या केली, कार्य केले, ती ठिकाणे औदुंबर, नृसिंहवाडी, गाणगापूर ही दत्त संप्रदायातील अतिशय पवित्र स्थाने झाली. त्यांच्याच कार्यकाळात श्री गुरुचरित्र हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाची महाराष्ट्रात दत्तभक्त पारायण करतात. नृसिंह सरस्वती हे या ग्रंथाचे चरित्र नायक आहेत. गुरुचरित्राच्या ११ ते ५१ या अध्यायात त्यांचे लीला चरित्र आले आहे. नरसोबाची वाडी, औदुंबर आणि गाणगापूर येथे त्यांच्या पादुका असून, लाखो भक्त दर्शनासाठी आणि सेवेसाठी येतात. दत्त जयंतीला सप्ताहात लाखो दत्तभक्त श्री गुरुचरित्राचे पारायण करतात आणि अनुभूती घेतात. कारंज्याला त्यांच्या जयंतीपासून त्यांच्या शैलागमनापर्यंत दीड महिना उत्सव असतो. या पुण्यकाळात दत्तभक्तांनी नक्की कारंजाला भेट द्यावी.

**माधवी पत्की**/नागपूर

### बांगलादेशातील जिहादी उन्माद




काल बांगलादेशात घडलेली घटना ही केवळ एका देशातील बातमी नाही; ती काळाच्या कपाळावर कोरलेली चेतावनी आहे. एका हिंदू युवकाला झाडाला बांधून जिवंत जाळले गेले आणि त्या अमानुष क्षणी जमावाच्या तोंडून अल्लाहू अकबरचे नारे निघाले. ही कट्टर जिहादी विकृत मानसिकतेची रणभेरी होती. ही आग शरीरापुरती मर्यादित नव्हती; ती माणुसकीच्या मुळांनाच जाळणारी होती. जिथे धर्म करुणेऐवजी क्रौर्य शिकवू लागतो, तिथे तो धर्म राहत नाही तो जिहादी उन्माद बनतो.

कट्टरतावादाचा चेहरा नेहमीच एकसारखा असतो: तो प्रश्नांना घाबरतो, विचारांना दडपतो आणि भीतीला देवत्व बहाल करतो. जमावाच्या नशेत विवेक हरवतो आणि मग माणूस माणसाचा शत्रू ठरतो. अशा उन्मादात सत्य गुदमरते, न्याय पळून जातो आणि कायदा थरथरतो. आज शेजारी घडलेली ही घटना उद्याचा आपला आरसा ठरू शकते जर आपण डोळे उघडे ठेवले नाहीत तर. भारताने शतकानुशतके सहअस्तित्वाचा धडा दिला आहे. इथल्या हिंदूने कधीही गैर हिंदूंना त्रास दिलेला नाही किंवा त्यांच्या विरोधात धार्मिक उन्मादाचे प्रकटीकरण सुद्धा केले नाही. परंतु हिंदूंच्या या सौजन्यतेचा अनेकदा चुकीचा अर्थ घेतला गेला आणि त्यांना सॉफ्ट टार्गेट समजून त्यांच्या श्रद्धा आणि मानबिंदूंवर आघात करण्यात आला. हिंदू समाज जैविकदृष्ट्या सहिष्णूच आहे. पण सहिष्णुतेचा अर्थ आत्मसमर्पण नसतो. शांततेचा अर्थ अन्याय सहन करणे नसतो. जिथे निर्दोषाला लक्ष्य केले जाते, तिथे ठाम भूमिका घेऊन प्रतिकार करणे हाच सहिष्णुतेचा खरा अर्थ आहे.

हिंदूंनी आणि समाजातील प्रत्येक सजग नागरिकाने संघटित व्हावे, कारण हिंदू संघटन हे कुठल्याही गैरहिंदूंच्या विरोधात नसून हिंदू समाज आणि सनातन संस्कृती यांच्या उत्कर्षासाठी उचललेले एक सकारात्मक पाऊल होय. असे करणे ही स्वाभिमानाची शिस्त आहे. सामाजिक जागृती म्हणजे उन्माद नव्हे; ती सत्याची मशाल आहे. सजग व्हावे, कारण सजगता म्हणजे कायद्याबाहेर जाणे नव्हे; तर कायद्याला बळ देणे आहे. विचारांनी, शब्दांनी आणि कृतींनी परंतु संविधानाच्या चौकटीत कट्टरतेला थोपवणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.

आपण इतिहासातून काही शिकणार आहोत का, की पुन्हा पुन्हा त्याच चुका करणार? ज्या आगी आज सीमापार पेटतात, त्या उद्या आपल्या अंगणात येऊ शकतात हे भाकीत नाही, हा अनुभव आहे. इकडे बांगलादेशातील हिंदू असुरक्षित आहे ही लाट भारतात यायला वेळ लागणार नाही, आज बांगलादेशातील हिंदू जात्यात आहे तर भारतातला हिंदू सुपात आहे. आपला समाज स्वतःच्या घराला आग लागण्याची का वाट बघतो आहे? शेजारी लागलेली आग आज आपण विझवायला बाहेर आलो नाही तर उद्या तीच आग आपल्याही घराला लागू शकते तेव्हा आपण समाजाकडून काहीही अपेक्षा ठेवू शकणार नाही. म्हणूनच शिक्षण, संवाद, सामाजिक एकजूट आणि कायदेशीर ठामपणा या चार दिशांनी एकाच वेळी पावले टाकावी लागतील. पीडितांसाठी आवाज बुलंद करावा लागेल, असत्याचा मुखवटा फाडावा लागेल आणि मजहबी कट्टर जिहादी उन्मादाला चोख प्रत्युत्तर द्यावे लागेल.

**विवेक गडकर**/९३७०३२४१०५

### रामदर्शनाने फरक पडेल

'संसद अधिवेशनाचे फलित आणि बोध' हा २० डिसेंबरचा अग्रलेख वाचला. २०१४ पासून काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षनेत्यांना हिंदू धर्म आणि रामद्वेषाने एवढे पछाडलेले आहे की त्यांचे हे भूत उतरवणे सोपे नाही. हिरवा चष्मा घातलेल्या माणसाला जसे सगळे जग हिरवे दिसते, तसेच रामद्वेषाची कावीळ झालेल्या विरोधी पक्षांना सगळीकडेच प्रभू श्रीराम दिसू लागले आहेत. त्यांचा हा रोग पराकोटीचा वाढला आहे. एखाद्या योजनेला बापूंचे किंवा गांधी नेहरू परिवारातील एखाद्या सदस्याचे नाव दिले की भ्रष्टाचार करणाऱ्यांना भ्रष्टाचाराचे कुरण चरायला मोकळे मिळते, अशी सवय झालेल्या भ्रष्टाचाऱ्यांना प्रभू श्रीराम यांचे नाव कसे चालेल? कोणत्याही विषयावर संसदेत गोंधळ घालून करदात्यांचे पैसे वाया घालवणे एवढेच काम विरोधकांना राहिलेले आहे.

यावर एक उपाय सुचवावासा वाटतो. लोकसभा आणि राज्यसभेच्या सर्वच विरोधी पक्षनेत्यांनी एकदा अयोध्येला जाऊन प्रभू श्रीराम यांचे मनोभावे दर्शन घेतले तर काही नेत्यांच्या वर्तणुकीत सकारात्मक बदल घडू शकतो. ते करूनही जर काही बदल घडला नाही तर विरोधी पक्षनेते जन्मोजन्मीचे कपाळकरंटे, कर्मदरिद्री आणि गलितगात्र आहेत असे समजून, त्यांच्या सगळ्या तमाशांकडे सरकारने संपूर्ण दुर्लक्ष करावे. कोणत्याही विरोधी पक्षनेत्यांनी केलेल्या वक्तव्यांना किंमत देऊ नये, प्रतिसाद देऊ नये आणि जनहितार्थ कामांसाठी संसदीय अधिवेशनाच्या वेळेचा सदुपयोग करावा. 'साथ दोगे तो साथ लेकर वरना तुम्हारे बगैर' हे धोरणच सद्यस्थितीत सरकारला साहाय्यभूत ठरेल.


**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

### जन संगोष्ठीतून लोकांचे मत परिवर्तन शक्य

समाजात परिवर्तन झाल्याशिवाय समाज एकसंध कसा होईल? राष्ट्र सामर्थ्यशाली कसे बनेल? यासाठी काही तथ्ये आणि पथ्याचे भान ठेवणे तितकेच गरजेचे ठरते. समाजाकडून योग्य दिशेने आणि प्रामाणिकपणे सत्य प्रयत्न करण्यामुळेच समाजातील तेढ कमी होईल. यासाठी योग्य दिशेने समाजात परिवर्तन झाले, नागरिकांमध्ये कर्तव्य जाणीव झाली पाहिजे. स्वदेशी तत्त्वांचे पालन करायला पाहिजे. मात्र हे स्व पासून सुरुवात केल्याशिवाय अशक्य आहे. प्रत्येक नागरिक आपल्या हक्काबद्दल सजग असतोच ना! ही तथ्ये विचारात घेतली, तरी प्रत्येक नागरिकाने आपल्या कर्तव्याचे प्रामाणिकपणे पालन करायला नको का? नागरिकांच्या कर्तव्याच्या संदर्भात उदाहरणादाखल राष्ट्रीय कर्तव्य समजून मतदान करणे आवश्यक आहे. यातच खरे नागरिकत्व दडले आहे. नागरी कर्तव्याची जाणीव झाल्याशिवाय कुटुंब प्रबोधनाचे खरे कार्य कसे करता येईल? खरे तर आपण संस्कृतीचे रक्षक असल्यामुळे तिचे रक्षण करणे हे आद्य कर्तव्य समजायला पाहिजे. यासाठीच कुटुंबाचे प्रामाणिकपणे प्रबोधन करणे आवश्यक असते. याचमुळे कुटुंबाला समाज जीवनाची शाश्वत पाठशाळा म्हटले आहे. परंतु कुटुंब प्रबोधनाची सुरुवात स्व पासून झाली पाहिजे. कुटुंबात जाणीव जागृती झाल्यास समाजातील द्वेष, तिरस्कार मत्सर, कमी होऊन कुटुंब खऱ्या अर्थाने समाज जीवनाची पाठशाळा बनेल आणि ती बळकट आणि मजबूत राष्ट्रीय एकात्मतेसाठी आवश्यक आहे. आणि हे स्व प्रबोधनांसोबत दुसऱ्यांना सहकार्य करणे देशनिष्ठा ठरेल.

**प्रा. कमलाकर हणवंते**/९४२३६५४२८६

### मानसिक आरोग्यासाठी ध्यानधारणा



आज २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिन म्हणून साजरा केला जातो. जागतिक ध्यान दिन संपूर्ण जगात साजरा केला जावा, या उद्देशाने संयुक्त राष्ट्रसंघात मसुदा तयार करून प्रस्तावासाठी पाठविण्यात आला होता. लिकेस्टिन, श्रीलंका, नेपाळ, मेक्सिको आणि एडेरा या देशांच्या समूहाने १९३ सदस्य असलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेत जागतिक ध्यान दिवस या शीर्षकाच्या प्रस्तावाला सर्वानुमताने पारित करण्यासाठी प्रयत्न केले होते. शारीरिक आणि मानसिक आरोग्याच्या दृष्टीने ध्यान हे मानवी जीवनासाठी अत्यंत गरजेचे आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात शारीरिक विश्रांती, मानसिक आणि भावनिक शांतीसाठी ध्यान करणे हितावह ठरते. ध्यानामुळे चिंता, नैराश्य, रक्तदाब कमी करणे, शारीरिक वेदनेवर मात करणे किंवा व्यवस्थापित करण्यासाठी ध्यान मोलाची भूमिका बजावते. ध्यान केवळ विश्रांतीसाठीच नव्हे, तर जीवनाला एक नवीन दिशा देण्यासाठी आवश्यक आहे. ध्यानाच्या नियमित सरावामुळे आपले मन वर्तमानावर केंद्रित राहते आणि भविष्यकाळातील चिंतेपासून दूर राहता येते. जीवनातील सर्व आव्हानांचा सामना करण्यासाठी आणि मानसिक शांती मिळविण्यासाठी आणि नियमितपणे ध्यान करणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. ध्यानामुळे निव्वळ वैयक्तिक फायदाच नव्हे तर ध्यान सहानुभूती, सहयोग आणि सामाजिक उद्देशांची भावना वृद्धिंगत करते, असे जागतिक आरोग्य संघटनेने मान्य केले आहे. म्हणून गतवर्षीपासून २१ डिसेंबर हा दिवस जागतिक ध्यान दिवस म्हणून संपूर्ण जगभरात साजरा केला जातो.

बदलती जीवनशैली व वाढत्या ताण-तणावामुळे आज आत्महत्येचे प्रमाण वाढलेले दिसून येते. या वाढत्या आत्महत्येवर समुपदेशनासोबतच मानसिक आरोग्यासाठी ध्यान करणे तेवढेच महत्त्वाचे ठरत असते. त्यामुळे शरीरातील कोर्टीसॉल या स्ट्रेस हार्मोनची पातळी कमी होते. ज्यामुळे मानसिक शांती लाभते. ध्यानामुळे सकारात्मक विचार वृद्धिंगत होतात. परिणामी नैराश्य ताणतणाव कमी होण्यास मदत मिळते. स्वतःच्या विचारांकडे आणि भावनांकडे तटस्थ पाहण्याची दृष्टी विकसित होते. आज मानसिक तणावामुळे आपल्या नियमित कार्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी ध्यानधारणेसारखा दुसरा सुलभ मार्ग नाही. एकंदरीत ध्यानधारणा म्हणजे तुमचे मन एकाग्र करण्यासाठी किंवा शांत करण्यासाठी, जाणीवपूर्वक लक्ष केंद्रित करण्यासाठी; एक प्रक्रिया आहे. ज्यात श्वासांवर किंवा एखाद्या विशिष्ट गोष्टींवर लक्ष केंद्रित केले जाते. ज्यामुळे मानसिक तणाव कमी होतो आणि आत्मिक शांती व जागरूकता वाढते. म्हणूनच आपल्या देशात ध्यानाला आध्यात्मिक व हजारों वर्षांची पौराणिक काळात सुद्धा महत्त्वाचे स्थान होते.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

## आजचे संघगीत-७९

रविवार, २१ डिसेंबर २०२५

### भारत अमुचा असे अम्हाला प्राणाहुनिही प्यार

भारत अमुचा असे आम्हाला प्राणाहुनिही प्यार
या देशाच्या कणाकणास्तव वाहिल शोणित धार ॥धृ॥

ब्रीद आमुचे जरी शांतिचे
इथे तळपती सूर्य क्रांतिचे
नसात खेळे रक्त शिवाचे
या भूमीवर दानवतेचे बीज न कधि रुजणार ॥१॥

ईश्वर अमुचा भोळा शंकर
क्षणात होइल परि प्रलयंकर
कंपित होइल धरणी, अंबर
हिमालयाच्या बर्फातुनही उफाळेल अंगार ॥२॥

विश्वबंधुता इथली शिकवण
मानवता हे इथले जीवन
दुष्टांचे परि येथे मर्दन
होतिल त्यांच्या समिधा जे जे येतिल करण्या वार ॥३॥

इतिहासाच्या पानोपानी
इथे स्फूर्तिच्या अक्षय खाणी
दुबळी नच ही भारत जननी
अणूअणूतुन इथे शक्तिचा-घडेल आविष्कार ॥४॥

# बोरामणीच्या माळरानावर सापडला दगडी 'चक्रव्यूह'



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातून इतिहासकार आणि पुरातत्व विभागाला अचंबित करणारी एक मोठी बातमी समोर आली आहे. बोरामणीच्या माळरानावर तब्बल १५ घेरे असलेला एक विशालकाय 'चक्रव्यूह' सापडला आहे. हा भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठा दगडी चक्रव्यूह असल्याचे मानले जात असून, हा चक्रव्यूह प्राचीन रोमच्या इतिहासाशी जोडला गेला असल्याची शक्यता जाणकार व्यक्त करीत आहेत.

एका वन्यजीव निरीक्षण मोहिमेदरम्यान या चक्रव्यूहाचा शोध लागला आहे. 'नेचर कंजर्वेशन सर्कल' या संस्थेच सदस्य बोरामणी वनक्षेत्रात माळढोक पक्षी आणि लांडग्यांच्या हालचालींवर लक्ष ठेवून आहेत. यातील काही सदस्यांना दगडांची एक विशिष्ट रचना दिसून आली. त्यांनी तात्काळ याची माहिती पुरातत्वशास्त्रज्ञ सचिन पाटील यांना दिली. या चक्रव्यूहाचा अभ्यास आता अभ्यासक करीत आहेत. सोलापुरातून काही तरी ऐतिहासिक ठेवा मिळाल्यास सोलापूरकरांसाठी तो अभिमानाचा क्षण असणार आहे.

# सोलापूर महानगरपालिका मतदान केंद्रांची यादी प्रसिध्द

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या दिनांक ९ डिसेंबर २०२५ रोजीच्या आदेशानुसार सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी निश्चित करण्यात आलेल्या मतदान केंद्रांच्या ठिकाणांची यादी आज प्रसिद्ध करण्यात आली आहे.

मतदान केंद्रांची यादी नागरिकांच्या माहितीसाठी सोलापूर महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर http://www.solapurcorporation.org उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच, ही यादी सोलापूर महानगरपालिकेच्या सर्व विभागीयकार्यालयांमध्येनागरिकांना पाहणीसाठी उपलब्ध करून देण्यात आली आहे. मतदारांनी आपल्या प्रभागातील मतदान केंद्राचे ठिकाणाची पूर्वकल्पना याकरिता महानगरपालिकेच्या वेबसाईटवर ही यादी प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ यशस्वी, शांततापूर्ण व लोकशाही मार्गाने पार पाडण्यासाठी सर्व मतदारांनी प्रशासनास सहकार्य करावे. आपल्या मतदानाच्या हक्काचा अवश्य उपयोग करावा, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी आहे.

**CHANGE IN NAME**

I HAVE DECLRAE THAT MY OLD NAME IS **Farhat Sultana Abubakar Kadtal** HAS BEEN CHANGED TO **Farhat Gani Patel** Resi. - 93, Siddheshwar Nagar, 5 Majrewadi, Solapur North, Solapur

**KINDLY NOTE**

THE SAME. (60938 Dtd.19.12.2025)

**ॲड. प्रसाद कि. अग्निहोत्री**
**सोलापूर.**
नि. ६

## लिगल हेअरशीप प्रमाणपत्र जाहीर प्रसिध्दिकरण

कोर्टाचे नांव:- श्रीमती. एस.ए.आर. सय्यद सो
पुढील तारीख. २२/०१/२०२६
सि.कि.अर्ज क्र. ९३४/२०२५

### सोलापूर येथील मे. ३ रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात

**(एस.ए.आर. सय्यद)**

**शिवमंगला बसवराज हिप्परगी** -- **अर्जदार**

**विरुध्द**

१) शिवशंकर सिद्राम बुधाळकर
२) कलावती नागेश माळगे -- **सामनेवाले**
३) वंदना चंद्रशेखर कापसे
४) शिवलिंगम्मा म्हांतय्या कळ्ळीमठ

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मयत कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसदार या नात्याने लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

**१) मिळकतीचे वर्णन :**

अ) डि व सब डि सोलापूर पैकी सोलापूर महानगरपालिका हद्दीतील सर्व्हे नं. ३३/अ, त्यावर इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित त्यातील प्लॉट नं. सी-४३, इंदिरा नगर, विजापूर रोड, सोलापूर त्यांसी क्षेत्र २७०० चौ. फुट (२.५०.९३ चौ.मी.) त्यावर तळमजल्यावर व्हरांडा तीन खोल्या, पहिल्या मजल्यावर तीन खोल्याची रहिवासी मिळकत त्यांसी म्यु.पल मिळकत क्र. ३०२०९० त्यामध्ये स्वतंत्र विद्युत कनेक्शनसहची मिळकत.

ब) इंदिरा महिला जीवन विकास सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, सोलापूर सोसायटी सभासद/भाग दाखला.

२) वर नमुद मिळकतीचे व कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांचे अर्जदार व सामनेवालाने १ ते ४ हे वारसदार असल्याचे सांगुन त्यांनी त्यासंदर्भात (लिगल हेअरशिप) वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रकरण दाखल केलेले आहे.

३) त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने लिगल हेअरशिप सर्टिफिकेट देण्यास कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आंत किंवा नेमलेली तारीख दि. २२/०१/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात गुणवत्तेवर आधारीत अर्जावर पुढील योग्य न्याय निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आज दिनांक. १९/१२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर**

**ॲड. प्रसाद कि. अग्निहोत्री**
**सोलापूर.**
नि. ६

## वारस प्रमाणपत्र जाहीर प्रसिध्दिकरण

कोर्टाचे नांव:- श्रीमती. एस.ए.आर. सय्यद सो
पुढील तारीख. २२/०१/२०२६
सि.कि.अर्ज क्र. ९३५/२०२५

### सोलापूर येथील मे. ३ रे दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर सो यांचे कोर्टात

**(एस.ए.आर. सय्यद)**

**शिवमंगला बसवराज हिप्परगी** -- **अर्जदार**

**विरुध्द**

१) शिवशंकर सिद्राम बुधाळकर
२) कलावती नागेश माळगे -- **सामनेवाले**
३) वंदना चंद्रशेखर कापसे
४) शिवलिंगम्मा म्हांतय्या कळ्ळीमठ

ज्याअर्थी यातील अर्जदाराने मयत कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांच्या नावे असलेल्या खालील मिळकतीचे वारसदार या नात्याने लिगल हेअरशिप प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

१) अर्जदाराचे मामा कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी यांचे मृत्युवेळी त्याचे नावावर खालील जंगम मालमत्ता होती.

**अ) बँक खाते शिल्लक रक्कमा :**

| अं. क्र | बँकेचे नांव | खाते क्रमांक | खातेदाराचे नांव | खातेप्रकार | खात्यावरील शिल्लक रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | सेंट्रल बँक सोलापूर, जुळे सोलापूर शाखा | २०९४०००८७९ | कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी | बचत खाते (वैयक्तिक) | २,०५,२३६/- |
| २ | सेंट्रल बँक सोलापूर, जुळे सोलापूर शाखा | २०९३९४६६६८ | कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी, कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांचे संयुक्त खाते | बचत खाते (संयुक्त) | ३३,९२,४४२/- |
| ३ | बँक ऑफ महाराष्ट्र सोलापूर जुळे सोलापूर शाखा | २००१६७४१४१० | कै. संगप्पा शरणाप्पा हिप्परगी व कै. जयश्री संगप्पा हिप्परगी यांचे संयुक्त खाते | बचत खाते (संयुक्त) | १२,५८२.४६/- |
| ४ | सोलापूर जनता सहकारी बँक, | ५८७०१२२०००० ११९६७ | कै . संगप्पा शरणप्पा हिप्परगी | वैयक्तिक बचत खाते | २२,४८५.६५/- |

**ब) शेअर्स सर्टिफिकेट : सोलापूर जनता सहकारी बँक लि. सोलापूर**

| अं. क्र | भागधारकाचे नांव | सभासद क्रमांक | भागदाखला क्रमांक | भाग संख्या | भाग क्रमांक | भाग रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी | २९५५३ | ४३४७४ | १०० | १३५४८२० ते १३५४९१९ | ५,०००/- |
| २ | कै. जयश्री संगप्पा हिप्परगी | २९५५४ | ४३४७५ | १०० | १३५४९२० ते १३५५०१९ | ५,०००/- |

**क) वाहनः** खाली नमुद वाहन हे कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी यांचे नांवे होती त्याचे वर्णन खालीप्रमाणे :

| Sr. No. | Make | Model | Engine Number | Chassis Number |
|---|---|---|---|---|
| 1 | Maruti | Maruti Omini 8 Seater | 3810395 | M3EVB11500861330 |

२) वर नमुद मिळकतीचे व कै. संगप्पा शरणप्पा हिप्परगी यांचे अर्जदार व सामनेवाला हे वारसदार असल्याचे सांगुन त्यांनी त्यासंदर्भात वारस प्रमाणपत्र मिळणेकामी प्रकरण दाखल केलेले आहे.

३) त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाची काही हरकत अथवा म्हणणे असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासुन ३० दिवसाच्या आंत किंवा नेमलेली तारीख दि. २२/०१/२०२६ रोजी स्वतः अथवा आपल्या वकीलामार्फत हजर राहुन आपले म्हणणे मांडावे. मुदतीत कोणाची काही हरकत अथवा म्हणणे न आल्यास कोणाचीही काहीही हरकत नाही असे समजुन प्रकरणात गुणवत्तेवर आधारीत अर्जावर पुढील योग्य न्याय निर्णय केला जाईल याची नोंद घ्यावी.

हे प्रसिध्दीकरण आज दिनांक. १९/१२/२०२५ रोजी आमचे सहीने व कोर्टाचे शिक्क्याने प्रसिध्द केले असे.

**सही/-**
**लिपिक**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर**

## बेवारस मोटारसायकलसाठी पंधरा दिवसात संपर्क करा

**बार्शी, दि. २० डिसेंबर-**

बार्शी शहर पोलीस ठाणे येथे ३४ बेवारस मोटारसायकल वाहने मिळुन आलेले आहेत. सदरच्या वाहनाच्या मालकीबाबत माहिती घेतली असता माहिती मिळून आलेली नाही. या मोटरसायकली ज्यांच्या असतील त्यांनी बार्शी पोलिस ठाण्याशी पंधरा दिवसात संपर्क साधावेत, असे आवाहन पोलिस निरीक्षक बालाजी कुकडे यांनी केले. बऱ्याच वर्षांपासून सदरची वाहने बार्शी शहर पोलिस ठाणे येथे पडून आहेत. पोलिस ठाणे येथे वाहन ठेवण्यासाठी जागा अपुरी पडत आहेत. सदर वाहनांच्या मालकांचा शोध घेवून त्यांना परत करावयाचे आहेत. यामध्ये पुणे, धाराशिव, पंजाब, तामिळनाडू, ओडिसा अशा निरनिराळ्या ठिकाणच्या गाड्या असल्याचे निदर्शनास आलेले आहे. सदर वाहनाची यांदी पोलीस ठाणे येथील नोटीस बोर्डवर लावण्यात आलेली आहे. वाहनाची मालकांनी वाहनाबाबतचे कागदपत्रासह पोलीस ठाणे येथे हजर राहून अर्ज करावा. याबाबत काही माहिती पाहिजे असल्यास पुढील कमांकावर संपर्क करण्यात यावा. बार्शी शहर पोलीस ठाणे कमांक ०२१८४-२२३३३३, सचिन कदम पोलीस हवालदार मो. नं. ८६६९५०२२९६.

## श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२

फोन -०२१७-२६२२९३४४ / २६२२९३३

### नमुना झेड

(नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) पहा)
स्थावर मालमत्ता ताब्यात घेतलेबाबतची नोटीस

ज्या अर्थी खाली सही करणार विशेष वसुली व विक्री अधिकारी श्री कृष्णाहरी यल्लप्पा मैसूर C/O श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली सोलापूर हि संस्था महाराष्ट्र सहकारी कायदा १९६१ अन्वये यादीतील ऋणको (धकबाकीदार) याने रक्कम जमा करण्यास कसूर केले आहे. त्या अर्थी खाली सही करणार्याने खालील नमूद यादीतील ऋणको यांची स्थावर मिळकत बाबत जप्तीची नोटीस देवून या पुढे निर्दीष्ट केलेली स्थावर मालमत्ता जप्त केलेली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला आणि सर्व नागरिकांना जाहीर नोटीस देण्यात येते की, खाली निर्दिष्ट केलेल्या स्थावर मालमत्तेचा खाली सही करण्यानि त्यांना महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १०७ पोटनियम ११ (डी-१) अन्वये दिलेल्या अधिकारा नुसार प्रतीकात्मक (सिम्बोलिक) ताबा घेतलेला आहे.

विशेष करून ऋणकोला आणी सर्व नागरिकांना याद्वारे सावध करण्यात येत आहे की, खाली नमूद केलेल्या यादीतील मालमत्ते संबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली, सोलापूर या संस्थेच्या खाली नमूद केलेल्या बोजाची रक्कम आणि त्यावरील व्याज, कायदेशीर शुल्क व भविष्यात होणारे इतर खर्चाचा बोजा सदर मिळकतीवर राहील, याची नोंद घ्यावी.

| अ क्रं. | कर्जदार / जामिनदाराचे /मिळकतदाराचे नाव | मिळकतीचे वर्णन | सिसनं / गट नं / क्षेत्र | दिनांक मागणी नोटीस व प्रतिकात्मक ताबा |
|---|---|---|---|---|
| १ | अंकित अशोक लुणावत व पायल अमित जैन (पार्श्वनाथ इंजिनिअर्स, प्रोप्रा. अंकित अशोक लुणावत कर्जदार व जामीनदार | डी. व सब डी. सोलापूर ता. उत्तर सोलापूर मौजे खेड हद्दीतील मिळकती | १. गट नं.३१/२ यांसी क्षेत्र ०.८२.०० हे. आर. चौ.मी. आकार १.६५<br>२. गट नं.३३ यांसी क्षेत्र २.०५.०० हे. आर.चौ.मी. आकार ३.४४ अंकित अशोक लुणावत व पायल अमित जैन यांच्या हिश्यावर | १०.०३.२०२५<br>३०.१०.२०२५<br>रु.२,७५,९५,६३५/- दि. ३०.०६.२०२५ अखेर येणे बाकी |

वरील सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्या स्थावर मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा, ताबा पत्रावर सही करून, खाली नमूद वसुली अधिकारी यांच्याकडून या जाहीर प्रसिद्धीकरण दिनांकापासून संपूर्ण थकबाकी भरून पंधरा दिवसाच्या आत घ्यावा अन्यथा, तसे नं केल्यास मुदतीनंतर सदर मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याची कायदेशीर प्रक्रिया मा जिल्हाधिकारी सोलापूर यांचे कडे अर्ज करून पार पडले जाईल व तसेच उपरोक्त स्थावर मालमत्ता विक्रीस काढण्यात येईल, तरी त्यापुढील होणाऱ्या सर्व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार राहाल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : सोलापूर**
**दिनांक : ३०/१०/२०२५**

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली., सोलापूर**

## जाहीर समन्स

### मे. उपनिबंधक, सहकारी संस्था, (परसेवा), सोलापूर, जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप, असोसिएशन लि., सोलापूर

११३ (अ), सिध्देश्वर पेठ, स्टेट बँक ऑफ इंडिया, ट्रेझरी शाखेशेजारी, सोलापूर

**समर्थ सहकारी बँक लि., सोलापूर** -- **अर्जदार बँक**
अंत्रोळीकर शॉपींग सेंटर, दत्तचौक, सोलापूर

**विरूध्द**

**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद) -- जाब देणार**

| अ. नं. | केस नं. | दावा रक्कम | जाब देणार क्रमांक | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ८१५/२५-२६ | ७३,१३३/- | १ | सरिता भीमराव कोगले रा. कोगले वस्ती, मु पोस्ट कोन्हेरी, ता. मोहोळ, सोलापूर |
| २ | ८१६/२५-२६ | ८५,०१६/- | १<br>२<br>३ | स्वामी पुष्पा नागेश रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर,<br>पार्वती नितीन शेळके रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>वैशाली विनायक झुंजारे रा. मु पोस्ट पोखरापूर, सारोळे, ता. मोहोळ, सोलापूर |
| ३ | ८१७/२५-२६ | ५८,४१७/ | १<br>२<br>३ | झुंजारे सुरेखा विश्वास रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>रेखा नवनाथ रणदिवे रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर<br>गोदावरी बाबा भिसे रा. मु पोस्ट पोखरापूर, सारोळे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ४ | ८१८/२५-२६ | ७३,२१७/- | १<br>२<br>३ | रणदिवे रेखा नवनाथ रा. मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुरेखा विश्वास झुंजारे रा.मु पोस्ट सारोळे, पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>गोदावरी बाबा भिसे रा.मु पोस्ट पोखरापूर, सारोळे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ५ | ८२०/२५-२६ | ६३,२८५/- | १<br>२<br>३ | पोपसभट रुपाली चंद्रकांत रा. कुंभारखानी, ता. मोहोळ, सोलापूर.<br>गीता सीताराम कोळी रा. गायकवाड गल्ली, मोहोळ, ता. मोहोळ, सोलापूर.<br>संगीता शिवाजी पाटील रा. समर्थ नगर, मु पोस्ट मोहोळ, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ६ | ८२४/२५-२६ | ८५,१४२/- | १<br>२<br>३<br>४ | शेख खाजाबी हुसेन रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शालन सुखदेव सावंत रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>राबिया युनुस शेख रा. लवटे गल्ली, मु पोस्ट विचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>नाजमीन आजम शेख रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर, |
| ७ | ८२५/२५-२६ | ८३,३७४/- | १<br>२<br>३<br>४ | शेख नाजमीन आजम रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शालन सुखदेव सावंत रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>राबिया पुनुस शेख रा. लवटे गल्ली, मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर<br>खाजाबी हुसेन शेख रा. मु पोस्ट चिंचोलीकाटी, सावळेश्वर, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ८ | ८२६/२५-२६ | ७८,०१५/- | २<br>३ | असराबी चांद तांबोळी रा. मु पोस्ट खैराव, ता. माढा, सोलापूर<br>सुनिता अनिल नागटिळक रा. मु पोस्ट खैराव, ता. माढा, सोलापूर |
| ९ | ८२७/२५-२६ | ७३,१०९/- | १<br>२<br>३<br>४ | इनामदार आरिफा जुबेर रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर,<br>राणी सुनील पवार रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुनिता मच्छिंद्र साळी रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर<br>असिफा फारुख इनामदार रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर, |
| १० | ८२८/२५-२६ | ७६,८०९/ | १<br>२<br>३<br>४ | इनामदार असिफा फारुख रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर<br>राणी सुनील पवार रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनिता मच्छिंद्र साळी रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर.<br>अरिफा जुबेर इनामदार रा. मु पोस्ट दारफळ बीबी, नान्नज, ता. मोहोळ, सोलापूर. |
| ११ | ८२९/२५-२६ | ८६,३४५/- | २<br>४ | अनिशा दगडू शेख रा. मु पोस्ट चिंचोली काटी, ता. मोहोळ, सोलापूर<br>जयश्री सिकंदर धोत्रे रा. गावठाण, मु पोस्ट चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १२ | ८३०/२५-२६ | ७९,५१४/- | १<br>४ | शेख अनिशा दगडू रा. मु पोस्ट चिंचोली काटी, ता. मोहोळ, सोलापूर.<br>जयश्री सिकंदर धोत्रे गावठाण, मु पोस्ट चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १३ | ८३२/२५-२६ | ९०,८१४/- | १<br>२ | धोत्रे जयश्री सिकंदर रा. गावठाण, मु पोस्ट चिंचोलीकाटी, ता. मोहोळ, सोलापूर<br>अनिशा दगडू शेख रा. मु पोस्ट चिंचोली काटी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १४ | ८३३/२५-२६ | ५२,०४१/- | १<br>२<br>३<br>४ | माने विद्या अनिरुद्ध मु पोस्ट सौंदाणे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>मनिषा राजाराम माने रा. मु सौंदणे, पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>उमा सुरेंद्र माने मु पोस्ट सौंदाणे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>राजामती नामदेव माने मु सौंदणे, पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर |
| १५ | ८३४/२५-२६ | ५१,४४६/- | १<br>२<br>३<br>४ | पाचफुले सुनिता केशव मु पोस्ट येल्लमवाडी, ता. मोहोळ, सोलापूर.<br>निशा दिपक मिसाळ रा. मु यल्लमवाडी, पोस्ट देगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनिता निवृत्ती भोमाले रा. मु यल्लमवाडी, पोस्ट देगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>वर्षा लहू देवकर रा. मु पोस्ट येल्लमवाडी, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १६ | ८३५/२५-२६ | ५३,१३८/- | १<br>२<br>३ | माने सोनाली अरुण मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>रंजना लहू माने माने वस्ती, मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुरेखा कृष्णदेव माने रा. मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १७ | ८३६/२५-२६ | ५५,२८८/- | १<br>२<br>३ | माने रंजना लहू रा. माने वस्ती, मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सोनाली अरुण माने रा. मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुरेखा कृष्णदेव माने रा. मु पोस्ट सौंदणे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १८ | ८३७/२५-२६ | ५२,५६१/- | १<br>२<br>३ | जाधव अश्विनी श्रीकांत रा. मु पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>मंगल बजरंग जाधव रा. मु पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुलन श्रीरंग जाधव रा. जाधव वस्ती, वरवडे रोड, मु पोस्ट तांबोळे, ता. मोहोळ, सोलापूर. |
| १९ | ८३८/२५-२६ | ८०,२०७/- | १<br>२<br>३ | भोसले शितल अमोल रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शशीकला शाहू उन्हाळे रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर,<br>सुनिता तुकाराम आगलावे रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर. |
| २० | ८३९/२५-२६ | ८०,७४३/- | १<br>२<br>३ | उन्हाळे शशीकला शाहू रा. मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर<br>शितल अमोल भोसले रा.मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनिता तुकाराम आगलावे रा.मु पोस्ट पोखरापूर, ता. मोहोळ, सोलापूर. |
| २१ | ८४०/२५-२६ | ६२,८४४/- | १<br>२<br>३ | यमगर कलावती विष्णु रा. मु पोस्ट सय्यदवरवडे, ता. मोहोळ, सोलापूर.<br>सुनंदा विलास बटाने रा. मु पोस्ट सय्यदवरवडे, ता. मोहोळ, सोलापूर<br>छाया सुरेश वाघमारे रा. उखळे वस्ती, मु पोस्ट सय्यदवरवडे, ता. मोहोळ, सोलापूर |
| २२ | ८४१/२५-२६ | ५५,१४१/- | १<br>३<br>५ | वैशाली उत्तरेश्वर सिरसट रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर.<br>अत्त्यार सिकंदर मुलानी रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर<br>तुळसाबाई विष्णू शितोळे रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर. |
| २३ | ८४२/२५-२६ | ६०,९०२/- | २<br>४<br>५ | वैशाली उत्तरेश्वर सिरसट रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर.<br>अत्त्यार सिकंदर मुलानी रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर.<br>तुळसाबाई विष्णू शितोळे रा. मु पोस्ट पडसाळी, ता. उत्तर सोलापूर. |
| २४ | ८४३/२५-२६ | ६१,२२३/- | १<br>२<br>३ | सुरवसे वर्षा सखाराम रा. मु पोस्ट वडदेगाव, ता. मोहोळ, सोलापूर<br>सिंदु सुमंत सुरवसे रा. मु पोस्ट वडदेगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>लक्ष्मी ज्ञानेश्वर सुरवसे रा. मु पोस्ट वडदेगाव, ता. मोहोळ, सोलापूर, |
| २५ | ८४४/२५-२६ | ५१,५५८/- | १<br>३<br>४ | सिरसट सोनाली श्रीकांत रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>कमल गणपत सिरसट रा. १७८, मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>उर्मिला लक्ष्मण भोसले रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २६ | ८४५/२५-२६ | ५२,८२२/- | १<br>२<br>३<br>४ | भोसले संध्या प्रभाकर रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>बिस्मिला ईसाक शेख रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>अश्विनी नानासाहेब सिरसट रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.<br>लतिका ज्ञानेश्वर सिरसट रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर. |
| २७ | ८४६/२५-२६ | ६१,१८१/- | १<br>२<br>३<br>५ | सिरसट कालिंदा राजेंद्र रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर<br>स्वप्नाली संतोष नागाळे रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर<br>सरस्वती दत्तात्रय वाघ रा. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर,<br>संगिता रमेश दुधाळे स. मु पोस्ट पडसाळी, नान्नज, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर |
| २८ | ८४७/२५-२६ | ५५,७३२/- | १<br>२<br>३<br>४ | देशमुख कल्पना शरद रा. मु देगाव (वा), पोस्ट मानेगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>विद्या प्रफुल्लित दगडे रा. मु देगाव (वा), पोस्ट मानेगाव, ता. मोहोळ, सोलापूर,<br>अनिता हनुमंत पवार रा. मु देगाव (वा), पोस्ट मानेगाव, ता. मोहोळ, सोलापूर.<br>अस्मिता नितीन आतकरे रा. वीरूदेव गल्ली जवळ मु. देऊळगाव ता. मोहोळ जि. सोलापूर |

याकामी अर्जदार यांनी दाखल केलेल्या अर्जातील जाब देणार यांना रजिस्टर पोस्टाने समन्स पाठविण्यात आलेले आहे परंतू जाव देणार समन्स रूजू न झाल्याने /त्यांचा नवीन पत्ता उपलब्ध नसल्यामुळे सदरचे जाहीर समन्स देत आहोत.

उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडण्यासाठी स्वतः जातीने वार- मंगळवार दि. ०६.०१.२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता दाव्यासंबंधीच्या कागदपत्रासह आपण या कार्यालयात हजर व्हावे.

या नोटीसीद्वारे जाब देणार यांना असेही कळविण्यात येते की, वरील तारखेस आपण वेळेवर हजर न राहिल्यास आपल्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी त्याचप्रमाणे वरील तारखेस अगर तत्पुर्वी आपला संपूर्ण पत्ता कळविण्यास कसुर केल्यास आपला -बचाव रद्द समजण्यात येईल.

म्हणून दिनांक २०/१२/२५ रोजी माझी सही व कार्यालयीन मुद्रेसह हे जाहीर समन्स दिले.

शिक्का

**सही/-**
**उपनिबंधक,**
**सहकारी संस्था, (परसेवा)**
**सोलापूर जिल्हा नागरी सहकारी बँक्स् को-ऑप. असोसिएशन लि., सोलापूर**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.






## चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

**भाग - ३५**

### जोरात धावण्यापेक्षा हुशारीने धावणे महत्त्वाचे



ऑलम्पिकचे सुवर्णपदक विजेते व प्रशिक्षक अमेरिकेचे जॅक डॅनियल्सचे नियम सांगतात की हुशारीने धावणे हे जोरात धावण्यापेक्षा महत्वाचे आहे. योग्य गती, सातत्य, आणि रिकव्हरी यामुळे दीर्घकाळ चांगली कामगिरी करता येते आणि दुखापती टाळता येतात.

**डॅनियल्सचे १२ धावण्याचे नियम**

१. सध्याच्या फिटनेसप्रमाणे सराव करा. तुमचा सराव हा तुमच्या आजच्या फिटनेसवर आधारित असावा. पूर्वीची कामगिरी किंवा भविष्यातील लक्ष्य लक्षात घेऊन जास्त ताण दिल्यास दुखापत होऊ शकते.
२. सातत्य हे तीव्रतेपेक्षा महत्त्वाचे कधीकधी खूप जोरात धावण्यापेक्षा नियमित आणि सातत्यपूर्ण सराव केल्याने जास्त प्रगती होते.
३. इझी रन खरंच इझी असावेत बहुतेक धावा आरामात, बोलता येईल अशा गतीने असाव्यात. यामुळे एरोबिक क्षमता वाढते आणि शरीराची रिकव्हरी होते.
४. हार्ड सेशनला उद्देश असावा टेम्पो, इंटरव्हल किंवा लाँग रन हे ठराविक उद्देशानेच असावेत. विनाकारण कठीण सराव टाळावा.
५. सरावात कधीही रेस करू नका सराव हा तयारीसाठी असतो, स्पर्धेसाठी नाही. पूर्ण ताकद रेस डे साठीच राखून ठेवा.
६. अंतर आणि वेग हळूहळू वाढवा अचानक किलोमीटर किंवा वेग वाढवल्यास दुखापतीचा धोका वाढतो. प्रगती नेहमी टप्प्याटप्प्याने असावी.
७. रिकव्हरीला महत्त्व द्या खरी प्रगती सरावानंतर विश्रांतीत होते. विश्रांतीचे दिवस आणि इझी रन अत्यंत आवश्यक आहेत.
८. सर्व ऊर्जा प्रणालींचा सराव करा इझी रन, टेम्पो रन, इंटरव्हल आणि लाँग रन सगळ्यांचा समतोल सराव केल्याने संपूर्ण फिटनेस तयार होतो.
९. लाँग रनचा उद्देश सहनशक्ती आहे, वेग नाही. लाँग रन आरामात आणि नियंत्रित गतीने असावा. त्याचा उद्देश इंडुरंस वाढवणे हा आहे.
१०. परिस्थितीनुसार सराव बदला उष्णता, दमट हवामान, चढ-उतार यानुसार गती कमी-जास्त करा. अहंकाराने धावू नका.
११. खरा वेग एरोबिक फिटनेसने येतो. फक्त जलद धावल्याने वेग वाढत नाही. मजबूत एरोबिक बेस तयार केल्यावरच खरा वेग येतो.
१२. शरीराचे ऐका दुखणे, जास्त थकवा किंवा कामगिरीत घसरण दिसल्यास सराव कमी करा. दुखापत होण्याआधीच काळजी घ्या.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन, सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

## पाकिस्तान हॉकी संघाचा व्यवस्थापक अडचणीत

**कराची** : वरिष्ठ पाकिस्तान हॉकी संघासोबत अर्जेंटिनामध्ये एफआयएच प्रो-लीगसाठी व्यवस्थापक म्हणून गेलेले ऑलिम्पियन हॉकीपटू अंजुम सईद, रिओ डी जनेरियो विमानतळावर विमानात इंधन भरत असताना विमानात धूम्रपान केल्याबद्दल ब्राझीलमध्ये विमानातून उतरवल्यानंतर अडचणीत सापडले आहेत. जेव्हा विमान इंधन भरण्यासाठी ब्राझीलमध्ये थांबले होते, तेव्हा अंजुम एका पाकिस्तानी खेळाडूसह धूम्रपान करताना आढळले, त्यानंतर त्यांना दुबईला जाणाऱ्या विमानात चढण्याची परवानगी नाकारण्यात आली. अंजुम यांना व्यवस्थापक म्हणून अर्जेंटिनाला पाठवण्यात आले होते, परंतु या आठवड्यात घरी परतल्यानंतर, ते आता दावा करत आहेत की दुबईतील काही वैयक्तिक कामामुळे ते संघासोबत परत आले नाहीत. परंतु पाकिस्तान क्रीडा मंडळाने पाकिस्तान हॉकी महासंघाला या घटनेची स्वतंत्र चौकशी करण्यास सांगितले आहे.

# गिलला वगळले; ईशान, रिंकूला पाचारण

◆ **मुंबई, २० डिसेंबर**

प्रतिष्ठेपेक्षा कामगिरीला महत्त्व देण्याचा धाडसी निर्णय घेत राष्ट्रीय निवड समितीने शनिवारी शुभमन गिलला टी-२० विश्वचषक स्पर्धेसाठी भारतीय संघातून वगळले आणि यष्टीरक्षक-फलंदाज ईशान किशन व रिंकू सिंगला संघात परत बोलावले.

मुंबईत झालेल्या निवड समितीच्या बैठकीतील गिलला वगळण्याचा निर्णय सर्वात लक्षवेधी आहे, तरीही त्याचा सध्याचा फॉर्म पाहता तो फारसा आश्चर्यकारक नव्हता.

कसोटी व वन-डे सामन्यांमध्ये भारताच्या सर्वात सातत्यपूर्ण फलंदाजांपैकी एक असूनही, गिलला टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये, विशेषतः सलामीवीर म्हणून आपली जागा पक्की करता आलेली नाही. संघ व्यवस्थापन आता धावा जमा करण्याऐवजी प्रभावी सुरुवातीला प्राधान्य देत आहे.

पॉवरप्लेमधील त्याच्या संथ स्ट्राइक रेटची चिंता व अधिक स्फोटक पर्यायांचा उदय यामुळे त्याच्या विरोधात निर्णय गेल्याचे दिसते. त्याने दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या तीन सामन्यांमध्ये केवळ ४, ० आणि २८ धावा केल्या.

शुभमन गिल सध्या धावा काढण्यात अपयशी ठरत आहे व त्याने गत विश्वचषकातही भाग घेतला नव्हता, असे निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

याउलट, ईशान किशनच्या पुनरागमनातून निवडकर्त्यांनी डावखुरा-उजवा फलंदाज संयोजन आणि वरच्या फळीतील आक्रमक यष्टीरक्षक-फलंदाजांवर पुन्हा एकदा भर दिल्याचे दिसून येते.

**टी-२० विश्वचषकासाठी भारतीय संघ जाहीर**



तंदुरुस्ती व उपलब्धतेच्या समस्यांमुळे या वर्षातील बराच काळ संघाबाहेर असलेल्या ईशान किशनने अलीकडील सय्यद मुश्ताक अली चषकामध्ये प्रभावी कामगिरी केली व एका शानदार शतकाच्या जोरावर झारखंडला विजेतेपद मिळवून दिले.

हा गिलच्या फॉर्मचा प्रश्न नाही. आम्हाला वरच्या फळीत एक यष्टीरक्षक हवा होता, असे कर्णधार सूर्यकुमारने गिलला वगळण्याबद्दल सांगितले.

**जयस्वाल, जितेश शर्मा बाहेर**

किशनच्या समावेशामुळे प्रतिभावान यशस्वी जयस्वालला संघाबाहेर राहावे लागले, तर जितेश शर्मानेही संघातले आपले स्थान गमावले.



भारताने अव्वल आणि मधल्या फळीत फलंदाजीची ताकद वाढवली आहे. सूर्यकुमार, तिलक वर्मा व किशन यांच्यासोबत अभिषेक शर्माची निवड केली आहे, तर रिंकू सिंगच्या उपस्थितीमुळे भारताची एका विशेष फिनिशरवरील वचनबद्धता कायम आहे. रिंकू दबाव सहन करून अखेरच्या षटकांमध्ये जोरदार फटकेबाजी करू शकतो.

अष्टपैलू खेळाडूंची खोली हे संघाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हार्दिक पांड्या पुन्हा एकदा अंतिम एकादशचा समतोल साधण्याची जबाबदारी सांभाळेल, त्याला शिवम दुबेची साथ मिळेल. दुबेची फिरकी गोलंदाजांना लक्ष्य करण्याची क्षमता एक मोठी संपत्ती बनली आहे, आणि अक्षर-वॉशिंग्टन सुंदर ही जोडी वैविध्य, नियंत्रण व फलंदाजीची खोली प्रदान करेल. (वृत्तसंस्था)

### गोलंदाजीत अनुभव-प्रयोगाचा मेळ

गोलंदाजी विभागात अनुभव व प्रयोग यांचा मेळ आहे. जसप्रीत बुमराह अर्शदीप सिंगसोबत वेगवान गोलंदाजीच्या आक्रमणाचे नेतृत्व करेल. अर्शदीप हा टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचा सर्वात विश्वासार्ह डावखुरा गोलंदाज आहे.

हर्षित राणाच्या समावेशामुळे भविष्याचा वेध घेणारा दृष्टिकोन दिसून येतो, यात निवडकर्त्यांनी वेग व उसळीला एक वेगळे वैशिष्ट्या म्हणून पाठिंबा दिला आहे. फिरकीची जबाबदारी कुलदीप यादव व वरुण चक्रवर्तीवर असेल, ही जोडी फिरकीची चतुराई व रहस्य प्रदान करते. ही जोडी विशेषतः खडबडीत खेळपट्ट्यांवर मधल्या षटकांमध्ये प्रभावी ठरते. वॉशिंग्टन सुंदर व अक्षर पटेल आवश्यक असलेली अष्टपैलुत्व आणतात.

### भारतीय क्रिकेट संघ असा-

सूर्यकुमार यादव (कर्णधार), अभिषेक शर्मा, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल (उपकर्णधार), कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, अर्शदीप सिंग, हर्षित राणा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, ईशान किशन (यष्टीरक्षक), रिंकू सिंग.

## संघात स्थान न मिळालेले खेळाडू

◆ **मुंबई, २० डिसेंबर**

मुंबईत टी-२० विश्वचषकासाठी १५ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा झाल्यानंतर काही मिनिटांतच समाज माध्यमावर प्रश्न, गोंधळ आणि निराशेचा कल्लोळ माजला. प्रत्येक विश्वचषक संघाच्या निवडीमध्ये काही कठीण निर्णय घ्यावे लागतात, परंतु या निवडीमुळे इतर निवडींपेक्षा जास्त चर्चा झाली. पात्रतेचा दावा असलेले अनेक खेळाडू संघाबाहेर राहिले, जे थोडक्यात संधी हुकल्यामुळे दुर्दैवी ठरले.

**जितेश शर्मा** : विदर्भाच्या जितेश शर्माच्या वगळण्याइतका गोंधळ कदाचित इतर कोणत्याही गोष्टीमुळे निर्माण झाला नाही. या यष्टीरक्षक-फलंदाजाने भारताच्या टी-२० संघात आपले स्थान पक्के केले होते, सध्या, जितेश आधी संघात होता आणि त्याने खरं तर काहीही मोठी चूक केलेली नाही, असे आगरकरने स्पष्ट केले. जितेशच्या वगळण्याचा निर्णय पचायला अधिक कठीण जाण्याचे कारण म्हणजे त्याचा अलीकडचा फॉर्म आहे. त्याने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूसाठी आयपीएल विजेतेपदाच्या मोहिमेदरम्यान प्रभावी कामगिरी केली. या कामगिरीमुळे त्याचे विश्वचषकातील स्थान निश्चित झाले आहे, असा विश्वास होता.

त्याऐवजी, निवडकर्त्यांनी संजू सॅमसन व ईशान किशन यांची दोन यष्टिरक्षक-फलंदाज म्हणून निवड केली. २०२५ च्या सय्यद मुश्ताक अली चषकांत झारखंडसाठी ईशानच्या उत्कृष्ट देशांतर्गत क्रिकेटमधील कामगिरीमुळे पारडे त्याच्या बाजूने झुकले.



जितेश शर्मा

**शुभमन गिल** : उपकर्णधार आणि भारताच्या मर्यादित षटकांच्या योजनांमधील शुभमन गिल हा एक महत्त्वाचा खेळाडू, त्याच्या अनुपस्थितीनेच बातम्यांमध्ये वर्चस्व गाजवले. हा गिलच्या गुणवत्तेबद्दलचा निर्णय नसून, संघाच्या संतुलनामुळे घेतलेला एक सामरिक निर्णय होता,

**यशस्वी जयस्वाल** : यशस्वी जयस्वालच्या निवडीकडे दुर्लक्ष झाले तरीही हा युवा सलामीवीर मागील विश्वचषक संघाचा भाग होता.

**मोहम्मद शमी, मोहम्मद सिराज** : भारताचे सर्वात अनुभवी वेगवान गोलंदाज- मोहम्मद शमी आणि मोहम्मद सिराज - यांना टी-२० विश्वचषक संघातून वगळण्याच्या निर्णयावर अनेक स्तरातून तीव्र टीका होत आहे.

**ऋतुराज गायकवाड** : भारताच्या टी-२० आंतरराष्ट्रीय संघाच्या योजनांमधून ऋतुराज गायकवाडच्या सततच्या अनुपस्थितीमुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत,

**श्रेयस अय्यर** : आयपीएलमधील प्रभावी कामगिरी करूनही, श्रेयस अय्यर जवळपास दोन वर्षांपासून भारतासाठी एकाही टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यात खेळलेला नाही. (वृत्तसंस्था)

# महिलांची जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धा आजपासून सोलापुरात

## जामश्री - इलिझियम सोलापूर ओपन : २०२५

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस असोसिएशन व सोलापूर जिल्हा लॉन टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ओॲसिस, प्रिसीजन, इलिझियम-जामश्री व बालाजी अमाईन्स पुरस्कृत महिलांच्या जागतिक मानांकन लॉन टेनिस स्पर्धेचे आयोजन २१ ते २८ डिसेंबर २०२५ या कालावधीत एम. एस. एल. टी. ए. टेनिस सेंटर, जिल्हा क्रीडा संकुल, कुमठा नाका, सोलापूर येथे आयोजित केलेले आहे.

स्पर्धेची बक्षिस रक्कम ३०,०००/- अमेरिकन डॉलर असून स्पर्धेतील खेळाडूंना जागतिक मानांकन गुण देखील प्राप्त होणार आहेत. अशा प्रकारची अंतरराष्ट्रीय स्पर्धा सोलापूरात दहाव्यांदा भरविण्यात येत आहे. ही बाब सोलापूरसाठी अत्यंत अभिमानाची व प्रतिष्ठेची आहे. या स्पर्धेसाठी भारतासह १३ देशातुन एकूण ५६ महिला सहभागी होणार असुन यामध्ये २५ महिला खेळाडू या परदेशी आहेत.

सोलापूर व लगतच्या जिल्हयामध्ये लॉन टेनिस खेळाचा प्रसार व प्रचार व्हावा व सोलापूरचे नांव जागतिक पातळीवर व्हावे या उद्देशाने या स्पर्धा आयोजित केल्याचे जिल्हा संघटनेचे अध्यक्ष राजेश दमाणी यांनी सांगितले. या स्पर्धेसाठी आंतरराष्ट्रीय टेनीस फेडरेशनने पुण्याच्या शितल अय्यर व नितिन कन्नमवर यांची सामना पर्यवेक्षक तर राज्य संघटनेचे संयुक्त सचिव राजीव देसाई यांची सामना



संचालक म्हणून नियुक्ती केलेली आहे.

या स्पर्धेसाठी पंच म्हणून अखिल भारतीय लॉन टेनिस संघटनेने श्रीराम गोखले (पुणे), श्रध्दा दलि (मुंबई), अमित देशपांडे (पुणे), पोन्नुसामी (चेन्नई), अतनु चक्रवर्ती (कलकत्ता), रिया चाफेकर (पुणे) यांची नियुक्ती केलेली आहे.

स्पर्धेसाठी फिजीओथेरपीस्ट निकिता चव्हाण (पुणे), आनंदी दवे (गुजरात), इव्हेंट मॅनेजर संध्याराणी बंडगर, दळणवळण समन्वयक पुजा संचेती, भोजन व्यवस्था सुनंदा पवार व संतोष पवार पाहणार आहेत. तर व्हेन्यु इंनचार्ज म्हणून सुधीर सालगुडे व पुजा सालगुडे काम पाहणार आहेत.

या स्पर्धेसाठी पुण्याच्या पुजा इंगळे व सोलापूरच्या पार्थसारथी मुंढे यांना मुख्य फेरीत तर सोलापूरच्या आकृती सोनकुसरे, युरोपस्थित (आईसलँड) कर्हाडच्या गरिमा काळुगडे व मुंबईच्या डॅनिका फर्नांडो यांना पात्रता फेरीत थेट प्रवेश देण्यात आला असल्याचे सोलापूर जिल्हा लॉन टेनिस संघटनेचे मानद सचिव राजीव देसाई यांनी जाहिर केले. स्पर्धेचा उदघाटन समारंभ सोमवार २२ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता एम राज कुमार , पोलीस आयुक्त , सोलापूर यांच्या शूभहस्ते व सुंदर अय्यर , अंतरिम महासचिव , अखिल भारतीय लॉन टेनिस संघटना तसेच मानद सचिव महाराष्ट्र राज्य लॉन टेनिस संघटना यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्पर्धेत उत्कृष्ट बॉल पिकरची सेवा बजावणा-या मुला-मुलींना भेटवस्तु देऊन गौरवण्यात येईल. स्पर्धेचे पात्रता फेरीचे सामने दि. २१ व २२ डिसेंबर रोजी तर मुख्य फेरीचे सामने दि. २३ ते २८ डिसेंबर पर्यंत सकाळी ९ ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत खेळिवले जातील.

या स्पर्धेच्या आयोजनासाठी आली पंजवानी, मेहुल पटेल, ब्रिजेश गांधी, केशव रेड्डी, सुहास अदमाने, श्रीधर देवसानी, असिम सिंदगी, सुनिल मदन, राजेश पवार, अभिजित टाकळीकर, डॉ. वैभव मेरु, डॉ साजिद सय्यद, उज्वल कोठारी, परेश शहा, संतोष फाटक, सतीश भोसले यांचे सहकार्य लाभले.



# जागृती प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात सुरुवात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

जागृती विद्यामंदिर नेहरूनगर येथे क्रीडा सप्ताहास मोठ्या उत्साहात सुरुवात झाली.

याचे उद्घाटन उत्तर सोलापूर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी बापू जमादार, कुमठे केंद्राचे केंद्रप्रमुख वाघमोडे व तरुण भारतचे वृत्तसंपादक अजितकुमार संगवे यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विजयरत्न चव्हाण होते.

सर्वप्रथम ध्वजारोहण करून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांना प्रशालेच्या विद्यार्थ्यांनी संचलन करून मानवंदना दिली. त्यानंतर खेळाडूंनी क्रीडा ज्योत घेऊन प्रमुख अतिथींना क्रीडाजोत समर्पित केले मैदानाची पूजा करून या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यार्थी खेळाडूंना विद्यार्थिनी पवित्रा पुजारी हिने क्रीडा शपथ दिली. प्रास्ताविकेत क्रीडाशिक्षक संतोष जाधव यांनी क्रीडा धोरण व प्रशालेतील क्रीडा विभागाचे कामकाज आणि खेळाविषयीचे महत्व याची माहिती दिली. शिक्षक एस. एस. कोरे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कुमठे केंद्राचे केंद्रप्रमुख श्री. वाघमोडे यांनी मनोगतातून विद्यार्थ्यांना क्रीडा धोरण व खेळ यांचे महत्त्व पटवून दिले. क्रीडा धोरणानुसार राज्य पातळीवर राष्ट्रीय पातळीवर प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या खेळाडूंना नोकरीमध्ये पाच टक्के आरक्षण असल्याबाबतची माहिती व तसेच पोलीस भरतीला अडीच इंच उंचीची सवलत या खेळाडूंना मिळते.

श्री. संगवे यांनी आपल्या मनोगतातून दहावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना जिल्हास्तरावर राज्यस्तरावर प्राविण्य मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रेस गुण मिळाले जातात याची माहिती सांगितली.प्रमुख उद्घाटक श्री. जमादार यांनी विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व पटवून देऊन सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य चव्हाण यांनी क्रीडा सप्ताह बाबत माहिती सांगून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी हा क्रीडा सप्ताह चे आयोजन करण्यात येतो आणि सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुकही मनोगतातून केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा शिक्षक संतोष जाधव यांनी केले. प्रा. श्रीयुत सगेल यांनी आभार मानले.

# धाराशिवचे दोन्ही संघ उपांत्य फेरीत

## ६१ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धा : सोलापूरचे दोन्ही संघ पराभूत

**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. २० डिसेंबर-**

बीड येथील श्रीमती योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू असलेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेत उपांत्य फेरीचे चित्र स्पष्ट झाले आहे. महिला गटात धाराशिव विरुद्ध नाशिक आणि ठाणे विरुद्ध पुणे, तर पुरुष गटात धाराशिव विरुद्ध पुणे आणि मुंबई उपनगर विरुद्ध सांगली हे उपांत्य सामने रंगणार असून अंतिम फेरीची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

महिला गटातील उपांत्यपूर्व सामन्यात धाराशिवने मुंबई उपनगरचा १ डाव २३ गुणांनी (३३-१०) पराभव करत आपली ताकद सिद्ध केली. धाराशिवकडून संध्या सुरवसे (४.१० मि. संरक्षण व २ गुण), मैथिली पवार (३.00 मि. संरक्षण), सुहानी धोत्रे (८ गुण), प्रणाली काळे (६ गुण), अश्विनी शिंदे (नाबाद १.५0 व २.२० मि. संरक्षण व ४ गुण) यांनी विजयात निर्णायक भूमिका बजावली. मुंबई उपनगरकडून देविका अहिरे (१.१० मि. संरक्षण) आणि साक्षी वाफेलकर (१.२० व १.४0 मि. संरक्षण व २ गुण) यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली.

महिलांच्या दुसऱ्या सामन्यात ठाण्याने सांगलीचा ८ गुण व ५.00 मिनिटे राखून पराभव केला. ठाण्याकडून धनश्री कंक (२.४५ मि. संरक्षण), साक्षी तोरणे (२.१९ मि. संरक्षण), गीतांजली नरसाळे (२.२० मि. संरक्षण), प्रियंका भोपी (१.४५ मि. संरक्षण), दीक्षा काटेकर (२ मि. संरक्षण) यांनी भक्कम कामगिरी केली. सांगलीकडून स्वप्नाली तामखडे (१.२0 मि. संरक्षण), दीक्षा पाटील (१.१५ मि. संरक्षण), प्रतीक्षा बिराजदार (२, १.२0 मि. संरक्षण व ८ गुण) यांनी सामन्यात चुरस निर्माण केली.

महिलांच्या तिसऱ्या सामन्यात पुणे संघाने अहिल्यानगरचा १ डाव ४१ गुणांनी (५१-१०) पराभव केला. पुण्याकडून दिपाली राठोड (४.00 मि. संरक्षण व १0 गुण), भाग्यश्री बडे (२.५0 मि. संरक्षण व २ गुण), श्वेता वाघ (३.00 मि. संरक्षण व ४ गुण), साक्षी वसावे (२.४0 मि. संरक्षण), श्वेता नवले (२.५0 मि. संरक्षण व २ गुण) यांनी चमकदार खेळ केला. अहिल्यानगरकडून भाग्यश्री उबळे व समीक्षा माळी यांनी लढत दिली.

महिलांच्या चौथ्या सामन्यात नाशिकने रत्नागिरीचा ८ गुणांनी (२८-२०) पराभव केला. नाशिककडून सरिता दिवा (२.२0 व २.१0 मि. संरक्षण व ४ गुण) हिने अष्टपैलू खेळ केला. रत्नागिरीकडून पायल पवार (१.१0 व २.५0 मि. संरक्षण व ८ गुण), अपेक्षा सुतार (१.५0 मि. संरक्षण), दिव्या पाल्ये (४ गुण) यांनी चांगली कामगिरी केली.

पुरुष गटातील पहिल्या उपांत्यपूर्व सामन्यात मुंबई उपनगरने साताऱ्याचा १0 गुण व ७ मिनिटे राखून (३0-२0) पराभव केला. मुंबई उपनगरकडून हर्षद हातणकर (२ मि. संरक्षण व ६ गुण), ऋषिकेश मुरचवडे (१ मि. संरक्षण व ६ गुण), रामचंद्र झोरे (१.२0 व १.३0 मि. संरक्षण व ४ गुण), धीरज भावे (१.५0 मि. संरक्षण) यांनी भक्कम खेळ केला. साताऱ्याकडून दिग्विजय मासाळ (१.२0 मि. संरक्षण व ६ गुण), लोकेश जाधव (नाबाद १.४0 मि. संरक्षण), ओम बोडरे (१.२0 मि. संरक्षण व २ गुण) यांनी प्रयत्न केले.



पुरुषांच्या दुसऱ्या सामन्यात पुण्याने ठाण्याचा ३३-२८ असा ५ गुण व ६.४0 मिनिटे राखून पराभव केला. पुण्याकडून प्रतीक वाईकर (२ व १.४0 मि. संरक्षण), रविकिरण काजवे (८ गुण), शुभम थोरात (१.२0 मि. संरक्षण व १२ गुण), मिलिंद कुरपे (१.२0 व १.३0 मि. संरक्षण), शिवराम शिंगाडे (१.३0 व १.२0 मि. संरक्षण) यांनी निर्णायक खेळी केली. ठाण्याकडून शुभम उतेकर (१.४0 मि. संरक्षण व १0 गुण), शुभम जाधव (१ व १.३0 मि. संरक्षण व २ गुण), आदित्य पाटील (१.३0 व १ मि. संरक्षण व २ गुण) यांनी चांगली लढत दिली.

### सोलापूर-सांगलीतील लढत रंगतदार

0चौथा सामना सांगली विरुद्ध सोलापूर अत्यंत चुरशीचा ठरला. निर्धारित वेळेत ३६-३६ बरोबरी सुटल्यानंतर सांगलीने जादा डावात २ गुण व ५0 सेकंद राखून (५४-५२) विजय मिळवला. सोलापूरकडून सौरभ चव्हाण (१.२0 मि. संरक्षण व १0 गुण), नीरज कोळी (८ गुण), अजय कश्यप (१.१0 व १.३0 मि. संरक्षण व ६ गुण), जुबेर शेख (१.१५ व १.२0 मि. संरक्षण व ४ गुण), सुजित मेटकरी (१.२५ मि. संरक्षण व ८ गुण) यांनी उत्कृष्ट खेळ केला. सांगलीकडून आतिश तलप (१.२0 व २.१0 मि. संरक्षण व २ गुण), मिलिंद चावरेकर (१.00 व १.00 मि. संरक्षण व १0 गुण), अक्षय मासाळ (१.१२ व १.१८ मि. संरक्षण व ६ गुण), प्रेम रणदिवे (१0 गुण) यांनी शेवटपर्यंत झुंज दिली.

### धाराशिवने उडवला मुंबईला विरुध्द बार

पुरुषांच्या तिसऱ्या सामन्यात धाराशिवने मुंबईचा ३१-२६ असा ५ गुण व १.३0 मिनिटे राखून चुरशीच्या खेळात पराभव केला. धाराशिवकडून जितेंद्र वसावे (१.३0 मि. व नाबाद २.२0 मि. संरक्षण व ४ गुण), श्याम ढोबळे (७ गुण), भारतसिंग वसावे (१.३0 मि. संरक्षण), राज जाधव (१.३0 व १.२0 मि. संरक्षण व २ गुण), अनिकेत पवार (२.२0 मि. संरक्षण), हरद्या वसावा (४ गुण) यांनी विजयात मोलाचा वाटा उचलला. मुंबईकडून वेदांत देसाई (२.१0 व १.२0 मि. संरक्षण व २ गुण), पियुष घोलम (१.00 मि. संरक्षण व ८ गुण), सम्यक जाधव (१.१0 व २.१0 मि. संरक्षण व ४ गुण) यांनी चांगली कामगिरी केली.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सिध्देश्वर यात्रा आणि निवडणुकीत काही गडबड केल्यास कारवाई

## पोलिस प्रशासनाचा रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांना इशारा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर -**

सिध्दरामेश्वर यात्रा व महापालीका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने सोलापुर आयुक्तलयात, फौजदार चावडी पोलीस ठाणे हद्दीतील रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार, यांना पोलीस ठाणे येथे बोलावुन घेवून त्यांना सिध्दरामेश्वर यात्रा व सोलापूर महानगरपालीका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने शांतता राखण्याबाबत सुचना देण्यात आल्या, त्यांनी काही गडबड केल्यास त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असा समज पोलीस प्रशासनाच्या वतीने देण्यात आला आहे. न्यायालयीन प्रक्रीया जलद गतीने होण्याकामी अवघ्या चार तसातच सर्व डीबी पथकाने मेहनत घेवुन १८ वॉरंट व १३ समन्सची बजावणी केली.

मुख्य न्यायदंडाधिकारी, जिल्हा न्यायालय सोलापूर यांचेकडून प्राप्त वॉरंट व समन्स याची तात्काळ बजावणी होवुन न्यायालयीन प्रक्रीया जलद गतीने होण्यासाठी फौजदार चावडी पोलीस ठाणे कडुन दि. २० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत डी.बी. अंमलदार यांचेमार्फत विशेष मोहिम राबविण्यात आली. यामध्ये १८ बेलेबल व नॉलवेलेबल वारंट बजावणी करण्यात आले. १३ समन्सची बजावणी अवघ्या चार तासातच करण्यात आले.

फौजदार चावडी पोलीस ठाणे सोलापूर शहर कडील गुन्ह्यानुसार दोषी धरुन आजन्म करावास व २० हजार रुपये दंडाची शिक्षा झाली आहे. या गुन्ह्याच्या तपासी अधिकारी सहाय्यक पोलीस आयुक्त विभाग-१ कम लाकर ताकवले तसेच सरकारी वकिल एस.ए. डोके, कोर्ट पैरवी विक्रांत कोकणे यांनी काम पाहिले. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (परिमंडळ) विजय कबाडे, सहा. पोलीस आयुक्त विभाग-१, प्रताप पोमण, वरिष्ठ पोलीस निरीक्षक महादेव राउत, दुय्यम पोलिस निरीक्षक तानाजी दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे प्रमुख सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय क्षिरसागर, पोह प्रविण चुंगे, पोह बसवेश्वर परीट, पोह सचिन बाबर, पोना शिवानंद भिमदे, पोना सर्जेराव पाटील, पोकों ज्ञानेश्वर गायकवाड, पोकों अजय चव्हाण, पोकों सुरज सोनवलकर, पोकों महादेव शिंदे, पोकों अतिश पाटील, पोकों कृष्णा बडुरे, पोकों पंकज घाडगे, पोकों सुधाकर माने, पोकों विनोद व्हटकर, पोकों तोसिफ शेख, पोकों नितीन मोरे, पोकों शशिकांत दराडे, पोकों विनोदकुमार पुजारी, पोकों अमोल खरटमल यांनी केली.

## महत्वाचे...



### आमदार आवताडे यांनी सहकुटुंब केले मतदान

**मंगळवेढा,दि.२० डिसेंबर-**

आमदार समाधान दादा आवताडे यांनी मंगळवेढा नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने येथे आज सहकुटुंब मतदानाचा हक्क बजावला. लोकशाही अधिक सक्षम आणि बळकट करण्यासाठी प्रत्येक नागरिकाने मतदान प्रक्रियेत सहभागी होणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी सांगितले. सक्षम, पारदर्शक आणि जबाबदार स्थानिक स्वराज्य संस्थेचे प्रशासन घडवण्यासाठी मतदान करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी मा. उपनगराध्यक्ष अजित जगताप, भाजपा युवा मोर्चा तालुकाध्यक्ष आकाश डांगे तसेच इतर सहकारी आणि मतदार बंधू-भगिनी उपस्थित होते.



### राज्य उत्पादन शुल्कतर्फे निराधारांना ब्लँकेट वाटप

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

राज्य उत्पादन शुल्कतर्फे गोर,गरिब, वंचित बेघर निराधारांना १५० ब्लँकेट वाटप करण्यासाठी आस्था सामाजिक संस्थेस सुपुर्द केले. ब्लँकेट वाटप करण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या अधीक्षिका भाग्यश्री जाधव आणि पंढरपूर तालुक्यातील खर्डी येथील सीताराम महाराज साखर कारखान्याचे मुख्य अधिकारी डॉ राजलक्ष्मी गायकवाड यांच्या माध्यमातून आस्था सामाजिक संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले. हे सर्व ब्लँकेट एमआयडीसी अक्कलकोट रोड येथील गरीब, वंचित, बेघर, निराधार महिलांना व शिरापूर येथील गरीब शेतकरी महिलांना ब्लँकेट वाटप करण्यात येणार आहे याप्रसंगी आस्था सामाजिक संस्थेचे अध्यक्ष आनंद तालिकोटी, प्रसिद्धी प्रमुख सुहास छंचुरे, पिंटू कस्तुरे उपस्थित होते



### घरात बनवलेले अन्न खावे : डॉ. गुल्लापल्ली

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

बाहेरील पदार्थ टाळून, घरात बनवलेले अन्न खावे यामुळे कुठलाही घोका निर्माण होत नसल्याचे मत 'पद्मशाली सखी संघम'च्या वतीने आयोजित 'स्त्रियांच्या दैनंदिन आरोग्य समस्या कर्करोग आहार व जीवनशैली यावर प्रतिबंधात्मक उपाय योजने संदर्भातील कार्यक्रमात डॉ. नम्रता गुल्लापल्ली (बिंगी) यांनी मार्गदर्शनवेळी व्यक्त केले. हल्ली बाजारात विक्री होणा-या पदार्थांमध्ये भेसळीचा प्रमाण वाढलेले आहे. गाय-म्हशींतून दूध जास्त प्रमाणात मिळावे म्हणून काही लोक इंजेक्शन देत आहेत. तसेच प्लॅस्टिकमधून दूधाची विक्री होत आहे. दूधापासून बनविणा-या पदार्थ सुध्दा धोकादायक, त्याचबरोबर प्लॅस्टिकमध्ये खाण्यासाठी गरम पदार्थ ठेवलेले खाल्यास आरोग्यावर परिणाम होतो. फ्रिजमधील खायचे पदार्थ पुन्हा-पुन्हा गरम करुन खाणे ते अतिरेक होऊन कँसरला आमंत्रण देतो. आजकाल अनेकांना सूर्यप्रकाशात जायला नको वाटते. गेल्याने 'व्हिटॅमिन डी' मिळतो. यावेळी डॉ. नवनीता रच्चा (गुल्लापल्ली), सखी संघम'च्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, यंत्रमाग धारक संघाचे खजिनदार अंबादास बिंगी, भाजपाचे ज्येष्ठ रामचंद्र जन्नू यांची व्यासपीठावर उपस्थिती होती. डॉ. गुल्लापल्ली यांनी, कुठल्या पदार्थांपासून कँसर होतो याची माहिती दिले आहे. डॉ. नवनीता रच्चा यांनी महिलांनी दोन महिन्यातून एकदा तरी डॉक्टरांकडून तपासणी करुन घ्यावे. असे सांगून घरात असताना देखील स्वतःच तपासणी कसे करावे याचे प्रात्यक्षिके दाखवले. सल्लागार मेघा इट्टम यांनी प्रास्ताविक करुन सूत्रसंचालन केले तर हेमा मैलारी यांनी आभार मानले.

### राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी द्यावी

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीत विविध राजकीय पक्षांची मोर्चे मागणी सुरू आहे. या निवडणुकीत राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी द्यावी. जात पडताळणी प्रमाणपत्र पाहूनच उमेदवारी द्यावी, अशी मागणी ओबीसी आरक्षण बचाव समितीच्या वतीने ड. राजन दीक्षित यांनी पत्रकार परिषदेत केली आहे. राज्यात २९ महापालिकेच्या निवडणुकीच्या कार्यक्रम जाहीर झाला आहे. सोलापूर महापालिकेत एकूण १०२ नगरसेवक आहेत. महापालिकेत ओबीसी वर्गासाठी २७ टक्के आरक्षण असून २७ जागा या ओबीसींसाठी आरक्षण ठेवले आहेत. दरम्यान, ओबीसी आरक्षणात घुसखोरी सुरू आहे असा आरोप करत सर्वच राजकीय पक्षांनी मूळ ओबीसी उमेदवारांनाच संधी देऊन सामाजिक न्याय द्यावा अशी अपेक्षा ड. राजन दीक्षित यांनी व्यक्त केली आहे. मूळ ओबीसींनाच राखीव जागेवर उमेदवारी देण्यासाठी काही राजकीय पक्षांनी भूमिका जाहीर केली आहे. इतर पक्षांनीही तशी भूमिका जाहीर करावी. येत्या महापालिका निवडणुकीमध्ये मूळ ओबीसी उमेदवारांना डावल्यास २५ डिसेंबर नंतर निर्णय घेणार आहे, असेही अ‍ॅड. राजन दीक्षित यांनी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस डॉ. माधुरी पारपल्लीवार, शेखर बंगाळे, शिवराज बंगाळे आदी उपस्थित होते.

### शहाजी भालके यांचे निधन



**बार्शी, दि.२० डिसेंबर-**

तालुक्यातील गाडेगाव येथील शहाजी गजेंद्र भालके यांचे अल्पशा आजाराने दि. १७ डिसेंबर रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७८ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांना उपचारासाठी बार्शीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते पण उपचाराला प्रतिसाद मिळाला नाही. ते गाडेगावचे माजी उपसरपंच व उद्योजक अमोल भालके यांचे वडील होत.

# सोलापूर जनता बँक माढा शाखेचा ग्राहक मेळावा संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**माढा,दि.२० डिसेंबर-**

सोलापूर जनता बँकेच्या हिरक महोत्सवी वर्षानिमित्त गेले वर्षभर अनेक शाखेत सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. त्याअंतर्गत शुक्रवारी दि.१९ डिसेंबर रोजी माढा शाखेत ग्राहक मेळावा घेण्यात आला.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बँकेचे उपाध्यक्ष मिलिंदराव कुलकर्णी होते. प्रमुख पाहुणे माढा नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष म ीनलताई साठे, मनकर्णा पतसंस्थेचे चेअरमन झुंजार नाना भांगे, लोकमंगल पतसंस्थेचे संचालक शहाजीराव साठे हे होते. या कार्यक्रम ाचे उदघाटन मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दिपप्रज्वलनाने झाले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार उपाध्यक्ष कुलकर्णी यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी प्रातिनिधिक स्वरूपात राजेंद्र फडतरे, भारत गवळी यांना कर्ज मंजूरी पत्र देण्यात आले. बँकेच्या विविध कर्ज योजनांची व ठेवीची माहिती बँकेचे सुहास मुळजकर यांनी दिली. मगन सावंत, मदन मुंगळे, सुधीर कुलकर्णी व रहीम पठाण या खातेदारांनी मनोगत मांडले. प्रमुख पाहुणे अ‍ॅड. मीनल साठे यांनी बँकेची सेवा चांगली असल्याचे नमूद करुन बँकेच्या प्रगती साठी शुभेच्छा दिल्या. समारोपात उपाध्यक्ष कुलकर्णी यांनी सर्व सभासद ग्राहक खातेदारांना बँकेच्या विविध कर्ज योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. माढा नगर परिषदेने पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घर बांधकाम योजना तयार केल्यास त्यासाठी बँक अर्थ सहाय्य करेल असे आश्वासन दिले. स्वागत, प्रास्ताविक, विविध कर्ज योजनांची माहिती सांगणे, आभार प्रदर्शन व सूत्रसंचालन सुहास मुळजकर यांनी केले. शाखा व्यवस्थापक दत्तात्रय मनसुखे व शाखेतील सर्व कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.



# भाळवणी हायस्कूलमध्ये माता-पालक मेळावा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२० डिसेंबर -**

तालुक्यातील भाळवणी येथील न्यू इंग्लिश स्कूलमध्ये माता पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता.माता पालक मेळाव्यासाठी तज्ञ मार्गदर्शक म्हणून पंढरपूर येथील डॉ. वैभवी भोसले उपस्थित होत्या. तसेच कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या उपप्राचार्या पी आर मोरे होत्या. तर पालक संघाच्या उपाध्यक्ष प्राची माळवदे उपस्थित होत्या.

याप्रसंगी मुख्याध्यापक के. डी. शिंदे यांनी मुलांना मोबाईल पासून जितके दूर राहता येईल तितके राहण्याचा प्रयत्न करा असे मार्गदर्शन केले. यावेळी विद्यालयाचे पर्यवेक्षक बेसिकराव उपस्थित होते.

प्रास्ताविक एस.पी.कदम यांनी केले. पाहुण्यांचा परिचय एन.बी. विधाते यांनी करून दिला. सूत्रसंचालन एस.एच.लिंगे व एम.एस.नागणे यांनी केले. यू.व्ही. नागटिळक यांनी आभार मानले.

### उळे-कासेगाव रस्त्याची दूरवस्था; दुरूस्तीची मागणी

**सोलापूर,दि.२० डिसेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील उळे ते कासेगाव या रस्त्याचे रूंदीकरणीची मागणी ग्रामस्थांनी केली आहे. सोलापूरपासून अवघ्या १६ किलोमीटर अंतरावरील कासेगाव येथून दररोज उळे मार्गावर मोठी वाहतूक असते. उळे मार्गे सोलापूरला दररोज या गावातून विद्यार्थी, व्यवसायिक, नोकरदार, शेतकरी यांची मोठी वाहतूक असते. या मार्गाची सध्या दूरवस्था झाल्याने वाहतूकीस अडथळा होत आहे. जागोजागी खड्डे पडले आहेत. तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूस साईडपट्ट्याही नाहीत. त्यामुळे अपघात निमंत्रण मिळत आहे.

# हिवाळ्यात आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक काळजी घ्या

- पालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे
- हीटर, शेकोटी लावताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करावे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

घरात योग्य हवेशीर व्यवस्था ठेवावी; मात्र थंड वारा थेट अंगावर येणार नाही याची दक्षता घ्यावी. हीटर, शेकोटी किंवा आग लावताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करावे. श्वास घेण्यास त्रास, छातीत दुखणे, तीव्र खोकला, थकवा किंवा वेदना वाढल्यास त्वरित जवळच्या आरोग्य केंद्रात किंवा रुग्णालयात संपर्क साधावा, असे आरोग्य अधिकारी डॉ. राखी माने स्पष्ट केले आहे.

हिवाळी हंगामात तापमानात लक्षणीय घट होत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक ती काळजी घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीटर, शेकोटी किंवा आग लावताना सुरक्षिततेच्या सर्व नियमांचे पालन करावे. आरोग्याची योग्य काळजी घेतल्यास आजारांची तीव्रता टाळता येऊ शकते. सर्व नागरिकांनी सूचनांचे काटेकोरपणे पालन करून स्वतःचे व कुटुंबियांचे आरोग्य सुरक्षित ठेवावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

थंडीमुळे सर्दी, खोकला, ताप, दमा, हृदयविकार तसेच सांधेदुखी यांसारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. विशेषतः सीओपीडी, दमा, हृदयविकार, एंजाइना तसेच संधिवात यांसारख्या आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना या काळात अधिक धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे सर्व नागरिकांनी, विशेषतः आजारग्रस्त व्यक्तींनी प्रतिबंधात्मक उपाय अवलंबावेत, असे आवाहन करण्यात येत आहे. थंडीपासून संरक्षणासाठी उबदार कपडे वापरावेत. सकाळी लवकर व रात्री उशिरा थंड हवामानात अनावश्यक बाहेर जाणे टाळावे. तज्ञांच्या मार्गदर्शनानुसार व्यायाम, योग, प्राणायामचा सराव करावा. सीओपीडी व दम्याच्या रुग्णांनी डॉक्टरांनी दिलेली औषधे नियमितपणे घ्यावीत व इनहेलर नेहमी सोबत ठेवावा. हृदयविकार व एंजाइना असलेल्या रुग्णांनी रक्तदाब व साखर नियंत्रणात ठेवावी व थंडीमध्ये जड श्रम टाळावेत.

संधिवात असलेल्या रुग्णांनी शरीर उबदार ठेवावे, हलका व्यायाम करावा व सांधे थंड होणार नाहीत याची काळजी घ्यावी. गरम, ताजे व पोषक आहार घ्यावा. धूम्रपान, मद्यपान व तंबाखूजन्य पदार्थांचे सेवन टाळावे.

# वालचंद ज्युनिअर कॉलेजमध्ये गुणवत्तेचा जल्लोष

## वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात शैक्षणिक, क्रीडा व सहशैक्षणिक यशाचा गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् अँड सायन्स कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ शनिवारी दि. २० डिसेंबर रोजी वालचंद सभागृहात उत्साहात संपन्न झाला. विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाचा गौरव, शिक्षकांच्या योगदानाचा सन्मान आणि शैक्षणिक गुणवत्तेचा उत्सव असा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, कस्तुरबाई कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. अश्विन बोंदार्डे हे प्रमुख पाहुणे होते. वालचंद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी अध्यक्षस्थानी होते. यावेळी समारंभाचे निमंत्रक डॉ. ए. एम. महाजन, डॉ. के. आर. राव, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे तसेच स्वयंअर्थसहाय्य विभागाच्या समन्वयिका सौ. सारिका महिंद्रकर यांची प्रमुख उपस्थिती होती. दीपप्रज्वलनाने सुरूवात झाली. सुकन्या साखरे हिने नमोकार महामंत्र व 'आईगिरी नंदिनी'वर नृत्याविष्कार सादर केला. उपप्राचार्य अनुप म्हेत्रे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. डॉ. ए. एम. महाजन यांनी परिचय करून दिला, प्राचार्य डॉ. संतोष कोटी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



प्राचार्य डॉ.कोटी यांनी वार्षिक अहवाल सादर केला. यावेळी इयत्ता बारावीतील अनुष्का बिराजदार, प्रज्ञा बांगड (अनुदानित कला विभाग) आणि अथर्व गौर (स्वयंअर्थसहाय्य विज्ञान विभाग) यांना त्यांच्या सर्वांगीण प्रगती, शिस्तबद्ध वर्तणूक आणि नेतृत्वगुणांच्या आधारे आदर्श विद्यार्थी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

पारितोषिक वाचन उज्वला तांदळे, अंबिका माळी आणि आर. एस. हजारे यांनी केले. प्रा.चेतन तुपकर यांनी पसायदान सादर करून सूत्रसंचालन केले. सारिका महिंद्रकर यांनी आभार मानले.



# वीट गाडी चालकाचा तोल गेल्याने कारला जोराची धडक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.२० डिसेंबर -**


अक्कलकोट रोडवरील संगमेश्वर नगर, मणिधारीसमोर शनिवारी दुपारच्या सुमारास भीषण अपघाताची घटना घडली. वीट गाडी चालकाचा अचानक तोल गेल्याने समोरून येणाऱ्या कारला जोराची धडक बसली. या धडकेनंतर वीट गाडी रस्त्यावरच पलटी झाली. या अपघातात वीट गाडी क्र. एमएच४६ आर ५७०५ ने कार क्र.एमएच १३ ईसी ८७२५ ला जोरदार धडक दिली. धडकेचा जोर इतका भीषण होता की कारचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. मात्र, सुदैवाने कारमधील प्रवासी थोडक्यात बचावले, मोठी दुर्घटना टळली.

अपघातात वीट गाडी चालक गंभीर जखमी झाला असून, त्याला तातडीने उपचारासाठी सोलापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज शासकीय रुग्णालय सिव्हिल हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. या घटनेनंतर काही काळ अक्कलकोट रोडवरील वाहतूक पूर्णतः विस्कळीत झाली होती. दरम्यान, या परिसरात यापूर्वीही वारंवार अपघात घडल्याचे स्थानिक नागरिकांनी सांगितले. वाहनांचा वेग, अरुंद रस्ता आणि योग्य वाहतूक नियोजनाचा अभाव यामुळे अपघातांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप नागरिकांनी केला. भविष्यातील अपघात टाळण्यासाठी उड्डाणपूल उभारणे किंवा तातडीच्या वाहतूक सुधारणा करण्याची मागणी स्थानिकांकडून होत आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. पुढील तपास सुरू आहे. अपघात पाहण्यासाठी घटनास्थळी नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

# अंधारातून प्रकाशाकडे नेणारा दिवस; २१ डिसेंबर, उत्तरायणाचा प्रारंभ

दि.२१ डिसेंबर हा दिवस जगभरात खगोलशास्त्रीय, ऋतूचक्रात्मक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. यादिवशी हिवाळी अयनांत घडतो. उत्तर गोलार्धात हा दिवस वर्षातील सर्वात लहान दिवस आणि सर्वात मोठी रात्र म्हणून ओळखला जातो. निसर्गाच्या एका निर्णायक टप्प्याचे प्रतीक असलेला हा दिवस मानवी जीवनालाही अंतर्मुख होण्याची, विचार करण्याची आणि नव्या आशेने पुढे पाहण्याची प्रेरणा देतो.

खगोलशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, दि.२१ डिसेंबर रोजी सूर्य मकरवृत्तावर लंबवत असतो. पृथ्वीच्या अक्षाच्या झुकावामुळे उत्तर गोलार्धात सूर्यकिरण कमी प्रमाणात पडतात. परिणामी दिवसाचा कालावधी कमी होतो आणि रात्र मोठी होते. यानंतर सूर्याचा प्रवास हळूहळू उत्तर दिशेकडे सुरू होतो. त्यामुळे पुढील दिवसांपासून दिवस वाढू लागतात. हीच प्रक्रिया भारतीय परंपरेत उत्तरायणाची चाहूल म्हणून ओळखली जाते. जरी प्रत्यक्ष उत्तरायण मकर संक्रांतीपासून मानले जात असले, तरी दि.२१ डिसेंबर हा त्याचा खगोलशास्त्रीय पाया आहे. ऋतू व निसर्गाच्या दृष्टीने हा दिवस हिवाळ्याचा कळस दर्शवतो.



थंडी तीव्र होते, सकाळी धुके वाढते आणि वातावरणात एक प्रकारची शांतता जाणवते. झाडांची वाढ मंदावते, अनेक वनस्पती विश्रांतीच्या अवस्थेत जातात. निसर्गाचा हा स्थिर आणि शांत काळ मानवी मनालाही अंतर्मुख बनवतो. भारतीय जीवनपद्धतीत ऋतूंचा मानवी जीवनावर मोठा प्रभाव मानला जातो. त्यामुळेच ऋतुनुसार आहार, सण, व्रते आणि जीवनशैली ठरवली जाते. शेतीच्या दृष्टीने दि.२१ डिसेंबरचा काळ अत्यंत महत्त्वाचा आहे. हा काळ रब्बी हंगामाच्या वाढीचा असतो. गहू, हरभरा, ज्वारी, कांदा यांसारखी रब्बी पिके थंडीच्या वातावरणात चांगली वाढतात. थंड हवामानामुळे कीड व रोगांचे प्रमाण तुलनेने कमी राहते. त्यामुळे शेतकरी वर्गासाठी हा काळ आशेचा असतो. निसर्गाच्या या बदलत्या चक्रावरच शेतीचे संपूर्ण गणित अवलंबून आहे, याची जाणीव हा दिवस करून देतो. सांस्कृतिक व पारंपरिक संदर्भात दि.२१ डिसेंबरला विशेष स्थान आहे. भारतीय परंपरेत सूर्याला जीवनदाता मानले जाते. सूर्याची गती म्हणजेच काळाची गती, असे मानले जाते. हिवाळी अयनांतानंतर सूर्याचा उत्तरमार्ग सुरू होतो, ज्याला शुभ परिवर्तनाची सुरुवात मानली जाते. अंधाराच्या कमाल मर्यादेनंतर प्रकाशाचा प्रवास सुरू होतो, ही संकल्पना भारतीय विचारधारेशी सुसंगत आहे. म्हणूनच हा दिवस संयम, आत्मचिंतन आणि नव्या संकल्पांचा मानला जातो. आध्यात्मिक अर्थाने पाहता, दि.२१ डिसेंबर हा दिवस आशा आणि नवचैतन्याचे प्रतीक आहे. अंधार जरी मोठा असला, तरी त्यानंतर प्रकाश वाढणारच, हा संदेश या दिवसातून मिळतो. मानवी जीवनात येणाऱ्या अडचणी, संकटे आणि निराशा यानंतरही आशेचा किरण असतो, याची आठवण हा दिवस करून देतो. जगातील अनेक संस्कृतींमध्ये हिवाळी अयनांताच्या दिवशी ध्यान, साधना, प्रार्थना आणि अंतर्मुखतेला विशेष महत्त्व दिले जाते. आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात दि.२१ डिसेंबरसारखा दिवस आपल्याला थांबून विचार करण्याची संधी देतो. आपण निसर्गाच्या चक्राशी किती जोडलेलो आहोत, आपले जीवन निसर्गाशी किती सुसंगत आहे, याचा विचार करण्याचा हा काळ आहे. अंधारातून प्रकाशाकडे जाण्याचा प्रवास हा केवळ निसर्गाचा नियम नाही, तर मानवी जीवनाचा मूलमंत्र आहे. अशा प्रकारे दि.२१ डिसेंबर हा दिवस केवळ कॅलेंडरवरील एक तारीख नसून, तो निसर्ग, विज्ञान, संस्कृती आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम आहे. अंधाराच्या टोकावरून प्रकाशाकडे जाण्याची सुरुवात करणारा हा दिवस आपल्याला सकारात्मकतेचा, आशेचा आणि नव्या प्रारंभाचा संदेश देतो.

**शब्दांकन-प्रा.राजेंद्र ठोंबरे, सांगोला**
**संकलन-दिपक भाकरे, सांगोला**

# आ.कल्याणशेट्टींची जबाबदारीतून मुक्तता; शहरातील तीन आमदार, शहराध्यक्ष सक्षम

## महापालिका निवडणूक प्रमुख नियुक्तीबाबत पालकमंत्री गोरेंकडून खुलासा




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाने महानगरपालिका निवडणूक प्रमुख पदावर अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांची नियुक्ती केली होती. परंतु आ. कल्याणशेट्टी यांनी जिल्हा परिषद निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर या पदाला न्याय देणे शक्य नसल्याचे सांगत या पदातून मुक्त करण्याची विनंती पक्षाला केली होती. याबाबत बोलताना पालकमंत्री गोरे म्हणाले की, पक्षाने आ. कल्याणशेट्टी यांची विनंती मान्य केली आहे.

महापालिका निवडणुकीसाठी शहरातील भाजपाचे तीन आमदार आणि शहराध्यक्ष सक्षम असल्याने यापदासाठी इतर कोणाचीही नियुक्ती पक्षाने केलेली नाही. सोलापूर भाजपामध्ये सध्या पक्षांतर्गत सर्वकाही अलबेल नसल्याची चर्चा होती. त्यातच भर म्हणजे आ. सुभाष देशमुख यांचा विरोध डावलून काँग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांना पक्षात प्रवेश देण्यात आला.

यावर कडी म्हणजे आ. सुभाष दशमुख आणि आ. विजयकुमार देशमुख या अनुभवी तसेच मंत्री राहिलेल्या आमदारांना डावलून त्यांचे ज्युनिअर असणारे आ. कल्याणशेट्टी यांना पक्षाने सोलापूर महापालिका निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्त केले. अगोदरच पक्षात नाराज असलेल्या दोन्ही देशमुखांची नाराजी आणखीन वाढणार हे लक्षात घेवून पक्षाने काही सूत्र हलविल्याचे वृत्त आहे. दरम्यान आ. कल्याणशेट्टी यांनी देखील आपल्याला या पदाला न्याय देता येणार नाही, कारण जिल्हा परिषद निवडणुका लागण्याची शक्यता असल्याने आपल्याला तिकडे लक्ष देणे क्रमप्राप्त असल्याचे पक्षाला कळविले होते. पालकमंत्री गोरे यांनी देखील शनिवारी पत्रकारांशी बोलताना सांगितले की, आ. कल्याणशेट्टी यांची विनंती पक्षाने मान्य केली आहे. महापालिका निवडणूक प्रमुख पदावर पक्षाने इतर कोणाचीही नियुक्ती केलेली नाही. तसेच शहरातील भाजपाचे आ. सुभाष देशमुख, आ. विजयकुमार देशमुख, आ. देवेंद्र कोठे आणि शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर या सक्षम आहेत.

पालकमंत्र्यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना याप्रकरणावर पडदा टाकून घडल्या प्रकारावर फुंकर घातली आहे. किमान दोन्ही आ. देशमुखांची नाराजी तरी यामुळे दूर होणार आहे.

# स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचे निधन



**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. २० डिसेंबर-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे १९६० पासून पूर्णवेळ प्रचारक म्हणून कार्यास प्रारंभ करणारे मूळचे दुर्गानंद वासुदेव नाडकर्णी उर्फ स्वामी दुर्गानंद गिरी महाराज यांचे लातुरातील विवेकानंद रुग्णालयात सोमवार दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रात्री १२ वाजून २१ मिनिटांनी वयाच्या ८९ व्या वर्षी निधन झाले. वयाच्या अवघ्या सहाव्या वर्षी ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी जोडले गेले. संघाशी असलेली आपली नाळ त्यांनी आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत कायम जोपासली.

स्वामी दुर्गानंद गिरी महाराजांचा जन्म १९३६ साली कारवार जिल्ह्यातील अंकोला येथे झाला होता. सन १९४२ मध्ये त्यांचा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संपर्क आला.उच्च शिक्षणासाठी ते मुंबईत आले आणि सन १९६० मध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रचारक म्हणून त्यांनी पूर्णवेळ कार्यास प्रारंभ केला. त्यांनी रा.स्व. सं.चे रत्नागिरी विभाग प्रचारक, मुंबई महानगर प्रचारक तसेच कोल्हापूर विभाग प्रचारक म्हणून विविध महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या. तसेच सुमारे नऊ वर्षे 'हिंदू एकजूट' या कार्यात त्यांनी सक्रिय योगदान दिले.राम जन्मभूमी आंदोलनात स्वामी दुर्गानंद गिरी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. तसेच तामिळनाडूतील मीनाक्षीपुरम येथे घडलेल्या सामूहिक धर्मांतराच्या घटनेविरोधातील आंदोलनातही त्यांनी ठाम भूमिका घेत सक्रिय सहभाग घेतला. दरम्यानच्या काळात त्यांनी ऋषिकेश येथे संन्यास दीक्षा स्वीकारून 'पूज्य दुर्गानंद गिरी महाराज' हे नाव धारण केले. सन १९९९ पासून ते लातूर येथे वास्तव्य करीत होते. ते अत्यंत कष्टाळू व साधे जीवन जगले. तहसील स्तरापासून ते प्रांत स्तरापर्यंत त्यांनी अनेक जबाबदाऱ्या सांभाळल्या. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य स्वयंसेवक व कार्यकर्त्यांच्या जडण घडणीत, संगोपनात त्यांनी मोलाची भूमिका बजावली. गोव्याचे दिवंगत मुख्यमंत्री पर्रीकर, श्रीपादजी नाईक, चंद्रकांतदादा पाटील, विनोद तावडे यांसारखे असंख्य कार्यकर्ते त्यांच्या तालमीत घडले. त्यांच्या सहवास व संपर्कामुळे अनेक कुटुंबांवर त्यांचा संस्कार झाला असून आजही त्यांची आठवण आदराने केली जाते. स्वामी दुर्गानंद गिरी यांच्या पार्थिवावर सोमवारी सायंकाळी सात वाजता औसा तालुक्यातील वानवडा रस्त्यावरील प्रा. उमाकांत होनरावांच्या शेतात मान्यवरांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# मोहोळच्या दोन प्रभागात सरासरी ६६.९९ टक्के मतदान

**तभा वृत्तसेवा,**
**मोहोळ, दि.२० डिसेंबर-**

मोहोळ नगरपालिकेच्या राहिलेल्या दोन प्रभागातील एकेक जागेसाठी आज दि.२० डिसेंबर रोजी सरासरी ६६.९९ टक्के मतदान झाले. मोहोळ नगर पालिकेत एकूण १० प्रभागात २० नगरसेवक आहेत. थेट जनतेतून नगराध्यक्ष यापैकी ३ डिसेंबर रोजी १८ नगरसेवकांसाठी मतदान पार पडले होते.

तथापि न्यायालयाच्या आदेशाने प्रभाग क्र. ३ आणि ५ मध्ये एक एक जागेची निवडणूक पुढे गेली होती. त्यासाठी शनिवारी मतदान झाले. यामध्ये प्रभाग क्र ३ मध्ये मोहोळचे माजी नगराध्यक्ष आणि शिवसेना (शिंदे) चे राज्याचे ओबीसी विभाग प्रमुख रमेश बारसकर आणि शिवसेना (उबाठा) चे माजी जिल्हा प्रमुख दीपक गायकवाड यांचे चिरंजीव शिवरत्न आणि भाजपाचे अझरुद्दीन शेख यांच्यात चुरशीची लढत झाली.

यामध्ये सरासरी ७०.५१% मतदान झाले, तर प्रभाग क्र. ५ मध्ये भाजपचे विक्रम फडतरे, शिवसेना (शिंदे) चे चंद्रकांत वाघमोडे आणि शिवसेना (उबाठा) चे गणेश क्षीरसागर यांच्यात लढत झाली. यामध्ये ६३.२% मतदान झाले.

काही किरकोळ प्रकार वगळता मतदान शांततेत पार पडले. यासाठी पोलिस निरीक्षक हेमंत शेडगे आणि सहकारी पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. उद्या रविवारी सर्व प्रभागांची आणि नगराध्यक्षा पदाची मतमोजणी होणार असून सर्वपक्षीय इच्छुकानी विजयासाठी देव पाण्यात ठेवले आहेत.

# सांगोला नगरपरिषदेच्या निवडणूकीची ११ टेबलद्वारे ४ फेऱ्यांमध्ये मतमोजणी

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला, दि.२० डिसेंबर-**

सांगोला नगरपरिषदेच्या सर्व ११ प्रभागाची मतमोजणी रविवार, दि.२१ डिसेंबर रोजी ११ टेबलद्वारे एकूण ४ फेऱ्यांमध्ये पूर्ण करण्यात येणार आहे. मतमोजणी कक्षात मतमोजणी पाहणीसाठी एकावेळेस एकतर उमेदवार अथवा मतमोजणी प्रतिनिधी उपस्थित राहू शकतात, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी सैपन नदाफ यांनी दिली.

थेट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार यांचे ११ मतमोजणी प्रतिनिधी असलेने, एकावेळेस सर्व मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणी कक्षात उपस्थित राहू शकतात. नगराध्यक्ष पदाचे उमेदवार यांना मतमोजणी कक्षात उपस्थित रहावयाचे झाल्यास एक मतमोजणी प्रतिनिधी मतमोजणी कक्षाबाहेर आले नंतरच उमेदवारास मतमोजणी कक्षात प्रवेश दिला जाईल, असे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ.सुधीर गवळी यांनी दिली.

# ना हरकत प्रमाणपत्रासाठी नॉर्थकोर्ट प्रशाला येथे एक खिडकी उपलब्ध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी नामनिर्देशन अर्ज दाखल करताना उमेदवारांना महानगरपालिकेतील विविध ना-हरकत प्रमाणपत्रे सादर करणे अनिवार्य राहणार आहे. यासाठी दि.२१ डिसेंबर २०२५ पासून ना हरकत प्रमाणपत्रासाठी नॉर्थकोट प्रशाला येथे एक खिडकी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. दुपारी २ ते सायंकाळी ६ यावेळेत ना हरकत दाखले वितरित करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.



निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या नावावर असलेल्या मालमत्तेसंदर्भात मालमत्ता कराची ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. उमेदवाराच्या नावावर गाळा (दुकान) असल्यास त्याबाबत स्वतंत्र ना-हरकत प्रमाणपत्र द्यावे लागेल. तसेच उमेदवाराच्या मालकीची खुली जागा असल्यास, त्या मिळकतीबाबतही संबंधित विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. उमेदवार व्यवसाय करीत असल्यास, संबंधित व्यवसाय परवाना (लायसन्स) वैध असल्याबाबतची कागदपत्रे जोडावी लागतील.

उमेदवार महानगरपालिकेमध्ये मक्तेदार (ठेकेदार) आहे किंवा नाही, याबाबतचा सविस्तर तपशील देणे आवश्यक असून, त्यासंबंधीची माहिती लेखी स्वरूपात सादर करावी लागणार आहे. या सर्व बाबींविषयी उमेदवारांनी स्वयंघोषणापत्र सुद्धा अनिवार्यपणे सादर करावे लागेल. स्वयंघोषणापत्रामध्ये दिलेली माहिती सत्य व अचूक असल्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहणार आहे. सर्व इच्छुक उमेदवारांनी नामनिर्देशन अर्ज दाखल करण्यापूर्वी सर्व कागदपत्रांची पूर्तता करून ठेवावी. सर्व इच्छुक उमेदवारांनी शक्य होईल तितके लवकर आपले अर्ज एक खिडकी येथे सादर करण्यात यावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.



# एसव्हीसीएस प्रशालेत पालखी सोहळा उत्साहात

**तभा वृतसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

परमपूज्य तपोरत्न योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्याराधनानिमित्त एस.व्ही.सी.एस.हायस्कूल एमआयडीसी येथे पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. काशीपीठाचे जगद्गुरु डॉ.मल्लिकार्जुन विश्वाराध्य शिवाचार्य महास्वामीजी यांच्या हस्ते पालखीची पूजा करण्यात आली.

यावेळी चिटगुपाचे गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वडांगळीचे पंडिताराध्य महास्वामी, बृहन्मठाध्यक्ष चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांची प्रमुख उपस्थिती होती. या मिरवणुकीत मुलींचा लेझीम पथक, मुलांचे ध्वज पथक, नमो शंकरा नृत्य पथक, विद्यार्थिनी डोक्यावर कलश घेऊन,शंकर-पार्वती व पूज्य महास्वामीजींचा वेशभूषा परिधान करून मिरवणुकीत सहभागी झाले होते. ही मिरवणूक राजीव नगर, किसान नगर या मार्गावरून निघाली. मिरवणूक मार्गात भक्तांनी घरासमोर रांगोळी काढून मिरवणुकीचे स्वागत केले. वेदमूर्ती परमेश्वर शास्त्री हिरेमठ यांनी पौरोहित्य केले. या मिरवणुकीत मुख्याध्यापक संगप्पा म्हमाणे, उपमुख्याध्यापक धनंजय नकाते, पर्यवेक्षक संतोषकुमार तारके, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी सहभागी होते.

# मंगळवेढा नगरपरिषदेसाठी ६९.७७ टक्के मतदान

## ● किरकोळ प्रकार वगळता मतदान शांततेत; लाडक्या बहिणींची आघाडी

**तभा वृत्तसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० डिसेंबर-**

मंगळवेढा नगरपरिषदेसाठी अत्यंत चुरशीच्या झालेल्या मतदानामध्ये सरासरी ६९.७७ टक्के इतके मतदान झाले असून सर्वाधिक मतदान महिलांचे १४ हजार ३८५ म्हणजेच पुरुषापेक्षा १३४ महिला मतदारांनी अधिक मतदान केल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान कुठेही अनुचीत प्रकार न घडता शांततेत मतदान प्रतिक्रीया पार पडली.

मंगळवेढा नगर परिषदेच्या पंचवार्षिक निवडणूकीसाठी शनिवारी दि.२० रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० अत्यंत चुरशीने मतदान झाले. सकाळी थंडीचे प्रमाण अधिक असल्यामुळे यावेळी मतदान केंद्रावर तुरळक गर्दी होती. सुर्याचा पारा जसजसा वाढत गेला त्या प्रमाणे मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी लांबलचक रांगा लागल्याचे चित्र होते. शहरामध्ये सर्वाधिक मतदानाची टक्केवारी प्रभाग क्रमांक ६ मध्ये ७९.६७ टक्के इतके नोंदविले गेले आहे. तर प्रभाग क्रमांक ५ मध्ये सर्वाधिक कमी म्हणजे ६२.८४ टक्के मतदान झाल्याचे नोंदविले गेले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक असल्यामुळे मतदाना करण्यामध्ये अधिक चुरस दिसून येत होती. शहरामध्ये २८ हजार ६३८ एकूण मतदार असून निवडणूकीसाठी १९ हजार ९८१ इतक्या मतदारांनी आपला मतदानाचा पवित्र हक्क बजावला आहे. मतदान केंद्रावर मतदानाचा पवित्र हक्क बजावण्यासाठी अपंग,वृध्द आदी मतदारांनीही हजेरी लावली होती. दरम्यान एका मतदान केंद्रावर अपंगांना बसून जाण्यासाठीची व्हीलचेअर तुटल्यामुळे अपंग मतदारांना त्याचा त्रास सहन करावा लागला.



मतदान शांततेत होणेकामी डी.वाय.एस.पी. डॉ.बसवराज शिवपुजे,पोलीस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे,गोपनीय विभागाचे पोलीस हवालदार दिगंबर गेजगे आदी सर्वजण मतदान केंद्रावर बारकाईने लक्ष ठेवून होते. मतदारांना मोठ्या प्रमाणात लक्ष्मीदर्शन निवडणूकीत दिल्याचा थेट आरोप माजी पालकमंत्र्यांनी प्रसार माध्यमाजवळ केल्याने मंगळवेढा तालुकयात चर्चेला उधाण आले आहे. इंग्लिश स्कूल प्रशालेत आदर्श मतदान केंद्र उभे करण्यात आले होते. ते फुग्याने सुशोभित केल्याने सर्व मतदारांचे लक्ष खेचून घेत असल्याचे चित्र होते.

# वानकर बंधू शिवसेना उबाठा पक्षातच

## पक्षाचा नव्हे तर पदाचा राजीनामा दिला होता

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शिवसेना उबाठाचे शहरप्रमुख प्रा.डॉ.अजय दासरी यांनी पक्षातील ज्येष्ठ व प्रमुख शिवसैनिकांना विश्वासात न घेता एकला चलोची भूमिका घेत असल्याच्या निषेधार्थ आम्ही पक्षाचा नव्हे पदाचा राजीनामा दिला होता. आम्ही शिवसेना उबाठा पक्षातच राहणार आहोत, असे वानकर बंधुंनी शनिवारी पत्रपरिषदेत सांगितले.

प्रा.डॉ.अजय दासरी यांच्या त्या भूमिकेला आम्ही सहमत नव्हतो. निवडणूका शिवसेना पक्षाला ताकतीने लढवायची असेल तर ज्येष्ठ मंडळींना सोबत घेऊन लढवली पाहिजे अशी भूमिका वरिष्ठांकडे कळवली होती. परंतु कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने पदाचा राजीनामा दिला. आता आमच्या मागण्या मान्य झाल्याने आम्ही पदावर कार्यरत राहू, असेही त्यांनी सांगितले. आमच्या पदाचा राजीनामा आम्ही पक्षप्रमुख उध्दव ठाकरे आणि संपर्कप्रमुख अनिल कोकीळ यांच्याकडे दिला होता. परंतु तो त्यांनी नामंजूर केला. आमचे म्हणणे पक्षाने ऐकले. त्यामुळे आमचे मतभेद संपलेले आहेत. महापालिका निवडणूक समितीमध्ये पुरुषोत्तम बरडे, गणेश वानकर, संतोष पाटील, अस्मिता गायकवाड, प्रिया बसवंती या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा समावेश करण्यात आला आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले.

# पंढरपुरात प्रभाग क्रमांक ७ (ब) साठी ६०.८१ टक्के झाले मतदान

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर,दि.२० डिसेंबर -**

पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक ७ (ब) साठी शनिवारी मतदान प्रक्रिया पार पडली. मतदान ६०.८१ टक्के इतके झाल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. दरम्यान या प्रभागातून निवडणूक लढविलेल्या सर्व उमेदवारांच्या भवितव्याचा फैसला रविवारी मतमोजणी नंतर समोर येणार आहे.

२ डिसेंबर २०२५ रोजी पंढरपूरच्या नगराध्यक्षपदासह अठरा प्रभागातील ३४ नगरसेवकपदासाठीचे मतदान प्रक्रिया पार पडलेली होती. प्रभाग क्रमांक ५ (अ) मधून भाजपाच्या कुसुम जगन्नाथ परचंडे ह्या बिनविरोध निवडून आल्या. प्रभाग ७ (ब) मधील एका उमेदवारावरील घेण्यात आलेल्या आक्षेपा नंतर त्यांनी न्यायालयात धाव घेतली होती. त्यामुळे न्यायालयाने मतदानाच्या आदल्या दिवशी अर्थात १ डिसेंबर रोजी या प्रभागातील मतदान प्रक्रिया स्थगित केली होती. निवडणूक आयोगाच्या सुधारित कार्यक्रमा नुसार शनिवारी (दि.२० डिसेंबर) रोजी या एका प्रभागातील उमेदवारांसाठी मतदान प्रक्रिया राबविण्यात आली. शहरातील प्रभाग क्रमांक ७ (ब) मधून सुर्यकांत शंकर कदम, वासुदेव उर्फ भागवत त्रिंबक बडवे, साईनाथ शंकर बडवे, ज्ञानेश धनंजय बागडे, प्रज्योत अशोक भोसले हे उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात होते. रिंगणातील सर्वच उमेदवारांकडून विजयाचा दावा केला जात असला तरी खरी लढत ही सुर्यकांत शंकर कदम विरुध्द भाजपाचे वासुदेव उर्फ भागवत त्रिंबक बडवे यांच्यात झाल्याचे सांगण्यात येते सकाळी ७.३० ते ९.३० पर्यंत १२० पुरुष आणि ७३ स्त्री मतदार असे एकूण १९३ जणांनी आपला मतदाना हक्क बजाविला होता. या काळात केवळ २.९८ टक्के इतका मतदानाचा टक्का नोंदविला गेला. मात्र दुपारनंतर मतदान केंद्रावर मतदारांची गर्दी दिसून आली. दुपारी ५.३० पर्यंत एकूण २०२३ पुरुष आणि १९०९ स्त्री मतदारांनी आपला मतदाना हक्क बजाविला.



# योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजींच्या पादुकांची मिरवणूक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

श्री बृहन्मठ होटगी मठाचे परमपूज्य गुरुवर्य तपोरत्नं योगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी यांच्या आठव्या पुण्यस्मरणानिमित्त नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा व कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने श्रीगुरुंच्या पादुकांची मिरवणूक काढण्यात आली.

संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार यांच्या निवासस्थानी 'श्री'च्या पादुकांची महापूजा काशीपीठाचे जगद्गुरु मल्लिकार्जून विश्वाराध्य शिवाचार्य यांच्या सानिध्यात पार पडली. यावेळी बृहन्मठ होटगी मठाचे मठाधिपती श्री बालपस्वी चन्नयोगीराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजी, चिट्टगुपाचे श्री गुरुलिंग शिवाचार्य महास्वामीजी, वडांगळीचे श्री पंडिताराध्य शिवाचार्य महास्वामीजी उपस्थित होते. विठ्ठल कुंभार व रूपा कुंभार या दांपत्याच्या हस्ते श्री गुरुंच्या पादुकांची विधिवत महापूजा पार पडली. ओंकार भाईकट्टी (शंकर), श्रद्धा आहेरवाडी (पार्वती), विशाल सुलगुडले (गणपती), हर्षिता उसाकोयल (रिद्धी), वैष्णवी पलवंचा (सिद्धी), आदित्य बिराजदार (सिद्धेश्वर महाराज), राज दोडमणी (महात्मा बसवेश्वर), स्वराज्य जाधव (मन्मथ स्वामी), समृद्धी पगड्याकुल (अक्क महादेवी) श्रेया काटमोरे (हेमरेड्डी मल्लम्मा), प्रांजल बनसोडे (झाशीची राणी), ओंकार डोंगराजे (महादेव) ऋषिकेश वन्नम (महास्वामीजी) ओंकार सानप (विठ्ठल) नैनाक्षा मेरगु (रुक्मिणी) आदी बालकलाकारांनी विविध संत, महात्मा व देवदेवतांच्या वेशभूषेत आकर्षक दिसत होते. सिद्धाराम खजूरगी, राहुल गंदुरे, पवन देसाई, उडचान, मामड्याल यांनी विद्यार्थ्यांना पाणी वाटप केले. या मिरवणुकीत संस्थाध्यक्ष अण्णाराव कुंभार, ललिता कुंभार, गुरुशांत धुतरगावकर, राजशेखर फताटे, सिद्धेश्वर नरोळे, सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, रेवणसिद्ध रोडगीकर, राजशेखर स्वामी, महांतेश कौलगी, षडाक्षरी स्वामी, सिद्धलिंग मठमारी, ज्ञानेश्वर म्हेत्रे, धर्मराज बळ्ळारी, लक्ष्मीकांत त्रिशुले, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक शिवानंद मेणसंगी, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, विजयालक्ष्मी कुंभार, पर्यवेक्षक गौरीशंकर आळंगे, जयश्री बिराजदार, अशोक पाटील, सुरेश बिराजदार, अंगद तोरणे, चंद्रशेखर पाटील, विनायक कोरे, शिवानंद पुजारी, सिद्धाराम कुंभार, संतोष प्रचंडे, हनुमंत कुरे, वैशाली गुजर, प्रशांत बत्तुल, जगदेवी निंबर्गी, राजश्री कोळी, शितल पाटील आदी सहभागी झाले होते.



**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी**. ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे**.● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर
# दिनांक

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## विकास सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी चंडक; उपाध्यक्षपदी आसावा

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

विकास सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी राजगोपाल चंडक तर उपाध्यक्षपदी राजेंद्र आसावा यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहाय्यक निबंधक तथा अध्यासी अधिकारी उमेश पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड करण्यात आली.

अध्यक्षपदासाठी राजगोपाल चंडक यांचे नाव राजगोपाल मिणियार यांनी सूचविले. त्यास हरिनिवास जाजू यांनी अनुमोदन दिले.




उपाध्यक्षपदासाठी राजेंद्र आसावा यांचे नाव राजकुमार राठी यांनी सूचविले. त्यास कमलकिशोर राठी यांनी अनुमोदन दिले. या निवडीनंतर नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी राजगोपाल मिणियार यांनी मावळते अध्यक्ष कमलकिशोर राठी यांच्या कार्याचा गौरव केला. याप्रसंगी संचालकद्वय हरिनिवास जाजू, ओमप्रकाश तिवाडी, नवनीत तोष्णीवाल, मनीष बलदवा, नंदकिशोर मुंदडा, चंद्रशेखर स्वामी, सुरेश बिटला, अनुराधा चांडक, शंकर धोडमनी, बँकेचे व्यवस्थापक पांडुरंग मंत्री आदी उपस्थित होते.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

# बोलायचं नसतं करून दाखवायचं असतं; पालकमंत्र्यांचा इशारा, 'समजनेवालोंको कॉफी है'

- विकासाच्या मुद्द्यावर माजी नगरसेवकांचा भाजप पक्षप्रवेश
- सोलापूर शहरात ऑपरेशन लोटस ठरतेय यशस्वी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

राजकारणामध्ये काही गोष्टी बोलायच्या नसतात तर त्या करुन दाखवायच्या असतात. त्यामुळे प्रसारमाध्यमांनी आमच्याकडून जास्त काही वदवून घेऊ नये. अशी मिष्किल टिप्पणी राज्याचे ग्रामीण विकास मंत्री तथा पालकमंत्री जयकुमार गोरे शनिवारी सोलापुरातील पत्रकारांशी बोलताना केली. त्यावेळी उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला. दरम्यान, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केलेली ही टिप्पणी विरोधी पक्षांबरोबरच पक्षातंर्गत विरोधी गटासाठी तर नाही ना? असा सवाल राजकीय वर्तुळात विचारला जात आहे.

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट, शिवसेना उबाठा यांसह विविध पक्षातील आजी-माजी नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते भाजपात प्रवेश केला. यावेळी प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींशी ते बोलत होते. यावेळी आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.देवेंद्र कोठे, माजी आमदार दिलीप माने, भाजपाच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, महिला आघाडीच्या शहराध्यक्षा रंजीता चाकोते, माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, शहाजी पवार आदी उपस्थित होते.



पालकमंत्री गोरे पुढे म्हणाले की, राज्याचा सर्वत्र विकास होत असताना, आपल्या शहराचा गावाचा विकास होण्यासाठी भाजप आवश्यक आहे. त्यामुळेच अनेक नेतेमंडळी भाजपसोबत जोडले जात आहेत. या नव्या नेतेमंडळींचा भाजप पक्षामध्ये मान सन्मान राखला जाईल. त्यांच्या अपेक्षा पूर्ण होतील. भाजपचे नेतृत्व राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकास विकास कामांपासून प्रभावित होऊन त्यांनी आपल्या प्रभागाचा शहराचा विकास होण्यासाठी भाजप सोबत येण्याचे पसंत केले आहे.

एकेकाळी सोलापूर शहरातून राज्याचे राजकारण काँग्रेस पक्ष करायचा. परंतु आता पक्ष तसेच पक्षावरील विश्वास संपत चालला आहे. आपल्या प्रभागाचा विकास करणे शक्य होणार नाही. निधीची पूर्तता होणार नाही. केवळ भाजपच आपल्या प्रभागाचा आणि शहराचा विकास करू शकतो ही बाब त्यांच्या लक्षात आली, असेही त्यांनी सांगितले. दरम्यान, गेल्या काही दिवसांपासून सुरु असलेल्या प्रवेशांमुळे सोलापूर शहरात ऑपरेशन लोटस यशस्वी ठरत असल्याचे दिसून येत आहे.

**काँग्रेसचे कमबॅक, नरोटेंना आवाहन**

काँग्रेसचे कट्टर समर्थक राहिलेले माजी नगरसेवक विनोद भोसले याप्रसंगी बोलताना म्हणाले, देशात आणि राज्यात भाजप पक्षाची सत्ता आहे. त्यामुळे प्रभागाचा विकास होणे महत्त्वाचे आहे. सध्याच्या काळामध्ये काँग्रेस कमबॅक करेल असे वाटत नाही. केवळ विकासाच्या उद्देशाने भाजपसोबत जाण्याचा विचार केला आहे. यापूर्वी ज्या पक्षात आम्ही घडलो. त्या पक्षाबद्दल आणि पक्षश्रेष्ठी बद्दल मी ऋणी आहे. आमचे सहकारी नगरसेवक नरोटे यांना देखील माझा सल्ला असणार आहे. विकासासाठी भाजपसोबत येण्याचे आवाहन यानिमित्ताने करत आहे.

**पाणीपुरवठा हा शहराचा आत्मा**

माजी महापौर प्रवीण डोंगरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले, पाणीपुरवठा शहराचा आत्मा आहे. शहराचा विकास आणि पाणीपुरवठ्याचे कामकाज पूर्ण होण्यासाठी निधी तसेच सत्ता असणे आवश्यक आहे. केवळ विकासाच्या मुद्द्यावर भाजप पक्षांमध्ये प्रवेश करत आहे. पालकमंत्री जयकुमार गोरे यांचा पायगुण चांगला आहे. त्यांच्यामुळे आम्हाला आणखीन एक विकासाच्या वाटेवर जाता येणे शक्य होणार आहे.

**भाजपा हा विकासाच्या मुद्द्यावर चालणारा पक्ष**

भाजपाच्या शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर म्हणाल्या, भाजप हा विकासाच्या मुद्द्यावर चालणारा पक्ष आहे. अनेक नेते मंडळी आमच्या सोबत आमच्या कुटुंबात सामील होत आहेत. माजी उपमहापौर प्रवीण डोंगरे, माजी नगरसेवक विनोद भोसले आणि रविकांत कांबळे, ओम राजगे यांचे भाजपात स्वागत आहे. पक्षांमध्ये त्यांना मानसन्मान मिळेल. पालकमंत्री तसेच शहराच्या आमदारांसोबत एकत्रित येऊन शहराचा विकास साधू.



# राष्ट्रवादीचे प्रवीण डोंगरे, काँग्रेसचे विनोद भोसले, शिवसेनेचे रविकांत कांबळे 'भाजपा'त दाखल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्वच ठिकाणी भारतीय जनता पार्टीत प्रवेश करणाऱ्यांची संख्या दिवसागणिक वाढत आहे.

'राष्ट्रवादी'चे माजी उपमहापौर, काँग्रेसचे माजी नगरसेवक, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख यांनी पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदारद्वय देवेंद्र कोठे, सचिन कल्याणशेट्टी, 'भाजपा'च्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर यांच्या उपस्थितीत 'भाजपा'त प्रवेश केला. भारतीय जनता पार्टीत डेरेदाखल झालेल्यांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी उपमहापौर प्रवीण डोंगरे, माजी नगरसेवक विनोद भोसले, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख रविकांत कांबळे आणि माजी नगरसेवक दीपक राजगे यांचे पुत्र ओंकार राजगे यांचा समावेश आहे. दरम्यान, गेल्या दोन पिढ्यांपासून काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहिलेले भोसले परिवारातील विनोद भोसले यांनी काँग्रेसला हात दाखविण्यामागचे नेमकं कारण काय? असा सवाल विचारला जात आहे. विधानसभाच्यावेळी माजी नगरसेविका वैष्णवी करगुळे, काही दिवसांपूर्वी श्रीदेवी फुलारे तर शनिवारी विनोद भोसले यांनी 'भाजपा'त जाणे पसंत केले. 'भाजपा'च्या दृष्टीने प्रभाग क्रमांक १५ काहीसा अवघड मानला जायचा. परंतु या प्रभागातील तीन नगरसेवक 'भाजपा'त आल्याने भारतीय जनता पार्टीला विजयाचा मार्ग सुकर झाल्याचे बोलले जात आहे.

## स्वतःच्या वडिलांच्या निष्ठेचा तरी विचार करायला हवा होता

✔ विनोद भोसलेंच्या प्रवेशावर चेतन नरोटे यांची टीका

**सोलापूर :** देशाचे नेते, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, खासदार प्रणिती शिंदे यांच्या अत्यंत जवळचा विश्वासू व्यक्ती म्हणून परिचित असणारे माजी नगरसेवक विनोद भोसले यांनी पक्षाला सोडचिठ्ठी देत, भाजप पक्ष प्रवेश केला. या प्रवेश सोहळ्याप्रसंगी विनोद भोसले यांनी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे यांनी भाजपात यावे, असे आवाहन दिले.



त्यांच्या या आवाहनाला प्रत्युत्तर देताना चेतन नरोटे म्हणाले, काँग्रेस पक्षाने भोसले परिवारला सर्व काही दिले. भाजपात प्रवेश करताना त्यांनी स्वतःचे वडील कै.धर्मा भोसले यांच्या निष्ठेचा तरी विचार करायला हवा होता. गेल्या ४० वर्षांपासून कै.धर्मा भोसले यांनी एकनिष्ठेने काँग्रेसचे काम केले. स्वतः विनोद भोसले यांनी देखील नगरसेवक पद भोगले. कालपर्यंत आमच्यासोबत असणारा सहकारी आज भाजपमध्ये प्रवेश करत असल्याने दुःख होत आहे. माझ्या रक्तात काँग्रेस आहे. कालपर्यंत तुमच्यासोबत आमचे पॅनल होते. आता तुमच्याशिवाय तुमच्या विरोधात काँग्रेसचे पॅनल तयार होईल. कोणाच्या जाण्याने किंवा येण्याने पक्ष संपत नसतो. माझ्यासह मनोज यलगुलवार आणि अन्य पदाधिकारी, कार्यकर्ते निवडणुकीच्या कामाला लागले आहेत.

**▶▶ महत्वाचे...**

### शास्त्रीय गायन स्पर्धेत सार्थक बावीकर याचे यश

**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

येथील उदयोन्मुख युवा गायक व सध्या पुणे येथील विश्वकर्मा इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकीमध्ये शिक्षण घेत असलेला सार्थक बावीकर याने आशिया खंडातील सर्वात मोठया असलेल्या युवक महोत्सवात शास्त्रीय गायन स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळवला. संपूर्ण भारतातून आलेल्या स्पर्धकांतून अंतिम फेरीसाठी १४ स्पर्धक निवडण्यात आले होते. सार्थक हा व्हीआयटी कॉलेज, पुणे यांच्या आरोह क्लबचा कलाकार आहे.



### सांगोला महाविद्यालयात योगा मेडिटेशन

**सांगोला, दि. २० डिसेंबर-**

अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार विद्यार्थी आत्महत्या रोखणे व अँटी रॅगिंग नियम २००९ च्या अंमलबजावणीसाठी सांगोला महाविद्यालयात योगा मेडिटेशनचे आयोजन करण्यात आले होते. बेंगलोर येथील आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक अविनाश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले, डॉ.राजकुमार ताठे यांच्या मार्गदर्शनाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रा.सदाशिव शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रा.अमोल कावळे यांनी आभार मानले.



### उद्यापासून विज्ञान प्रयोग कार्यशाळा

**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

सी.बी.खेडगीकनिष्ठ महाविद्यालय विभागाच्या वतीने तालुक्यातील सर्व माध्यमिक शाळेतील दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी सोमवार, २२ ते शनिवार, २७ डिसेंबर या कालावधीत विज्ञान प्रयोग कार्यशाळा आयोजित करण्यात आल्याची माहिती प्राचार्य डॉ. गुरुलिंगप्पा धबाले, संयोजिका तथा उपप्राचार्या वैदेही वैद्य यांनी दिली. सोलापूर सायन्स सेंटरचे माजी संचालक डॉ.व्यंकटेश गंभीर यांच्या हस्ते, संस्थेचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांच्या अध्यक्षतेखाली आणि संस्थेचे सेक्रेटरी सुभाष धरणे, संचालिका तथा माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी, सेवानिवृत्त प्राचार्य डॉ.किसन झिपरे यांच्या प्रमुख उपस्थितीत या कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात येणार आहे, असे पर्यवेक्षक पर्यवेक्षक प्रा.नीलप्पा भरमशेट्टी, प्रा.श्रीकांत जिड्डीमनी यांनी सांगितले.

# पंढरपूर शहराच्या कारभाऱ्यांचा आज फैसला

**तभा वृत्तसेवा**
**पंढरपूर, दि.२० डिसेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या सदस्यपदांकरिता २ डिसेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडली होती. कायदेशीरबाबींमुळे प्रभाग क्रमांक ७ (ब) साठी शनिवारी मतदान पार पडले. नगराध्यक्षासह १८ प्रभागातील ३५ कारभाऱ्यांचा अर्थात नगरसेवकांच्या नशिबाचा फैसला रविवार, २१ डिसेंबर रोजी होणार आहे. दुपारी एक ते दीड यावेळेत मतमोजणी प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. या निवडणुकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी स्वतः लक्ष घातलेले होते. माजी आमदार प्रशांत परिचारक यांना पहिल्यांदाच भाजपाच्या चिन्हावर निवडणुकीला सामोरे जावे लागले. यापूर्वी परिचारक गटाकडून पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीतर्फे निवडणूक लढविली जात होती.

भाजपा, मित्रपक्ष आणि पंढरपूर मंगळवेढा विकास आघाडीच्या विरोधात विठ्ठल कारखान्याचे माजी अध्यक्ष भगिरथ भालके यांनी तीर्थक्षेत्र विकास आघाडी आणि विठ्ठल कारखान्याचे विद्यमान अध्यक्ष तथा माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी विठ्ठल परिवर्तन विकास आघाड्यांमार्फत निवडणूकीत आपले उमेदवार उतरविलेले होते. भाजपा, मित्रपक्ष आणि पंढरपूर मंगळवेढा शहर विकास आघाडी विरुध्द भालकेंच्या तीर्थक्षेत्र



विकास आघाडीच्या उमेदवारांमध्येच खरी लढत दिसून आली. दुसरीकडे सुरुवातीला नगरपरिषद निवडणूकीसाठी वातावरण निर्मिती करुन देखील माढ्याचे आमदार अभिजीत पाटील यांना मात्र विठ्ठल कारखान्याला फडणवीस सरकार कडून करण्यात आलेल्या मदतीच्या ओझ्यामुळे निवडणूकीचा ज्वर शिगेला पोहचलेला असताना ऐनवेळी फारसा रस घेता आला नाही. दरम्यान, कमळाच्या चिन्हावर परिचारक गटाकडून उभ्या असलेल्या प्रभाग पाच (अ) मधील उमेदवार कुसुम जगन्नाथ परचंडे या बिनविरोध निवडून आल्या.

**नगराध्यक्षपदासाठी अतितटीची लढत**

यंदा नगराध्यक्षपद हे सर्वसाधारण महिलेसाठी राखीव होते. भाजपातर्फे शामल लक्ष्मण शिरसट (पापरकर), भगिरथ भालके यांच्या तीर्थक्षेत्र विकास आघाडीकडून त्यांच्या पत्नी डॉ.प्रणिता भालके ह्या रिंगणात उतरल्या होत्या. नगराध्यक्षपदाची ही निवडणूक अटीतटीची झाली. दोन्ही गटाकडून नगराध्यक्षपदी आपल्या उमेदवाराची वर्णी लागणार असल्याचा छातीठोकपणे दावा केलेला आहे.

एका गटाची प्रतिष्ठा पणाला तर दुसऱ्यासाठी राजकीय अस्तित्वाची अंतिम परीक्षा :एकीकडे पंढरपूर पालिकेची ही निवडणूक पालकमंत्री जयकुमार गोरे, विद्यमान आमदार समाधान आवताडे आणि माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या प्रतिष्ठेचा फैसला करणारी असली तरी दुसरीकडे भगिरथ भालके यांच्या पंढरपूरच्या राजकारणातील अस्तित्वाची ही अंतिम परीक्षा ठरणारी अशी असणार आहे.

**अशी होणार मतमोजणी प्रक्रिया**

रविवारी सकाळी १० वाजता मतमोजणीला सुरुवात होणार आहे. १८ प्रभागांच्या मतमोजणीसाठी १२ टेबलवर ठेवण्यात येणार आहेत. मतमोजणीच्या ०९ फेऱ्या होणार आहेत. प्रत्येक टेबलवर एक पर्यवेक्षक व एक सहाय्यक मतमोजणी अधिकारी असे दोन व त्यांच्या मदतीला एक शिपाई याप्रमाणे एकूण तीन कर्मचारी असणार आहेत. ५३ अधिकारी, कर्मचारी आणि अधिकचे अधिकचे २० कर्मचारी कार्यरत राहणार आहेत. प्रत्येक फेरीतील मोजणी अंदाजे ३० मिनिटात संपणार आहे.



## वंचित बहुजन आघाडीकडे ११६ जणांनी केली उमेदवारीची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीकडे आजपर्यंत ११६ जणांनी उमेदवारीची मागणी केली. सोलापूर महानगरपालिकासह जिल्हा परिषदेची निवडणूक वंचित बहुजन आघाडी पूर्ण ताकदीने लढणार आहे. त्यादृष्टीने रणनीती आखण्यात येत आहे, असे सांगण्यात आले. महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या मुलाखती राज्य उपाध्यक्ष तथा सोलापूर जिल्हा निरीक्षक सोमनाथ साळुंखे, राष्ट्रीय कार्यकारणी सदस्य डॉ.नितीन ढेपे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडल्या. यावेळी शहराध्यक्ष प्रशांत गोणेवार, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे, जिल्हा महासचिव अनिरुध्द वाघमारे, युवक शहराध्यक्ष महेश जाधव, शहर महासचिव विनोद इंगळे, वंचितचे नेते रवि गायकवाड उपस्थित होते.

# सोलापूर नगरपालिकेला सन १९३० मध्ये लाभले ३ नगराध्यक्ष

- सन १९३७ मध्ये झाले होते सोलापूर शहराचे आर्थिक व सामाजिक सर्वेक्षण


जे.एस.जसावाला


शेठ माणिकचंद शहा


रा.ब.डॉ.बि.वा.मुळे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

स्वातंत्र्यलढ्याच्या अनुषंगाने सोलापूर शहरात १९३० हे क्रांतीकारी घटनांचे ऐतिहासिक अजरामर वर्ष मानले जाते. स्वतंत्र लढ्याचा जाज्वल्य वारसा आणि इतिहास असलेल्या सोलापूर नगरपालिकेला सन १९३० या वर्षभरात तीन नगराध्यक्ष लाभले होते. सोलापूर नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या सन १८५२ पासून ते आजपर्यंतच्या १७३ वर्षाच्या इतिहासात ही एकमेव घटना मानली जाते. स्वातंत्र्यलढ्यात सोलापूरचे योगदान महत्त्वपूर्ण असे आहे.

१९३० हे हे वर्ष स्वतंत्र लढ्यातील सोलापूरच्या इतिहासातील क्रांती पर्व ठरले. याच वर्षात सोलापूर नगरपालिकेवर राष्ट्रीय झेंडा फडकवण्यात यावा, या






ठरावानुसार दि.६ एप्रिल १९३० रोजी देशभक्त अण्णासाहेब भोपटकर यांच्या हस्ते सध्याच्या नवी पेठ येथील नगरपालिकेच्या इमारतीवर राष्ट्रीय निशाण फडकवण्यात आले. पारतंत्र्यातही दि.९ ते १२ मे १९३० दरम्यान सोलापूरकरांनी स्वातंत्र्य अनुभवले. आक्रमक क्रांतिकारी लढा उभारल्याने ब्रिटिशांनी सोलापुरात मार्शल लॉ पुकारला.१२ मे १९३० रोजी मार्शल लॉच्या काळात नगरपालिकेवर उभारण्यात आलेले राष्ट्रीय निशाण उतरावे, असे फर्मान ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सोडले. मात्र त्याला न जुमानता सभासदांनी सर्वांनुमते केलेली कृती त्यांच्या संमतीशिवाय मी मागे घेऊ शकत नाही, असे बाणेदार उत्तर देऊन निशाण उतरवण्यास तत्कालीन नगराध्यक्ष माणिकचंद शहा यांनी स्पष्ट नकार दिला. यामुळे त्यांना अटक करुन विजापूरच्या तुरुंगात ठेवण्यात आले. माणिकचंद शहा यांना तिरंग्याचे अभिमानी नगराध्यक्ष म्हणून संबोधले जाते. याच ऐतिहासिक सन १९३० या वर्षामध्ये सोलापूर नगरपालिकेला एकूण तीन नगराध्यक्ष लाभले. ही ऐतिहासिक घटना मानली जाते.

सोलापूर नगरपालिकेमध्ये दि. २१ एप्रिल १९३० पर्यंत राव बहादूर व्ही.व्ही. मुळे हे नगराध्यक्षपदी होते. दि. २२ एप्रिल १९३० रोजी शेठ माणिकचंद शहा नगराध्यक्ष झाले. त्यानंतर १३ मे १९३० नंतर मार्शल लॉ मध्ये शहा यांना शिक्षा झाल्याने ते अपात्र ठरले होते. दि. २६ जून १९३० ते ३१ मार्च १९३१ पर्यंत जे. एस. जसावाला हे नगराध्यक्ष झाले होते. असे तीन अध्यक्ष एका वर्षांत झाले. नगरपालिकेच्या इतिहासात एका वर्षांत ३ अध्यक्ष निवडले गेल्याची ही पहिली घटना होती.

सन १९३७ मध्ये केली सोलापूर शहराची आर्थिक व सामाजिक पाहणी : सोलापूर नगरपालिकेने सन १९३७ मध्ये पुण्याच्या गोखले इन्स्टिटट्यूट ऑफ पॉलिटिक्स अँड एकॉनॉमिक्स या संस्थेस सोलापूर शहराची आर्थिक व सामाजिक पाहणी करण्याची विनंती केली होती. पाहणीचे काम जून १९३८ मध्ये संस्थेच्या कार्यकर्त्यांकडून सुरू होऊन डिसेंबर १९३९ पर्यंत चालू होते. पुणे शहरानंतर महाराष्ट्रात अशी पाहणी करून घेणारी सोलापूर नगरपालिका ही दुसरी होती. या पाहणीच्या माहितीचा अंशतः उपयोग करून, सोलापुरातील विणकर समाजासंबंधी व हातमाग व्यवसाय संबंधी तसेच इतर विवेचन करणारे एक पुस्तक गोखले इन्स्टिटयूटचे डॉ. रघुनाथ गोविंद काकडे यांनी लिहून, १९४६ मध्ये प्रसिद्ध केले. उर्वरीत माहितीवर आधारलेला ग्रंथ लिहून तयार केला. आजच्या घडीलाही पालिकेच्या वतीने अशी पाहणी करण्याची गरज आहे.

**▶ महत्त्वाच्या घटना घडामोडी...**

- दि. २२ जुलै १८८१ पासून सोलापूर शहराला हिप्परगा तलावातून पाणीपुरवठा सुरू
- १९१४ मध्ये नगरपालिकेसाठी गुप्त मतदान पद्धतीने निवडणूक घेण्यास प्रारंभ
- १ एप्रिल १९२५ रोजी स्कूल बोर्ड अस्तित्वात आले
- १९४७ मध्ये 'नगर सेवा हीच ईश सेवा' हे घोषवाक्य नगरपालिकेत सर्वांनुमते मंजूर

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## ज्ञानामृत आनंदलहरी १३०३

**धिग जिणे नाहीं विवेक वैराग्य ।**
**झुरे मानालागीं साधुपणा ।।**

आपणाला इतरांनी मान द्यावा असे प्रत्येकाला वाटत असते. जसे मान घ्यावा वाटते, तसे कोणीही आपला अवमान करु नये असेही प्रत्येकाला वाटते. मान हा कर्तव्यातून मिळत असतो किंवा कर्तव्याने मान वाढत असतो, हे खरे असले तरीही अनेक लोक कर्तव्याकडे डोळे झाक करुन लोकांना मान मागत असतात. लोकांनी आपणाला मान द्यावा म्हणून कर्तव्य वगळता इतर कांहीही करतात. आपली खोटारडी किंवा दिखाऊ वृत्ती आपल्या अवमानाला कारणीभूत होईल याचा विचार न करता लोक मानासाठी नको तेवढी सोंगं करीत असतात. भारतीय संस्कृतीत पूर्वीपासूनच साधु-संतांना लोक मान देत आले आहेत.



आजही ही परिस्थिती कांही वेगळी नाही. अर्थात, साधूसंतांना आजही समाजात चांगल्या प्रकारे मान-सन्मान मिळतो. म्हणूनच की, काय साधु-संतांच्या वर्तनाचा लवलेशही अंगी नसतांना कांही लोक केवळ पेहराव धारण करुन व वर्तनशून्य वृत्तीने वागून मान मिळविण्याचा प्रयत्न करतात. अंगी संताप्रमाणे वैराग्य व विवेक नसतांनाही साधु-संत असल्याचे भासवून मान मिळविण्या-साठी धडपडणाऱ्या ढोंगी लोकांचे तोंडसुध्दा पाहण्याची वेळ आपल्यावर येऊ नये. या अनुषंगाने बोलतांना तुकाराम महाराज म्हणतात, धिग जिणे नाहीं विवेक वैराग्य । झुरे मानालागीं साधुपणा ।।

समाजात असे अनेक लाक आहेत की, जे स्वत:ला मोठेपण मिळावे, स्वत:चा मान सन्मान व्हावा म्हणून वाटटेल ते करीत असतात. राजकीय, आर्थिक, सामाजिक क्षेत्र तर सोडाच पण अध्यात्मासारख्या अत्यंत पवित्र क्षेत्रातही अशा लोकांचा शिरकाव कांही कमी नाही. कीर्तन प्रवचनासाठी भरपूर पैसा घेणारे, स्वत:चा दर ठरविणारे, स्वत:चा मान वाढवून घेणारे मोठया संख्येने समाजात पहायला मिळत आहेत. या लोकांकडे विवेक किंवा वैराग्य नांवाचा प्रकार अजिबात नसतो. केवळ स्वार्थ साधण्यासाठी किंवा व्यवहार करण्यासाठी यांनी साधुंचा पेहराव धारण केलेला असतो. अशा ढोंगी लोकांमुळे चांगल्या संत-महात्म्यांकडे पाहण्याची लोकांची दृष्टी बदलत चालली आहे. ज्ञानोबा-तुकारामांनी काय सांगितले याचे ज्ञान या ढोंगी लोकांना नसते. आपल्यासारखा दुसरा कोणी नाही, असे भासविणाऱ्याच्या प्रयत्नात हे लोक मुळीच कमी पडत नाहीत. केवळ स्वार्थासाठी, व्यवहारासाठी लोकांची फसवणूक करणारे हे लोक खऱ्या अर्थाने स्वत:ची फसवणूक करीत असतात. प्रसंगानुरुप एखाद्याला धडाही मिळू शकतो. पण धडा न मिळणारे लोक आपले स्वार्थी कार्य चालूच ठेवतात. अशा लोकांच्या नादाला लागल्यामुळे अनेक लोक कर्तव्यापासून, सत्यापासून दूर चालले आहेत. या ढोंगी लोकांनाच सर्वस्व मानून यांच्या नावाचा जप किंवा यांची पूजा करण्यात लोक आनंद मानत आहेत. पण ज्यांना ज्ञानोबा-तुकाराम खऱ्या अर्थाने समजले असतील ते लोक असा ढोंगी साधुपणाही करीत नाहीत आणि अशा ढोंगी साधुच्या मागेही जात नाहीत. आपण ज्ञानोबा-तुकारामांचे भक्त असल्याने व त्यांच्या मार्गदर्शनात वावरत असल्याने आपल्याकडून ढोंगीपणा होण्याचा किंवा ढोंगी लोकांच्या दिखाव्याला बळी पडण्याचा प्रश्नच उद्भवणार नाही, असे आम्हास वाटते. असो, तरीही आपण या बद्दल खात्री करायला हवी. सकारात्मक व विचारपुर्वक बाळगलेली दृष्टी आनंददायी असते. जय जय राम कृष्ण हरी ।

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

वार : रविवार
दि. २१ डिसेंबर २०२५
विक्रम संवत् २०८२
शके - १९४७
संवत्सर - विश्वावसु
मास - पौष शु. प्रतिपदा
ऋतु - हेमंत
नक्षत्र- पूर्वाषाढा (२७.३५)
योग - वृद्धि (१६.३५)
करण - बालव (२२.०३)
....राहू काल....
रविवार : दु.४.३० ते ६.००

दिनविशेष -१९५९: फलंदाज, क्रिकेट कप्तान व निवड समितीचे अध्यक्ष कृष्णम्माचारी श्रीकांत जन्म.
१९५९: अमेरिकेची धावपटू फ्लॉरेन्स ग्रिफिथ जॉयनर यांचा जन्म.
१९६३: हिंदी चित्रपट अभिनेते गोविंदा यांचा जन्म.
१९७२: भारतीय पत्रकार आणि राजकारणी वाय. एस. जगनमोहन रेड्डी यांचा जन्म.



## शमा उर्दू शाळेत फुड फेस्टिव्हलचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

मजेरवाडी येथील शमा उर्दू स्कूल येथे फुड फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले होते. यात गुलाब जामुन, दही वडा, कस्टर्ड, भोपळ्याची खीर, पाणीपुरी, खिचडा, ताहरी, बटाटा समोसा, आपे , नुडल्स , सँडविच , वडापाव इत्यादींचे बावीस स्टॉल लावण्यात आले होते यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलहिंद उर्दू कॉन्फरन्सचे खजीनदार शफी कॅप्टन तर प्रमुख पाहुणे म्हणून सोशल महाविद्यालयाचे उर्दू विभागप्रमुख डॉ. म. शफी चोबदार, रोटरी क्लब ऑफ स्मार्ट सिटीचे डायरेक्टर म. इक्बाल बागबान, संस्थेचे अध्यक्ष अय्युब अहमद नल्लामंदू आदी उपस्थित होते.

प्रारंभी मुख्याध्यापक अबुबकर नल्लामंदू यांनी प्रास्ताविक करून शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. त्यानंतर सर्व मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. चोबदार म्हणाले की, आजच्या काळात चविष्ट पदार्थ खाणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे, त्यामुळे हा फुड फेस्टिव्हल विद्यार्थ्यांना एक नवीन आयाम देतो. अध्यक्षीय भाषणात शफी कॅप्टन यांनी केले. हे फुड फेस्टिव्हल मुख्याध्यापक अबुबकर नल्लमंदू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला तर याला यशस्वी करण्यासाठी शाहीन सदाफ, यास्मिन बिजापुरे, दिलशाद नलामंदू, जुबैदा सय्यद खान, मेराज अल्लोळी, आसिया नलामंदू, कौसर शेख, रेश्मा अरब यांनी परिश्रम घेतले. शाहीन सदाफ यांनी सूत्रसंचान केले तर आभार यास्मिन बिजापुरे यांनी मानले.

# हमीभावाने तुर खरेदीप्रश्नी अद्याप कोणताही आदेश नाही




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

केंद्र सरकारने कर्नाटकला हमीभावाने तूर खरेदी करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली आहे. मात्र, महाराष्ट्राला अद्याप ही परवानगी मिळाली नाही. त्यामुळे सोलापूरसह राज्यात हमीभावाने तूर खरेदी केंद्रे सुरू करण्याबाबत हालचाली सुरु होऊ शकल्या नाहीत. खरेदी केंद्र सुरु न झाल्याने सोयाबीन, उडीद, मूग यांसारखी पिके हमीभावापेक्षा कमी दरात विकावी लागत असल्याने शेतकऱ्यांतून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

केंद्रा सरकारने सन २०२५-२६ हंगामासाठी किमान आधारभूत किंमतीवर ९.६७ लाख टन तूर खरेदीसाठी मान्यता दिली आहे. देशात महाराष्ट्र व कर्नाटक ही प्रमुख तूर उत्पादक राज्य आहेत. या दोन्ही राज्यांमध्ये तूर पिकाचे भाव प्रतिक्विंटल ६,७००-६,८०० रुपये आहे. जे किमान आधारभूत किंमत ८,००० रुपयांपेक्षा कमी आहे.

सोलापूरसह राज्याच्या काही भागात तूर काढणी सुरू झाली असून नव्या पिकाची आवक सुरु झाली आहे. येत्या आठवडाभरात तूर काढणीला वेग येण्याची शक्यता आहे. यंदा अतिवृष्टीसह सततच्या पावसाने झालेल्या नुकसानीचा फटका तूर उत्पादनालाही बसला आहे. त्यामुळे त्यात घट होण्याची चिन्हे आहेत. त्यामुळे लवकरात लवकर हमीभाव केंद्र सुरु करण्यात यावे, अशी आग्रही मागणी होत आहे.

### तूर पिकाचे क्षेत्र (हेक्टरमध्ये)

सोलापूर जिल्ह्यातील सरासरी क्षेत्र ८६,५८३
सोलापूर जिल्ह्यातील पेरणी क्षेत्र ८५,४७६

### आवक कमी, आणखी अवकाश

'नाबार्ड'ने राज्यातील काही बाजार समित्यांमधील अडत्यांना भेटी दिल्या. कर्नाटकातून तूर पिकाची आवक असून स्थानिक माल नसल्याचे दिसून आले आहे. राज्यात स्थानिक माल येण्यास अद्याप अवकाश असल्याचे या पाहणीत दिसून आल्याचे सांगण्यात आले.

### सोलापुरात ९७८ क्विंटल आवक

सोलापूरच्या बाजार समितीत बुधवारी तुरीची ९७८ क्विंटल आवक होती. यात लाल ८१३, पांढऱ्या १६१ तर काळ्या व गज्जर तुरीच्या प्रत्येकी दोन क्विंटलचा समावेश होता. सर्वसाधारण दर ७,९०० ते ६,८७३ रुपये होते.

### कर्नाटकातील माल अधिक

बाजारपेठेत नवीन पिकाची नवीन आवक सुरु झाली आहे. यात कर्नाटकातील माल अधिक असला तरी स्थानिक माल येण्यास सुरवात झाली आहे, असे भुसार आडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळ्ळी यांनी सांगितले.

### खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत आदेश नाहीत

सोलापूरच्या बाजारात कर्नाटकातून तुरीची आवक जादा आहे. स्थानिक शेतमाल बाजारात येण्यास आणखीन अवकाश आहे. तूर हमीभाव खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत अद्याप कोणताही आदेश नाहीत, असे जिल्हा पणन अधिकारी मनोज वाजपेयी यांनी सांगितले.

## गौडगाव बु. होणार धार्मिक व ग्रामीण पर्यटनाचे नवे केंद्र



**पर्यटन विकास उपक्रमांतर्गत निवड**

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

सोलापूर जिल्ह्यातील श्री स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव (ता. अक्कलकोट) हे गाव धार्मिक आणि ग्रामीण परंपरेचा अनोखा संगम असलेले गाव म्हणून पुढे येत आहे. जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येत असलेल्या पर्यटन विकास उपक्रमात गौडगावचा समावेश धार्मिक व ग्रामीण पर्यटनाचे गाव म्हणून करण्यात आले आहे.

गौडगाव हे जागृत दक्षिणमुखी हनुमान मंदिरासाठी राज्यभर प्रसिद्ध आहे. समर्थ रामदास स्वामींच्या पदस्पर्शाने पावन झालेली ही भूमी भाविकांसाठी श्रद्धेचे केंद्र आहे. गौडगाव मारुती मंदिरात दर्शनासाठी दर शनिवारी मंगळवारी तसेच प्रत्येक पोर्णिमा आमावशा रोजी मोठ्या प्रमाणात भाविक येतात. चैत्र पौर्णिमा, हनुमान जयंती, रामनवमी तसेच श्रावण अमावास्येला महाराष्ट्रातूनच नाही तर तेलंगना आणि कर्नाटक या राज्यातून देखील येथे हजारो भाविक दर्शनासाठी येतात. याचबरोबर ग्रामदैवत महालक्ष्मी (सीमा लक्ष्मी) देवीची तीन वर्षांतून एकदा होणारी यात्रा ही गावाची वैशिष्ट्यपूर्ण परंपरा मानली जाते.

धार्मिक आणि आध्यात्मिक ओळखीसोबतच गौडगावची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीवर आधारित आहे. लिंबू बागायत शेती, ज्वारी-बाजरी उत्पादन, दुग्ध व्यवसाय, पारंपरिक शेती पद्धती आणि ग्रामीण खाद्यसंस्कृती हे गावाचे प्रमुख आधारस्तंभ आहेत. या सर्व घटकांच्या आधारे ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देणे, शेतकऱ्यांना पूरक उत्पन्न उपलब्ध करून देणे आणि स्थानिक उत्पादनांना बाजारपेठ मिळवून देणे हा पर्यटन विकासामागील मुख्य उद्देश आहे.

पर्यटन विकास उपक्रमामुळे आगामी काळात पर्यटकांसाठी धार्मिक पर्यटनदर्शन, अशोक वाटिका, शिवारफेरी, ग्रामीण खाद्य अनुभव, स्थानिक उत्पादनांची खरेदी, माहिती दालन तसेच लोककला व संस्कृतीचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्या संधी उपलब्ध होणार आहेत. यामुळे गौडगाव हे सोलापूर जिल्ह्यातील एक आदर्श धार्मिक व ग्रामीण पर्यटन गाव म्हणून विकसित होईल, असा विश्वास प्रशासनाने व गावकऱ्यांनी व्यक्त केला आहे.



## अरिहंत स्कूलचे स्नेहसंमेलन उत्साहात साजरे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

अरिहंत इंग्लिश मीडियम स्कूलचे हुतात्मा स्मृती मंदिर येथे स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले. प्रारंभी डॉ.सूर्यप्रकाश कोठे यांच्या हस्ते, शिक्षण विस्ताराधिकारी बापूराव जमादार, केंद्रप्रमुख चंद्रकांत वाघमारे, संस्थाध्यक्ष डॉ.अजय पोन्नम, संचालिका सुलक्षणा पोन्नम, उपमुख्याध्यापिका तस्नीम शेख, पर्यवेक्षिका स्नेहा कदम, ज्योती आडम, रुपाली निकते, चन्नेश इंडी यांच्या उपस्थितीत प्रतिमापूजन, दीपप्रज्वलन करण्यात आले. भरतनाट्यम् नृत्याविष्काराने कार्यक्रमास प्रारंभ करण्यात आला. शंभर टक्के उपस्थिती, बेस्ट स्टुडंट्स, बेस्ट हाऊस, बेस्ट टीचर अशी पारितोषिक देण्यात आली. विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य सादर केले. खाऊ वाटप व वंदेमातरमने संमेलनाची सांगता करण्यात आली. यावेळी प्रसिध्द शेफ डॉ.तुषार देशमुख, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, विनायक कोंड्याल, प्राचार्य डॉ.विश्वास स्वामी, युवराज सरवदे, दत्तात्रय कडगंची उपस्थित होते.

## उमेदवारी अर्ज भरण्यासाठी तीन पेक्षा अधिक वाहने आणण्यास प्रतिबंध

**निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कक्षात उमेदवार, सूचकासह पाचपेक्षा अधिक व्यक्तींना प्रवेश नाही**

**पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी काढले आदेश**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

महापालिका निवडणुकीसाठी मंगळवारपासून उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू होणार आहे. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नॉर्थकोट प्रशाला येथे कार्यालय असणार आहे. नॉर्थकोट प्रशालेच्या मुख्य प्रवेशद्वारापासून १०० मीटर परिघापर्यंत तीन पेक्षा अधिक मोटार गाड्या अथवा वाहने आणण्यास प्रतिबंध घालण्यात आल्याचा आदेश पोलिस आयुक्त एम. राजकुमार यांनी काढला आहे.

या आदेशात नामनिर्देशन भरणाऱ्या व्यक्तींसाठी आणि त्यांच्यासोबत येणाऱ्या व्यक्तींसाठी विविध प्रकारचे निर्बंध घातले आहेत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांचे नॉर्थकोट प्रशाला येथे कार्यालय आहे, त्यामुळे नॉर्थकोट प्रशाला येथील मुख्य प्रवेशद्वारापासून १०० मीटर परिसरात तीनपेक्षा अधिक मोटारगाड्या अथवा वाहने आणण्यास प्रतिबंध घालण्यात आला आहे.

पोलिसांनी ठरवून दिलेल्याच ठिकाणी गाड्या पार्क कराव्या लागतील. प्रत्येक उमेदवारास अर्ज भरण्यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या कक्षात एकावेळी उमेदवार, सूचकासह पाचपेक्षा अधिक व्यक्तींना प्रवेश दिला जाणार नाही.

निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या मुख्य प्रवेशद्वारापासून १०० मीटर परिसरात कोणताही प्रचार करणे, घोषणा देणे, वाद्य वाजवणे, तसेच गाणी वाजवणे, यावर निर्बंध घातले आहेत. हा आदेश २३ डिसेंबरपासून ३ जानेवारीपर्यंत लागू असेल, असे आदेशात म्हटले आहे.

## २६ डिसेंबरपासून चित्र, नृत्य, संगीत महोत्सव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २० डिसेंबर-**

म्युझिक आर्ट डान्स ॲकॅडमी आणि जामश्री रिल्टी लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने चित्र नृत्य संगीत महोत्सव २०२५ चे आयोजन दि. २६ ते २८ डिसेंबर या कालावधीत करण्यात आले आहे, अशी माहिती विकास गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा महोत्सव दमाणीनगरनजीकच्या शुभम बँकेट हॉल, जामश्री रिल्टी लिमिटेड, सोलापूर येथे पार पडणार आहे. महोत्सवाचे उद्‌घाटन २६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता चित्रकार सतीश पोतदार (नाळ चित्रपट दिग्दर्शक), रवी पवार (पुणे मनपा कमिशनर), राजेश दमाणी अविनाश महागांवकर, सुशील बंदपट्टे, डॉ. नरेंद्र शेलार, सुनील ठेंगील, संदीप कुलकर्णी, प्रथमेश आरसगड, देवीदास मेटकरी, राजय्या गजम, अविनाश गोसावी, अनिकेत सरवदे, सीना कासेगांवकर, रश्मी बोराडे, आकांक्षा शेलार-वाघ, अजय या मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये होणार आहे.

महोत्सवात चित्रप्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली आहे. याच दिवशी कलाकारांसाठी ओपन माईक, वाद्यसंगीत, कराओके यांसारख्या उपक्रमांद्वारे आपली कला सादर करण्याची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. चित्रकार डॉ. सीना कासेगावकर, डॉ. विद्या कारवेकर, डॉ. सीमा तोष्णीवाल, डॉ. वैष्णवी जंगम, अर्थना गिरी गोसावी, सोनाली यादव, ७) गिरीजा कोलूरकर, क्षितिज पुकाळे, अद्वैत धुळप, अनुप होटकर, सचिन शिंदे यांची पेन्सिल शेडिंग, पोट्रेट, कॅनव्हास पेंटिंग, लँडस्केप, मंडल आर्ट, लिपन आर्ट, ऑब्जेक्ट ड्रॉइंग, नेचर ड्रॉईंग अशा विविध कला प्रकारांचा समावेश या प्रदर्शनात असणार आहे. २७ डिसेंबर सायंकाळी ४ वाजता नृत्य स्पर्धा आयोजित करण्यात आली असून आहे. २८ डिसेंबर सकाळी ९ वाजता सर्व वयोगटासाठी चित्रकला स्पर्धा होणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क आसावरी गांधी (९९६०१०५०५१) विकास गोसावी (९८२२ ६६०१२१) भोमीशा शाह (८७७९०८५८८६) यांच्याशी संपर्क साधावा. या पत्रकार परिषदेला आसावरी गांधी, डॉ. अंशू शर्मा, भोमीशा शाह, बर्जिन मास्टर आदी उपस्थित होते.

### तीनही दिवस विशेष आकर्षणे

महोत्सवाच्या तीनही दिवसांमध्ये कोल्हापूरचे प्रसिद्ध चित्रकार अभिजीत कांबळे व शिल्पकार संदीप काटवारे यांचे शिल्पकाम प्रात्यक्षिक असणार आहे. संध्याकाळी ६ वाजल्यापासून मास्करेड पार्टी होणार असून मुले, महिला व युवकांसाठी हा एक आनंददायी व मनोरंजक अनुभव असणार आहे. तीनही दिवस आकर्षण स्वादिष्ट खाद्यपदार्थांचे स्टॉल खेळ, साईव्ह रक्टर पर संथ बॉटल आर्ट, स्टोन पटिंग, टोट बॅग आर्ट, कॅरिकेचर, टॅटू यांसारखे क्रिएटिव्ह ॲक्टिव्हिटी स्टॉल्स असणार आहेत.

## समाजासाठी झटणारी खाकितील रणरागिणी




ग्रामीण भागातून आलेल्या अनेक महिला आज आपल्या कर्तृत्वाने समाजासमोर आदर्श उभा करत आहेत. संघर्ष, जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या अशाच एक खाकीतील रणरागिणी म्हणजे कविता लाड. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांना महाराष्ट्र गौरव रत्न २०२५ या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. हा सन्मान केवळ एका व्यक्तीचा नसून ग्रामीण महिलांच्या संघर्षाचा आणि यशाचा गौरव आहे.



अहिल्यानगर, महाराष्ट्र कठोर परिश्रम, निष्वा आणि समाजसेवेच्या मजबूत इच्छाशक्तीचा उत्तुंग परिचय देणाच्या कविता लाड, महिला पोलीस शिपाई यांना प्रतिष्ठित महाराष्ट्र गौरव रत्न २०२५ या राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांची नेमणूक सध्या पचई पोलीस ठाणे, मुंबई येथे आहे.

ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या कविता लाड यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण वागदरी श्री एस. एस. शेळके प्रशाला, वागदरी (आजोबा-आजीकडे शिक्षण), अक्कलकोट (सोलापूर) येथे झाले. १२ वी (सायन्स) फेब्रुवारी २००६ आर्ट, कॉमर्स अँड सायन्स ज्युनिअर कॉलेज, मुरूम येथे झाले. आर्थिक अडचणींवर मात करत त्यांनी २००५ साली सायन रुग्णालय, मुंबई नर्सिंग क्षेत्रात प्रवेश घेतला. बी.ए. पदवी एप्रिल २०१३ श्री माधवराव पाटील कॉलेज, मुरूम येथे झाले.

ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या मर्यादित पार्श्वभूमीतून आलेल्या या अधिकारी महिलेने कठीण परिस्थितींवर मात करत स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे लहानपणापासूनचा संघर्ष, शिक्षणातील अडचणी, आणि कुटुबांची जबाबदारी सांभाळत त्यांनी मुंबई पोलीस दलात भरती २००८ प्रवेश केला आणि आज कामाच्या प्रत्येक क्षेत्रात त्यानी आपली शौर्यगाथा सिद्ध केली आहे.

कविता लाड यांची नेमणूक सध्या पवई पोलीस ठाणे येथे असून त्यांनी विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्ह्यांची नींद, ताक्रार निवारण, विविध घटकातील नागरिकांशी जनसंपर्क अशी अनेक महत्त्वाची कामे प्रामाणिकपणे पार पाडली आहेत. साकीनाका पोलीस ठाण्यात काम करताना त्यांनी हरवलेल्या लहान मुले मुली तसेच मोठ्या व्यक्तीचा शोध लावून त्यांना त्यांच्या कुटुंबीयांच्या ताब्यात सुखरूप परत देण्याचे कौतुकास्पद कार्य केले.

मुंबई पोलीस दलात ८ तासांच्या ड्यूटी आराखड्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात राबविण्यासाठी त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. सर्व प्रकारचे बंदोबस्त, बीआयपी व्हीव्हीआयपी ड्युटी तसेच चौकशी व मदतकार्य यात त्यांचा सहभाग नेहमीच उल्लेखनीय राहिला आहे. मागील १७ वर्षांत त्यांनी विविध पोलीस ठाण्यांमध्ये गुन्ह्यांची नोंद, तक्रार निवारण, नागरिकांसोबत जनसंपर्क, विविध सामाजिक घटकांशी संवाद व समन्वय, सर्व प्रकारचे बंदोबस्त, व्हीआयपी सुरक्षा व्यवस्थापन यामध्ये अत्यंत कर्तव्यनिष्ठेने काम केले आहे. मुंबई पोलिसांच्या आधुनिक कामकाजातील एक महत्त्वपूर्ण बदल ८ तास ड्यूटी आराखड्याचे नियोजन व प्रत्यक्ष अंमलबजावणी यामध्ये त्यांचा सक्रिय आणि उल्लेखनीय सहभाग राहिला आसून, या उपक्रमामुळे मोठ्या प्रमाणात पोलीस दलाला दिलासा मिळाला आहे.

समाजाभिमुख काम, कर्तव्यकठोरता आणि सेवा भावना याबद्दल घेतलेल्या दखलीतूनच त्यांना महाराष्ट्र गौरव रत्न २०२५ या पुरस्काराने गौरविण्यात आले. हा सन्मान त्यांच्या कार्याची केवळ नोंद नसून, राज्यातील तरुणींना संघर्षातून यशाकडे वाटचाल करण्याची प्रेरणा देणारी जिवंत कहाणी आहे. या पुरस्कारामुळे केवळ त्यांच्या कार्याची दखल घेतली गेली नाही तर ग्रामीण भागातील व आर्थिक अडचणींचा सामना करणाऱ्या अनेक तरुणींना प्रेरणा मिळाली आहे. संघर्षातून उजळलेला त्यांचा प्रवास हे सिद्ध करतो की दृढ निश्चय असेल तर कोणताही मार्ग कठीण नाही. पुरुषप्रधान मानसिकतेत स्वतःची जागा निर्माण करत त्यांनी ग्रामीण महिलांसाठी नेतृत्वाचा नवा मार्ग दाखवला. कविता लाड यांचा प्रवास आजच्या तरुण पिढीसाठी, विशेषतः ग्रामीण भागातील मुलींसाठी प्रेरणादायी आहे. परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, चिकाटी आणि सकारात्मक दृष्टिकोन असेल तर यश निश्चित मिळते, हे त्यांनी आपल्या जीवनातून सिद्ध केले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### 'फॅबटेक'चे मेडशिंगीत स्वच्छता हिच सेवा अभियान

**सांगोला, दि. २० डिसेंबर-**

सांगोल्यातील फॅबटेक टेक्निकल कॅम्पस कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्चच्या राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत मेडशिंगी (ता. सांगोला) येथे स्वच्छता हिच सेवा अभियानाचे उद्घाटन संस्थेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब रूपनर, मेडशिंगीचे सरपंच उमा इंगवले, माजी तंटामुक्त अध्यक्ष प्रभाकर कसबे, कृषी अधिकारी स्वप्नजीत पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाऊसाहेब रूपनर यांनी मनोगत व्यक्त केले. तसेच स्वप्नजीत पाटील यांनी कृषी विभागाकडून देण्यात येणाऱ्या सुविधांची माहिती दिली. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, सार्वजनिक स्वच्छता यांचे महत्व ग्रामस्थांना पटवून दिले. यावेळी स्वच्छता रॅली काढण्यात आली. हे अभियान यशस्वी करण्यासाठी कॉलेजचे स्टुडंट डिन डॉ.संजय पवार, प्रा. नीलिमा बनाळे, प्रा.भारती गायकवाड, प्रा.माणिक मोरे, प्रा.संजय जगताप, प्रा.राहूल पाटोळे यांनी परिश्रम घेतले.

### पत्नी नांदायला येत नाही; पतीची आत्महत्या

**पिलीव, दि. २० डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील भुषण मोहन दडस (वय ४२) याने पत्नी नांदावयास येत नाही. वारंवार आणायला जाऊनही पत्नी येतच नसल्याने नैराश्येपोटी आपल्या राहत्या घरात गळफास घेऊन १७ डिसेंबर रोजी आत्महत्या केली. याबाबत मोहनचे भाऊ भावेस दडस यांनी घटनेची माहीती पिलीव पोलीस ठाण्यात दिली. यानंतर पिलीव पोलीस ठाण्याचे हवालदार पंडित मिसाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी घटनास्थळी जाऊन रितसर पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी माळशिरस येथे पाठविण्यात आला. शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. सदरचा घटनेचा अधिक तपास माळशिरस तालुक्याचे पोलीस निरीक्षक विकास दिंडोरे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार पंडित मिसाळ करीत आहेत. मयत मोहन याच्या पश्चात पत्नी, आई वडील, एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. केवळ पत्नी नांदावयास येत नाही वारंवार तडजोड करुनही पत्नी नांदावयास न आल्यामुळे मोहन याने टोकाचा निर्णय घेत आपले जीवन संपविले यामुळे एक मुलगा व मुलगी मात्र आपल्या वडिलांपासून पोरकी झाली. आता आई या दोन्ही मुलांचा सांभाळ करणार का अशी चर्चा सध्या सुळेवाडी परिसरात सुरू आहे.

### अक्कलकोट नपा सार्वत्रिक निवडणूक मतमोजणीसाठी यंत्रणा सज्ज

**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

अक्कलकोट नगरपरिषद निवडणूक मतमोजणी प्रियदर्शनी मंगल कार्यालय येथे २१ डिसेंबरला सकाळी १० वाजल्यापासून सुरु होणार आहे अशी माहिती मुख्याधिकारी तथा प्रशासक अक्कलकोट नगरपरिषद यांनी दिली. मतमोजणीसाठी १२ टेबल तयार करण्यात आले आहेत. प्रत्येक टेबलवर एका प्रभागाची मतमोजणी होणार आहे, साधारण पणे काही प्रभागाच्या ३ ते ६ फेऱ्या होणार आहेत, मतमोजणी साठी १२ पथके नियुक्त करण्यात आली आहेत,मतमोजणी साठी पत्रकारांची स्वतंत्र बैठक व्यवस्था करण्यात आली आहे, १२५ पोलीस स्टाफ नियुक्त आहेत. मतमोजणी साठी फक्त उमेदवाराद्वारे नियुक्त मतमोजणी प्रतिनिधीनाच प्रवेश देण्यात येणार आहे, सर्व निकाल स्पीकर द्वारे बाहेर ऐकायला येतील अशी व्यवस्था केलेली आहे. प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे.

### कुसमोड ग्रामस्थांनी घरपट्टी व पाणीपट्टी सवलतीचा फायदा घ्यावा; सरपंच लेंगरे यांचे आवाहन

**पिलीव, दि.२० डिसेंबर-**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत पाणीपट्टी, घरपट्टी, दिवाबत्ती या करांच्या सन २०२५-२६ या चालू वर्षाच्या पूर्ण रकमेसह सन २०२५ पूर्वीच्या एकुण थकबाकीच्या ५० टक्के रक्कम ३१ डिसेंबरपर्यंत भरल्यास यावर ५० टक्के सवलत मिळणार आहे. कुसमोड ग्रामस्थांनी या योजनेचा लाभ घेऊन ३१ डिसेंबरपूर्वी आपल्याकडील थकबाकी ग्रामपंचायतीकडे भरुन या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन सरपंच शहाजी लेंगरे यांनी केले आहे. या योजनेत सहभागी होण्यास फक्त फक्त दहा दिवसाचा कालावधी राहीला आहे. त्यामुळे जास्तीत जास्त थकबाकीदारांनी यांचा फायदा घ्यावा असेही त्यांनी सांगितले. यावेळी ग्रामसेवक आतार, उपसरपंच रेखा पालखे, माजी सरपंच तुषार लवटे, माजी सरपंच महावीर धायगुडे, माजी उपसरपंच स्वाती मदने, राणी पवार, माजी उपसरपंच संजय पाटील, लक्ष्मण पवार, सुभाष जाधव, उमाजी बोडरे, देवानंद चव्हाण, विशाल बोडरे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# भावी कारभाऱ्यांकडून आश्वासनपूर्तीची सांगोलकरांना अपेक्षा

**तभा वृत्तसेवा। दिपक भाकरे**
**सांगोला, दि.२० डिसेंबर-**

सांगोला नगरपरिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी व एकूण २१ सदस्य जागांसाठी दि.२ डिसेंबर रोजी ७७.७० टक्के मतदान झाले. मतमोजणी उद्या रविवार दि.२१ डिसेंबर रोजी होणार आहे. उद्या निवडून येणाऱ्या नगराध्यक्ष व नगरसेवकांकडून सांगोलकरांच्या अपेक्षा ह्या खूप मोठ्या असणार आहेत कारण सदर निवडणूक ही पाच वर्षांची मुदत संपल्यानंतर चार वर्षांनी पार पडली आहे.

सांगोला नगरपरिषदेच्या निवडणुकीत उद्याच्या निकालात निवडून येणाऱ्या उमेदवारांनी प्रचाराच्या काळात नागरिकांना अनेक प्रकारची आश्वासने दिली आहेत.



त्यामध्ये सांगोला शहराची स्वच्छता, पाणीपुरवठा, धुळमुक्त सांगोला अशा अनेक मूलभूत गरजांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यामुळे नक्कीच उद्या निवडून येणाऱ्या नगराध्यक्ष व नगरसेवकांकडून सांगोलकरांच्या अपेक्षा मोठ्या प्रमाणात आहेत.



सध्या सांगोल्यामध्ये मोकाट जनावरांचे प्रमाण खूप वाढलेले आहे. तरी नगरपालिकेने त्या मोकाट जनावराची कुठेतरी सोय करावी. तसेच दर रविवारी आठवडा बाजारामधील जर्सी गाईचे पिल्ले आठवड्या बाजारात सोडून जातात व पुन्हा त्यांना मोकाट कुत्रे लचके तोडतात जो कोणी आठवड्या बाजारात जनावर सोडत असेल त्यावर योग्य ती कारवाई व्हावी. तसेच शहरात सापाचे प्रमाण वाढण्याचे कारण म्हणजे कचऱ्याचे ढीग कारण त्यामध्ये खरकटे असते ते खाण्यासाठी साप तेथे येतात म्हणून उघड्यावर कचरा टाकणाऱ्या वर कारवाई व्हावी अशी अपेक्षा येणाऱ्या नगराध्यक्ष व नगरसेवकांकडून करतो

**संदेश पलसे,** सर्पमित्र व प्राणी मित्र.



निवडून येणाऱ्या नगराध्यक्ष व नगरसेवक यांनी जनतेच्या आडीअडचणी समजून घ्याव्यात व त्या दूर कराव्यात. सर्वसाम ान्यांना वेळ द्यावा व तळागाळापर्यंत पोहोचावे. सर्वसामान्यांची कामे ही मोठी नसतात. अगदी किरकोळ कामे असतात. ते जाणून घेऊन वेळेत पूर्ण केली तर लोक सुखी समाधानी राहतील.

**संदीप चौगुले,** व्यापारी



उद्या सांगोला नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे निकाल येतील. त्यानंतर नवनियुक्त नगराध्यक्ष व नगरसेवक आपला कार्यभार स्वीकारतील. याकडून मी एक सामान्य नागरिक या नात्याने अपेक्षा करतो की, सर्व नगरसेवक व नगराध्यक्ष शहराच्या मूलभूत गरजांसाठी लक्ष देतील. शहरामध्ये प्रामुख्याने वाढलेली अतिक्रमणे याकडे लक्ष घालावे. तसेच सुरळीत पाणीपुरवठा करावा. शहराच्या स्वच्छतेच्या दृष्टीने योग्य ती पावलं उचलावीत. तसेच शासनाने दिव्यांगासाठी राबवलेल्या योजना व नगरपालिकेकडील पाच टक्के निधी व्यवस्थित वितरित करून दिव्यांना सामाजिक प्रवाहात घेतील अशी आशा करतो.

**सतिश गायकवाड,** सामाजिक कार्यकर्ते...

# अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी नगराध्यक्षपदी कोण?

## भाजपा विरोधात शिंदे सेना; मित्र पक्षांतील लढतीमुळे राज्याचे लक्ष

**तभा वृत्तसेवा । नंदकुमार जगदाळे**
**अक्कलकोट, दि. २० डिसेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील नगरपालिका निवडणुकीत महायुतीतील भाजपा विरोधात शिंदे शिवसेना असा सामना रंगला होता. भाजपाचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वात तर शिंदे शिवसेनेचे नेते माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वात निवडणुक झाली. त्यामुळे भाजपा मित्र पक्ष यांच्यातच झालेल्या निवडणुकीत कुणाची सरशी होणार याकडे जिल्ह्यासह राज्याचे लक्ष लागले आहे.

अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी नगरपालिकेसाठी २ डिसेंबरला मतदान झाले. गेल्या १७ दिवसां पासून लोकांची प्रतिक्षा शिगेला पोहचली आहे. २१ डिसेंबर कधी उजाडेल याचीच प्रतिक्षा नगराध्यक्षपदाचे उमेदवार व नगरसेवकपदाचे उमेदवारांसह लोकांना लागून राहिली आहे. अनेक



प्रकारच्या चर्चेना उत आला आहे. नगराध्यक्ष व नगरसेवकपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याचे उत्तर अवघ्या काही तासात मिळणार आहे. अक्कलकोट नगराध्यक्ष पदासाठी भाजपा, कॉंग्रेस, शिंदे सेना, ठाकरे सेना, राष्ट्रवादी शरद पवार यांच्या उमेदवारांत लढत झाली.

मैंदर्गीत स्थानिक गट विरोधात भाजपा व दुधनीमध्ये नगराध्यक्षासाठी ५ उमेदवार यांच्यात लढत झाली. अक्कलकोट नगरपालिकेच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी, कॉंग्रेसचे अशपाक बळोरगी, शिंदेसेनेकडून रईस टिनवाला, ठाकरे सेना बाबासाहेब जाधव, राष्ट्रवादी शरद पवारकडून इकरार शेख, अपक्ष नागनाथ उमदी या सहा जणांत लढत झाली. नगराध्यक्षपदाची माळ कुणाच्या गळ्यात पडणार याबाबत कार्यकर्ते समर्थकांत पैजा लागल्या आहेत. अक्कलकोट न.पा.च्या २५ सदस्यांकरिता ७६ उमेदवार भाग्य आजमावत आहेत. शिवसेनेचा धन्युषबाण अचुक लक्ष्य भेदणार का? भाजपाचे मिलन कल्याणशेट्टी फिक्स नगराध्यक्ष होणार का? दुधनीमध्ये भाजपा चा नगराध्यक्ष होणार की शिंदे शिवसेनेचा नगराध्यक्ष होणार? मैंदर्गी न.पा.मध्ये भाजपाचा नगराध्यक्ष होणार का? स्थानिक गटाचा नगराध्यक्ष होण्याची परंपरा कायम राहणार? याचा फैसला रविवारी २१ डिसेंबर ला होणार आहे. याची प्रतिक्षा आता शिगेला पोहचली आहे.

# अकलूज नगरपरिषदेची मतमोजणी आज; प्रशासन सज्ज

## दुपारपर्यंत निकाल स्पष्ट होणार

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि. २० डिसेंबर-**

नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी रविवारी, दि. २१ डिसेंबर रोजी अकलूज येथील विजयसिंह मोहिते-पाटील क्रीडा संकुल येथे होणार आहे. या पार्श्वभूमीवर संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली असून सकाळी लवकरच मतमोजणी प्रक्रियेला सुरुवात होणार आहे.




सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिलेल्या माहितीनुसार, साधारण तीन ते चार तासांत सर्व निकाल जाहीर होण्याची शक्यता आहे. मतमोजणी सुरळीत आणि वेळेत पार पडावी, यासाठी आवश्यक ती सर्व तयारी पूर्ण करण्यात आली आहे. या निवडणुकीत एकूण १३ प्रभाग असून एक नगराध्यक्ष पद व २६ नगरसेवक पदाच्या जागांसाठी मतदान झाले आहे. त्यानुसार मतमोजणीसाठी ७ टेबलांची रचना करण्यात आली आहे. प्रत्येक टेबलवर संबंधित प्रभागातील नगराध्यक्ष पदासाठी पडलेली मते तसेच नगरसेवक पदासाठीची मते मोजली जाणार आहेत. एकामासाठी ४६ कर्मचारी आहेत १३ फेऱ्या होणार असून सकाळी दहा वाजले पासून मतदानास सुरुवात होईल मतदानासाठी ३९ मशीनचा वापर करण्यात आला आहे. एकूण मतदान ३४ हजार ४०८ असून २३ हजार ८१७ मतदान झाले आहे.

दुपारी बारा वाजेपर्यंत बहुतांश निकाल स्पष्ट होतील, असा अंदाज आहे. मतमोजणी दरम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. मतमोजणी केंद्राच्या १०० मीटर परिसराच्या बाहेर सर्व रस्त्यांवर बॅरिकेटिंग करण्यात येणार आहे. या ठिकाणी ध्वनिक्षेपक यंत्रणेमार्फत निकाल ऐकण्याची सोय करण्यात आली असून त्यासाठी स्वतंत्र कर्मचारी नियुक्त करण्यात येणार आहेत.



# पिलीवच्या जि.प. शाळेस १० संगणक भेट

## माजी विद्यार्थी अमोल भैस यांच्या प्रयत्नास यश

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि.२० डिसेंबर-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव येथील जिल्ह्य परिषद केंद्र शाळा या शाळेस माजी विद्यार्थी अमोल मधुकर भैस यांच्या विशेष प्रयत्नातून पुणे येथील थर्ड जनरेशन कन्सल्टींग सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीकडून सि एस आर फंडातून दहा संगणक संच उपलब्ध करुन दिले .ते संगणक संच अमोल भैस यांच्या हस्ते २० डिसेंबर रोजी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल गांधी, सदस्य समशेरसिंग रजपूत, हनुमंत पिसे, राजू चौरे, सुहास कोल्हे, राजू गोरवे, हत्तीकर यांच्या उपस्थितीत शाळेस देण्यात आले.

याबद्दल शाळेच्या वतीने अमोल भैस यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी बोलताना अमोल भैस यांनी आपण या शाळेचे काही तरी देणे लागतो या आधुनिक काळात खरेतर विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाची गरज आहे हे ओळखून मी या कंपनीचे मॅनेजर संदीप जाधव यांच्या विशेष सहकार्याने मी हे संगणक संच शाळेस देऊ शकलो याचा मला मनस्वी आनंद आहे. शाळेमध्ये राजकीय जोडे बाजुला उदात्त हेतूने शाळेस मदत करावी असे आवाहनही यावेळी अमोल भैस यांनी पिलीव परीसरातील शिक्षणप्रमींना केले.

अमोल भैस याच्या ह्या सामाजिक उपक्रमाबद्दल पिलीव परिसरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन व कौतुक होत आहे.

# संघ संस्कारित स्वयंसेवकांकडून समाजाची अपेक्षापूर्ती

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - १३**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा शिस्तीबरोबरच संस्कारासाठी देखील ओळखला जातो. समाजामध्ये एखाद्या व्यक्तीचे वर्तन पाहून शेवटी हे संघाचे संस्कार! अशा प्रकारची प्रतिक्रिया व्यक्त केली जाते. मग संघाचे संस्कार म्हणजे नेमके काय? असाही प्रश्न अनेकदा पडतो. संघाच्या स्वयंसेवकाकडे आदर्श नागरिक - व्यक्ती म्हणूनच समाज पाहतो याची जाणीव स्वयंसेवकांना देखील असते. एखाद्या स्वयंसेवकाने वेळ पाळली नाही किंवा अकारण काही कृती केली तर हाच समाज संघाचे संस्कार विसरला काय? अशा प्रकारचा टोमणाही मारताना दिसतो. याचे कारण म्हणजे संघ स्वयंसेवक हा संस्कारीतच असला पाहिजे अशी समाजाची धारणा आहे.

संघाची शाखा हे सक्षम संस्कार केंद्र आहे. ही जन्मभूमी माझी माता आहे, हे राष्ट्र माझे दैवत आहे, हा समाज माझा आहे, या सर्वांसाठी मला काहीतरी केले पाहिजे या विचारांना धरूनच संस्कार करण्याची पद्धत विकसित केली गेली आहे. संघाच्या शाखेमध्ये निरनिराळे खेळ खेळले जातात. या खेळांमधून नकळतपणे आपण सारे एक आहोत हा संस्कार करण्याचा प्रयत्न केला जातो. केवळ शारीरिक सुदृढतेसाठी खेळाची रचना नाही हे मात्र निश्चित आहे. माझा समाज अडचणीत आला तर मी जिवाचीदेखील पर्वा न करता समाजाच्या मदतीला धावून गेले पाहिजे असा संस्कार ज्या खेळातून नकळतपणे घडून येतो असे मी शिवाजी, गावगुंड, भुताची गल्ली यासारखे अनेक खेळ संघ शाखेवर घेतले जातात. सगळा समाज माझाच आहे, आपण सारे हिंदू आहोत, कोणीही स्पृश्य - अस्पृश्य नाही असा समरसतेचा संस्कार करणारे अनेक खेळ संघ शाखेत घेतले जातात.

खेळांबरोबरच तेथे म्हटली जाणारी पद्ये म्हणजेच गीते, या गीतांमधून देखील हाच संस्कार रुजविला जातो. देश हा सर्वात आधी, नंतर समाज मग माझे कुटुंब ही भावना दृढ करण्यासाठी अनेक बौद्धिक कार्यक्रम शाखेमध्ये घेतले जातात.

या सर्वांबरोबरच शाखेमध्ये उपस्थित स्वयंसेवक एकमेकांबरोबर ज्या आत्मियतेने, जिव्हाळ्याने, प्रेमाने वागत असतात, यातून देखील समाज प्रेम निर्माण होते. शुद्ध सात्विक प्रेमाच्या ओढीने स्वयंसेवक नित्य संघ कामात रमतो व एक दिवस तो देखील हेच प्रेम नव्या स्वयंसेवकांना देताना दिसतो. यातूनच स्वयंसेवक घडत जातात व या स्वयंसेवकांना समाज व राष्ट्राच्या आपत्ती प्रसंगी धावून जाण्याची प्रेरणा मिळते. संघ कामांमध्ये घर-दार, आई-वडील, आवडी-निवडी या सर्वांचा त्याग करून पूर्णवेळ काम करणाऱ्या प्रचारकांकडून देखील एक वेगळी प्रेरणा व स्फूर्ती मिळते. अशा या संघ संस्कारीत स्वयंसेवकांकडून समाज अपेक्षा ठेवतो व या अपेक्षांची पूर्ती गेल्या शंभर वर्षांमध्ये संघस्वयंसेवकांकडून झालेली दिसून येते. यामध्ये संघ संस्कार ही महत्त्वाची गोष्ट आहे.

**संस्कारीत स्वयंसेवकांमुळे सज्जन शक्तीचा विकास**

एखाद्या व्यक्तीचे संस्कार हे त्याच्या वागण्या - बोलण्यातून व कृती - व्यवहारातून जाणवत असतात. संघ स्वयंसेवकाच्या एकूणच आचरणातून तो संस्कारीत आहे याची जाणीव होते. समाज व राष्ट्राच्या अहिताची कोणतीही गोष्ट करायची नाही हा संस्कार रुजल्यामुळेच स्वयंसेवक अनेक प्रसंगांमध्ये इतरांपेक्षा वेगळी भूमिका घेताना दिसून येतात. भौतिक सुखाच्या पाठीमागे लागून अनेकदा गैरव्यवहारांमध्ये अनेक लोक गुंतल्याचे दिसून येतात. या गैरव्यवहारातून असे लोक समाजाची व पर्यायाने आपल्या राष्ट्राची हानीच करत असतात. परंतु अशा कोणत्याही गैरव्यवहारांपासून कोसो दूर राहणारा स्वयंसेवक नित्य समाज व राष्ट्राच्या हिताचाच विचार करत असतो. भ्रष्टाचार असो की स्वतःच्या स्वार्थासाठी वाम मार्गाचा उपयोग करणे असो या दोन्ही गोष्टी स्वयंसेवक कटाक्षाने टाळतात.

समाजामध्ये विद्वेष तयार होऊ नये, जातीय तेढ निर्माण होऊ नये, एकमेकांबद्दलचा गैरभाव वाढू नये, महापुरुषांच्या विचारांची पायमल्ली होऊ नये यासाठी स्वयंसेवक अत्यंत दक्षतेने व्यवहार करतात व अशा वृत्ती जर वाढीस लागत असतील तर त्या वृत्तींना रोखण्याचे काम स्वयंसेवक आपल्या आचार विचारातून व प्रबोधनातून करताना दिसून येतात. समाजावर वेगवेगळ्या आपत्ती ज्यावेळेस येतात, त्यावेळी स्वतःच्या तत्व - विचारांना प्रसंगी मुरड घालून स्वयंसेवक या आपत्तीप्रसंगी काम करतात व इतरांना देखील कामाची प्रेरणा देतात. स्वयंप्रेरणा ही स्वयंसेवकांमध्ये ओतप्रोत भरलेली असते, त्यामुळे कोणीतरी सांगावे आणि मग मी ते काम करावे अशी स्वयंसेवकांची भावना नसते. स्वार्थ, प्रसिद्धी यापासून स्वयंसेवक खूप दूर असतात. आपण एखाद्याला मदत करतो म्हणजे त्याच्यावर उपकार करतो ही भावना स्वयंसेवकांमध्ये नसते तर उलट कर्तव्य भावनेने आपण हे केलेच पाहिजे अशी भावना स्वयंसेवकांमध्ये असते. स्वयंसेवकांवरील या संस्कारामुळेच समाजाला खूप मोठा लाभ होतो. चांगला समाज निर्माण होण्यासाठी स्वयंसेवकांचा आदर्शवत व्यवहार निश्चितच उपयोगी ठरतो, अशा स्वयंसेवकांकडे पाहून इतर लोकही आदर्श घेतात व यातूनच एका सज्जनशक्तीचा संचय होतो. यामुळेच संघ स्वयंसेवकांमधील संस्कार हे समाज व राष्ट्राच्या उभारणीसाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले आहेत व आजही ठरत आहेत.



# वळसंगच्या शंकरलिंग प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**वळसंग, दि. २० डिसेंबर-**

वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत क्रीडा सप्ताह उत्साहात संपन्न झाला.

विस्तार अधिकारी गुरुबाळ सनके, केंद्रीय मुख्याध्यापक अमिन पटेल यांच्या हस्ते व्हॉलिबॉल मैदानाचे पूजन करून क्रीडा ज्योत पेटवून व्हॉलिबॉल या सांघिक खेळाने क्रीडा सप्ताहास प्रारंभ झाला. यावेळी प्राचार्य वीरेश थळंगे व पर्यवेक्षक शिवानंद घोडके उपस्थित होते. क्रीडा सप्ताहात खो-खो, कब्बडी, क्रिकेट या सांघिक खेळांसह वैयक्तिक व मनोरंजन खेळांचे आयोजन करण्यात आले होते.

क्रीडा शिक्षक संतोष कस्तुरे व बाळकृष्ण गुंड यांनी योग्य नियोजन केले. शेवटच्या दिवशी वैयक्तिक व सांघिक खेळातील विजयी व उपविजयी खेळाडूंना व संघांना विविध शैक्षणिक साहित्य देऊन गौरविण्यात आले.

या बक्षीस वितरण समारंभास नुमवि शाळेच्या उपक्रमशील शिक्षिका नर्मदा मिट्टा व त्यांचे पती नरेश कनकी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सदर क्रिडासप्ताह यशस्वी करण्यासाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमादार, संजयकुमार धनशेट्टी, सिध्दाराम भैरामडगी, निलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, प्रा. संतोष शिंदे, प्रा. शरणय्या मसुती, मल्लिनाथ गौडगाव, विजय प्याटी, अजय माणकोजी, शिवराज अष्टगी, शैला निंबाळ, गंगा बागलकोटी, स्नेहा हळगोदे, प्रा. प्रतिभा तांडुरे, लिपिका राजश्री दुधगी, लिपिक गौरीशंकर चनशेट्टी, कर्मचारी कट्टेप्पा कोळी, विनोद दुधगी, सुनिता कुर्ले या सर्वांचे सहकार्य लाभले. श्रीमंत भोसले यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा विभाग प्रमुख संतोष कस्तुरे यांनी आभार मानले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## संत साहित्याचे अभ्यासक दत्ता गोसावी यांना माडगूळकर स्मृती साहित्यरत्न पुरस्कार घोषित

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२० डिसेंबर -**

स्वामी विवेकानंद ग्रामविकास मंडळ व महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे, शाखा पळूस, जि. सांगली यांचेवतीने साहित्यिक व संत साहित्याचे गाढे अभ्यासक श्री .दत्ता गोसावी यांना त्यांचे 'आता तरी पुढे हाचि उपदेश', या संत तुकाराम महाराज यांचे उपदेशपर अभंगावर केलेल्या रसाळ विवेचन पर ग्रंथास जेष्ठ साहित्यिक ग. दि. माडगूळकर स्मृती साहित्यरत्न पुरस्कार घोषित झाला असून, हा पुरस्कार ३६ व्या ग्रामीण साहित्य संमेलनात पळूस, जि. सांगली येथे मान्यवरांचे हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. हे संमेलन दि.२८ डिसेंबर रोजी पळूस येथे संपन्न होत आहे.

या पूर्वी ही श्री. दत्ता. गोसावी यांना अनेक मानाचे पुरस्कार मिळाले आहेत. हा पुरस्कार घोषित झाल्यामुळे त्यांना साहित्यिक मुकुंदराज कुलकर्णी, पां.न. निपाणीकर, बी. आर. देशमुख, डॉ. रविराज फुरडे, कवी प्रकाश गव्हाणे , प्रा. प्रमिला देशमुख, रामचंद्र इकारे तसेच सर्व मसाप. सदस्य व कवी कालिदास मंडळ सदस्यांनी अभिनंदन केले आहे .





### महत्त्वाचे




## शाह कन्या प्रशालेत आनंद बाजार उपक्रम उत्साहात

**बार्शी, दि.२० डिसेंबर-**

भविष्यात उत्तम उद्योजक तयार व्हायचे असतील तर आनंद बाजारसारखे उपक्रम प्रशालेत आयोजित करावेत. तसेच प्रॉडक्ट, प्राईस, पब्लिसिटी, पीपल, असे पी ५ लक्षात ठेवावेत, असे विचार यशस्वी उद्योजक अभिजीत सोनीग्रा यांनी उदघाटन प्रसंगी व्यक्त केले. कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका शुभदा जोशी होत्या. या कार्यक्रमास सेकंडरी सोसायटीचे संचालक प्रमोद देशमुख, संस्था सचिव चिन्मय वालवडकर, नागनाथ देवकते, वैशाली कांबळे, वैष्णवी हातोळकर हे मान्यवर प्रमुख पाहुणे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थिनींनी विविध खाद्य पदार्थ, फळे, भाजीपाला, दागिने, चहा, कडधान्ये इत्यादी वस्तूंचे ७० स्टॉल लावले होते. जवळपास २५ हजार रुपयांची उलाढाल या बाजारात झाली. नफा, तोटा, खरेदी, विक्री यासारख्या संकल्पना या बाजारामुळे विद्यार्थिनींना समजल्या. खरेदी करण्यासाठी विदयार्थिनी व पालक बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदेश घाडगे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले

## वाशिंबेत तानाजी झोळ यांचे सरपंचपद अबाधित जिल्हाधिकारी यांचा निर्णय

**करमाळा, दि.२० डिसेंबर-**



वाशिंबे (ता.करमाळा) येथील सरपंच तानाजी झोळ यांचे पद तीन अपत्य असल्याने रद्द करण्याबाबत नवनाथ झोळ यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांच्याकडे अर्ज दिला होता. या प्रकरणात जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दि. १७ डिसेंबर रोजी नवनाथ झोळ यांचा अर्ज नामंजूर करून तानाजी झोळ यांचे सरपंचपद अबाधित असल्याचा निर्णय दिला आहे. वाशिंबे ग्रामपंचायत निवडणुकीत जनतेतून भरघोस मताने विजयी झाल्यानंतर कोणतेही राजकारण न करता गावाच्या विकासासाठी तत्कालीन आमदार व सध्याचे माजी आमदार संजयमामा शिंदे यांच्या प्रयत्नातून भरघोस निधी उपलब्ध करून घेतला. गावाचा विकास हाच आपला ध्यास असल्यामुळे माझ्याविरुद्ध विरोधकांनी दाखल केलेले अपील नामंजूर करण्यात आले हा विकास कामांचा विजय असल्याची भावना तानाजी झोळ यांनी व्यक्त केली. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिनजी कल्याणशेट्टी, माजी आमदार संजयमामा शिंदे, माजी आमदार राम सातपुते यांच्या नेतृत्वाखाली अधिकाधिक निधी उपलब्ध करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## नगरपालिका निकालाच्या पार्श्वभूमीवर बार्शीत जमावबंदी व शस्त्रबंदी

**बार्शी, दि.२० डिसेंबर-**

**आज २१ डिसेंबर रात्री ८ वाजेपर्यंत घोषणाबाजी, मिरवणुकीस मनाई**

अत्यंत चुरशीच्या झालेल्या बार्शी नगरपालिका निवडणुकीचा निकाल रविवार, दि. २१ डिसेंबर रोजी जाहीर होणार आहे. निकालानंतर कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी आणि कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी पोलीस प्रशासनाने कडक प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. त्यानुसार बार्शी शहरात २१ डिसेंबर रोजी रात्री ८ वाजेपर्यंत जमावबंदी व शस्त्रबंदी लागू करण्यात आली असून, घोषणाबाजी, गुलाल उधळणे, विजय मिरवणूक तसेच विजयी सभा घेण्यास बंदी घालण्यात आली आहे. या संदर्भात पोलिसांनी सर्व उमेदवार व त्यांच्या समर्थकांना लेखी नोटिसा बजावल्या असून, आदेशांचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश दिले आहेत. निवडणूक निकालाच्या पार्श्वभूमीवर कोणत्याही प्रकारचा तणाव, वाद किंवा शांतता भंग होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले आहे. पोलिसांच्या या प्रतिबंधात्मक कारवाईचे सर्व स्तरातून स्वागत होत असून, शांततापूर्ण वातावरण राखण्यासाठी घेतलेल्या दक्षतेबद्दल नागरिक, सामाजिक संघटना आणि विविध राजकीय पक्षांकडून पोलीस प्रशासनाचे कौतुक करण्यात येत आहे. शहरात अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले जात आहे.

## पिलीव परिसर कडाक्याच्या थंडीने गारठला; पारा आला १० अंश सेल्सिअसपर्यंत

**पिलीव, दि.२० डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव येथे कधी नव्हे तो यंदा प्रचंड कडाक्याची थंडी पडली आहे यामुळेच जनजीवन विस्कळीत झाले आहे. शेतात काम करणाऱ्या शेतकऱ्यांना तसेच रात्रीच्या वेळी शेतात पाणी देताना थंडीचा प्रचंड त्रास होत आहे. सकाळी चिमुकल्यांना शाळेला जाताना थंडीच्या त्रासाने जीव अक्षरशः मेटाकुटीला येत आहे. वाढत्या थंडीचा दूध व्यवसायावर सुद्धा परीणाम झाला आहे. मात्र सदरची थंडी रब्बी हंगामातील गहु, हरभरा, व इतर पिकांना फायदेशीर आहे.मात्र भाजीपाला व ज्वारी पिकांवर या थंडीमुळे रोगराई पसरत आहे. सध्या ऊस गळीत हंगाम सुरू आहे. ऊस तोड कामगारांना जिवाची व थंडीची पर्वा न करता ऊसतोड करावी लागत आहे. पिलीव बाजारपेठेत सकाळी नऊ वाजेपर्यंत तर संध्याकाळी सहानंतर थंडीमुळे शुकशुकाट पाहावयास मिळत आहे. वाढत्या थंडीमुळे लहान मुले तसेच ज्येष्ठामध्ये थंडी, ताप ,खोकला, सर्दी असे आजार वाढु लागले आहेत. यंदा कधी नव्हे ते पहिल्यांदाच पिलीव परीसरात तापमानाचा पारा १० अंशापर्यंत पोहचला असल्यामुळे थंडीचा परिणाम प्रचंड जाणवत आहे.

# श्री विठ्ठलाची मूर्ती हवी की पदस्पर्श दर्शन?

## शासन, मंदिर समिती, वारकरी, पुरातत्व विभाग व मूर्ती अभ्यासकात चर्चेची गरज

**तभा वृत्तसेवा । महेश भंडारकवठेकर**
**पंढरपूर, दि.२० डिसेंबर -**

संपुर्ण हिंदूस्थानात फक्त पंढरपूरातच श्री विठ्ठलाच्या पदस्पर्श दर्शनाची सुविधा आहे. देशात अन्यत्र देवतांच्या मुर्तीचे दूरवरुन दर्शन दिले जाते. मात्र श्री विठ्ठल मूर्तीच्या पायांची होणारी झीज पाहता आता पंढरपुरात देखील मुखदर्शनाचा किंवा दूरवरुन दर्शन घेण्याचा निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे का? असा सवाल आता उपस्थित होवू लागला आहे. कारण मूर्ती हवी की दर्शन याबाबतचा योग्य निर्णय घेण्याची आता वेळ आली आहे का असा सवाल उपस्थित केला जात आहे. कारण पहिल्या लेपन प्रक्रियेपासून गेल्या ३७ वर्षात आता जर लेपन प्रक्रिया करावी लागली ती पाचव्यांदा होणार आहे. त्यामुळे शासन तसेच येथील विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती आणि महाराष्ट्रातील समस्त वारकरी संप्रदायातील ज्येष्ठ महाराज मंडळींनी एकत्रित येवून देश,विदेशातील मुर्ती शास्त्रातील तज्ञांशी चर्चा करुन याबाबतचा निर्णय गांभिर्यपूर्वक घेणे गरजेचे बनले आहे.

येथील विठ्ठल मंदिर हे अतिप्राचिन आहे. या मंदिरातील श्री विठ्ठलाची मूर्ती ही वालुकामय पाषाणाची असून ती स्वयंभू आहे. येथील विठ्ठल मुर्तीचे लोभस, विलोभनीय असे रुप पाहून संतमहात्म्यांनी देखील राजस सुकुमार मदनाचा पुतळा असे या मुर्तीचे वर्णन केलेले आहे. येथील विठ्ठलाच्या मुर्तीची झीज होत असल्याचे लक्षात







आल्यावर विठ्ठल मूर्तीवर १९ फेब्रुवारी १९८८ साली पहिल्यांदा लेपन प्रक्रिया करण्यात आली. त्या नंतर २००५ , २०१२ आणि २०२० मध्ये लेपन (इपॉक्सी) प्रक्रिया पार पडली. दरम्यान मुर्तीच्या पायांची झीज होत असल्याच्या बातम्या प्रसिध्द झाल्यानंतर श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी गुरुवारी (ता.१८) रात्री प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी माहे फेब्रुवारी २०२५ मध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तीची प्रत्यक्ष पाहणी करून सविस्तर लेखी अहवाल सादर केल्याची माहिती दिली. या संदर्भात भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाकडून प्राप्त झालेल्या या अहवालास श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीची मंजुरी घेऊन, पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी हा अहवाल शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आला असल्याची देखील माहिती मंदिर समितीचे सह-अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली आहे. त्यामुळे आता जर पुन्हा लेपन प्रक्रिया करावयाची झाल्यास ती पाचव्यांदा करावी लागणार आहे. पहिल्या लेपन प्रक्रिये पासून साधारणपणे ३७ वर्षात पुन्हा पाचव्यांदा ही प्रोसेस आता करावी लागणार आहे. त्यामुळे आता खरोखरच मुर्तीबाबत नुसतीच चिंता व्यक्त करण्या पेक्षा काहीतरी ठोस निर्णय घेण्याची वेळ आली आहे.

कारण पंढरपूरचा नावलौकीक आहे तो येथील विठ्ठल मंदिरा मुळेच. येथील विठुरायाच्या असण्यामुळेच महाराष्ट्राची दक्षिण काशी म्हणून या पंढरीतिर्थक्षेत्राला संबोधले जाते. जेव्हा नव्हते चराचर तेव्हा होते पंढरपूर अशी या पंढरीक्षेत्राची पुराणा पासून ख्याती सांगितली जाते ती पांडुरंगाच्या येथील वास्तव्यामुळेच जगतगुरु शंकराचार्यांनी देखील या राजसुकुमार असलेल्या विठुरायाच्या मुर्तीचे लोभस रुप पाहून महायोग पीठेची रचना केली आहे. त्यामुळे या दुमिळ अशा स्वयंभू विठ्ठल मुर्तीचे चिरंतन जतन आणि संवर्धन करण्याची खरोखरच गरज आहे. त्यामुळे मुर्ती हवी की पदस्पर्श दर्शन यावर देखील आता खऱ्या अर्थाने विचारमंथनाची गरज आहे. कारण भविष्यात जर (देव करो आणि असे कदापिही न घडो) मुर्तीलाच काही इजा पोहचली तर मुख आणि पदस्पर्श दर्शनास महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील तमाम महाराज मंडळीं तसेच वारकऱ्यांसह देश,विदेशातील विठ्ठलभक्तांना,भाविकांना देखील मुकावे लागणार आहे.

म्हणूनच खोट्या अट्टाहासाला बळी न पडता मुर्ती अभ्यास शास्त्रातील तज्ञांच्या मार्गदर्शनाखाली एकदा संपुर्ण मुर्तीची पाहणी करुन त्या संदर्भातील या अभ्यासकांच्या निरीक्षणातून त्यांनी सुचविलेल्या सुचनांची मंदिर समितीने येत्या काळात किंवा भविष्यात ठोस अंमलबजावणी करण्याची गरज आहे. पण या तज्ञ मुर्ती अभ्यासंकानी नोंदविलेल्या निरीक्षणाला त्यांनी सुचविलेल्या सुचनांना शासन, महाराष्ट्रातील वारकरी संप्रदाय, देश,विदेशातील विठ्ठल भक्तांनी कोणतेही आढे- वेढे न घेता दुमिळ असलेल्या या विठ्ठल मुर्तीचे चिरंतन जतन,संवर्धन होण्याच्या दृष्टीने एकमुखाने पाठिंबा देणे गरजेचे आहे.

## पिण्याच्या पाण्यासाठी ग्रामपंचायतला ठोकले कुलूप

### जलजीवन योजनेसाठी जागा दान दिलेल्या वृध्दाकडून संताप

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि.२० डिसेंबर-**

भाबुर्डी (ता.माळशिरस) येथे भारत सरकारच्या जलजीवन योजनेसाठी स्वतःची चार गुंठे जागा दान दिलेल्या वृध्दाने पाणी योजना पूर्ण होत नसल्याच्या रागातून ग्रामस्थांच्या सहय्याने ग्रामपंचायतली कुलुप ठोकले. या अभिनव आंदोलनाची तालुक्यात चर्चा होत आहे. आता तरी प्रशासनाला जाग येणार का? जनता पाण्यावाचून तडफडून मरतानाची शासन वाट बघत तर नाही ना? असा संतप्त सवाल त्या वृध्दासह ग्रामस्थांमधून विचारला जात आहे.

भांबुर्डी येथे जलजीवन मिशन (जीजीएम) ही भारत सरकारची प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला नळाद्वारे सुरक्षित पाणी पुरवण्याची योजना राबवली गेली. ही योजना जलशक्ती मंत्रालयाद्वारे चालवली जाते. ही योजना राबवण्यासाठी ग्रामपंचायतला



सुरेश विठ्ठल बर्गे (वय-७५) या आजोबांनी स्वतःच्या मालकीची चार गुंठे जागा बक्षीसपत्र करून दिली आहे. स्वतःला दम्याचा त्रास असताना सुद्धा मोकळ्या मनाने गावासाठी जागा दिली. गावातील लोकांनी पाणी पिऊन तृप्त व्हावे हे त्यांचे स्वप्न होते. परंतु प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे गावाचे पाणी पिण्याचे स्वप्न अधुरे राहिल्याने वयाच्या ७५ व्या वर्षी स्वतःला दम्याचा त्रास असताना सुद्धा ग्रामस्थांच्या मदतीने श्री. बर्गे यांनी ग्रामपंचायतीला टाळा ठोकला. जोपर्यंत गावाला पाणी मिळत नाही तोपर्यंत कुलूप काढणार नाही, मला अटक केली तरी चालेल. गावासाठी मरायला तयार आहे. असे सुरेश बर्गे यांनी सांगितले.

## मंगळवेढ्यात आज १० टेबलवर ९० कर्मचारी करणार मतमोजणी

### प्रशासनाकडून जय्यत तयारी

**तभा वृतसेवा,**
**मंगळवेढा, दि.२० डिसेंबर-**

मंगळवेढा नगरपरिषदेसाठी शनिवारी दि. २० डिसेंबरला मतदान होऊन लगेच दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवार दि. २१ रोजी पार पडणार आहे. यासाठी ९० कर्मचारी १० टेबल व्यवस्था शासकीय गोडाऊन मधे करण्यात आली आहे.

ही मतमोजणी पंढरपूर रस्त्यावरील शासकीय धान्य गोदाम येथे होणार आहे. प्रत्येक टेबलवर एक प्रभाग याप्रमाणे मतमोजणी होणार आहे. सकाळी १० वाजता मतमोजणीस सुरुवात होणार आहे. एकाच वेळी १ ते १० प्रभागातील पहिल्या मतदान केंद्राची मतमोजणी सुरू होणार आहे. एकूण ४ फेऱ्या होणार असून चौथ्या फेरीत प्रभाग क्रमांक १० मधील फक्त एका मतदान केंद्राचा समावेश आहे. प्रत्यक्ष मतमोजणी करणाऱ्या पथकामध्ये १० टेबलवर एकूण ४४ कर्मचारी नियुक्त केलेले असून इतर विविध पथकामध्ये एकूण ४६ कर्मचारी असे तब्बल ९० कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून मतमोजणी प्रक्रिया पार पडणार आहे. मतमोजणीचे फेरीनिहाय आकडे त्या त्या वेळी घोषित केले जाणार असून नगराध्यक्षपदाचा निकाल सर्वात शेवटी घोषित केला जाणार आहे. जर दोन उमेदवार यांना समसमान मते मिळाली तर अशा वेळी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार चिठ्ठीद्वारे विजयी उमेदवार घोषित केला जाणार आहे. मतमोजणी कक्ष व परिसरात निवडणूक निर्णय अधिकारी व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी वगळता इतर सर्व कर्मचारी तसेच उमेदवार व त्यांचे सर्व प्रतिनिधी यांना मोबाईल घेऊन येण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. मतमोजणी कक्ष परिसरात मीडिया सेंटर ची स्थापना करण्यात आली असून माध्यम प्रतिनिधी यांच्यासाठी विशेष कक्ष तयार करण्यात आला आहे. फेरीनिहाय मतमोजणीचे आकडे मीडिया सेंटरला देण्यासाठी एक अधिकारी नियुक्त करण्यात आला आहे. धान्य गोदाम परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात येणार असून कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची दक्षता पोलीस प्रशासन घेत आहे.

## पंढरपूर आगारात 'प्रवासी राजा दिन' साजरा

### ग्राहक पंचायतीने मांडल्या विविध समस्या

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२० डिसेंबर -**

पंढरपूर आगारासाठी जास्तीत जास्त लालपरी बसेस उपलब्ध कराव्यात अशी मागणी ग्राहक पंचायतीने केल्याची माहिती जिल्हा अध्यक्ष शशिकांत हरिदास यांनी दिली.

राज्य परिवहन महामंडळातर्फे प्रत्येक आगारामध्ये प्रवाशांच्या अडचणी,समस्या, तक्रारी ऐकून घेऊन त्या सोडविण्यासाठी प्रवासी राजा दिन हा उपक्रम सुरू केला आहे. त्याप्रमाणे पंढरपूर बसस्थानकावर या उपक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी विभाग नियंत्रक अमोल गोंजारी, आगार प्रमुख योगेश लिंगायत, स्थानकप्रमुख अंकुश सरगर, ग्राहक पंचायतीचे तालुकाध्यक्ष नंदकुमार देशपांडे, सदस्य मंगेश देशपांडे, पांडुरंग ऐतवाडकर आदी उपस्थित होते. यावेळी प्रवासी सेवेमधील अडचणी मांडून सुधारणा करण्याची मागणी केली. विभाग नियंत्रकानी सकारात्मक दृष्टीकोनातून लवकरच सर्व बाबींची पुर्तता करण्यात येईल अशी ग्वाही दिली. वरिष्ठ सहाय्यक समाधान मेटकरी यांनी आभार व्यक्त केले.



**यावेळी करण्यात आलेल्या मागण्या**

पंढरपूर ते पुणे फलटण एक थांबा बस सेवा सुरू करावी. पंढरपूर ते पुणे ही बस (निगडी) वल्लभनगर पर्यंत वाढवावी. सोलापूर बसस्थानकावरुन पंढरपूरसाठी सायंकाळी सहा ते सात या वेळेत बस संख्या वाढवावी. पंढरपूर ते टेंभुर्णी शटल सेवेसाठी इलेक्ट्रिक बस ऐवजी लालपरी बस द्यावी. गर्दीचे वेळी रिझर्वेशनसाठी कर्मचारी (संगणकसह) संख्या वाढवावी. बस स्थानकावरील सुरक्षा व्यवस्था सुधारावी. फलाटांची स्वच्छता कायम व्हावी. पंढरपूर मोहोळ वैराग मार्गे तुळजापूर ही बस सेवा सुरू करावी.

# महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सराईत गुन्हेगारांवर एमपीडीएची कारवाई

## पोलिस आयुक्तांनी कार्यभार स्वीकारल्यापासून ५० गुन्हेगारांवर केली कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२० डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका निवडणुकीच्या अनुषंगाने सराईत गुन्हेगारांवर एमपीडीए अंतर्गत कारवाईला जोर देण्यात येत आहे. गेल्या दोन दिवसात ३ सराईत गुन्हेगारांवर स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली आहे. पोलिस आयुक्तांनी कार्यभार स्वीकारल्यापासून ५० गुन्हेगारांवर अशी कारवाई करण्यात आली, असे पोलिस प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सराईत गुन्हेगारांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत होऊन, सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झाली होती. त्यांच्या गुन्हेगारी कृत्यामुळे, आम जनतेमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण होवुन त्यांच्याविरुध्द







पोलिसांकडे तक्रार अथवा माहिती देण्यास कोणी तयार होत नव्हते. मात्र, पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांनी कठोर पाऊले उचलत ही कारवाई केली.

मिथुन धनसिंग राठोड (वय-३३, रा.घोडातांडा, ता.दक्षिण सोलापूर) हा सराईत हातभट्टीवाला असून, जेलरोड पोलिस ठाणे हद्दीत व आजुबाजुच्या परिसरात तो स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी गावठी हातभट्टीची विक्री करण्यासाठी अनेक हातभट्टी-दारुचे गुत्ते अड्डे चालवत आहे. त्याच्याविरुध्द गंभीर स्वरुपाचे एकूण २७ गुन्हे सोलापुर शहरात दाखल आहेत.

सलमान गुडु पटेल (वय-२७, रा.प्लॉट नं.७२, विष्णु नगर भाग-२, मजरेवाडी, सोलापूर) हा त्याच्या साथीदारांसह जेलरोड व एमआयडीसी पोलिस ठाणे परिसरात जिवघेण्या घातक शस्त्रानिशी फिरुन लोकांना जबर दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, जबरी चोरी, विनयभंग करणे, धाकदपटशा करणे असे प्रकार करत होता. त्याच्या विरोधात ९ गुन्हे दाखल आहेत.

अश्रफअली उर्फ टिपू मन्नान ऊर्फ मुनाफ बागवान (वय-३३, रा.७९३ शुक्रवार पेठ, सोलापूर) हा त्याच्या साथीदारांसह फौजदार चावडी पोलिस ठाणे परिसरात जिवघेण्या घातक शस्त्रानिशी इच्छापुर्वक जबर दुखापत करणे, खुनाचा प्रयत्न करणे, खंडणी मागणे, जबरी चोरी, विनयभंग करणे, गृहअतिक्रमण करणे, दगडफेक करणे यांसारखे गुन्हे करीत होता. त्याच्या विरोधात ७ गुन्हे दाखल आहेत.

पोलिस आयुक्त एम.राजकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्तद्वय डॉ. अश्विनी पाटील, विजय कबाडे, सहाय्यक पोलिस आयुक्तद्वय राजन माने, अरविंद माने, वपोनि शिवाजी राऊत, प्रमोद वाघमारे, महादेव राऊत, सपोनि तुकाराम घाडगे, पोहेकॉ विनायक संगमवार, सुदीप शिंदे, पोशि अक्षय जाधव, विशाल नवले यांनी ही कामगिरी बजाविली.